# महाभारत

## खंड११ : वनपर्व ३

मराठी अनुवाद : श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## महाभारत खंड अकरावा

## वनपर्वातील तिसरा भाग

## तीर्थयात्रा पर्व खंड पहिला

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# महाभारत


मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**



©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापू्र्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



**प्रकाशन : १० डिसेंबर २०१८**

## – अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याचवेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना ते गद्यात केले आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) भाषा वापरतात परंतु माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत तीसापेक्षा जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल

अशी अपेक्षा आहे. त्यात मूळ वनपर्वाचे पांच खंड केले आहेत, त्यातील हा अकरावा खंड आपण आता वाचणार अहात, तीर्थयात्रा पर्व खंड पहिला.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्याआधीची असती तर त्याचा उल्लेख त्याकाळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्यानंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, अशोक सम्राटाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका

करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com
ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories
I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy
Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# – महाभारत तीर्थयात्रा पर्वाचा खंड पहिला –

## तीर्थयात्रा पर्व पुढे चालू

जनमेजय बोलतो, "अहो पुण्यवंत, कम्यक वनातून माझा पणजोबा पार्थ, जो त्याच्या दोनही हातांने तिरंदाजी लिलया करत असें आणि ज्याने कधी युद्धात माघार स्वीकारली नाही, गेल्यानंतर दुसरे पांडव तेथे काय करत होते"? "मला असें वाटते, कीं, तो माझा पणजोबा हा त्यांचा एकमेव आधार होता जसें विष्णू देवांचा संरक्षणकर्ता असतो. ते माझे इतर सामर्थ्यवान पणजोबा त्यांचे दिवस त्या वनात कसे घालवत होते"? जनमेजयाच्या अशा प्रश्नांना वैशंपायन उत्तर देण्यासाठी त्याला सांगतात, "सगळे इतर पांडव कष्टी झाले, त्यांची अवस्था अशी झाली जशी दागिन्यातून रत्नं काढल्यावर तो दागिना कसा निस्तेज होतो तशी. किंवा पंख तुडलेला पक्षी किंवा घोडे नसलेला रथ अशी अवस्था झाली होती. अशा परिस्थितीत ते शूरवीर पांडव सुखहीन झालेले रहात होते".

पांडव त्यांच्या कडे रहाणार्या ब्रह्मणांसाठी यज्ञात अर्पण्याचे प्राणी शिकार करून मारत होते. ते मारलेले वनपशु मारल्यानंतर त्यांचे रितसरपणे शुद्धीकरण करून मग ते त्या ब्राह्मणांना दान करत होते. ते केल्यांने त्यांना ब्राह्मण आशिर्वाद देत व त्यात समाधान मानून ते तुझे पणजोबा रहात होते. एके दिवशी, पांचाल कन्या तिच्या तिसर्या नवर्याच्या आठवणींने त्रस्त झालेली तिच्या दुसर्या नवर्यास बोलते, "अर्जुनाच्या गैरहजेरीमुळें माझे मन विचलित झाले आहे. ते गेल्यापासून मला हे वन निर्जीव झाल्यासारखे वाटते. अर्जुनाच्या जाण्यामुळें हे फुला फळांनी डवरलेले वृक्ष, वेली मला भकास असल्यासारख्या वाटतात. अर्जुनाच्या हिम्मतीची, धाडसाची मला सदैव आठवण येत आहे. ते जेव्हां तिरंदाजीचा सराव करत तेव्हां त्यांच्या गांडीवातून येणारा ठणत्कारांचा आवाज माझ्या कानात गुंजत आहे. मी त्यांच्याविना कधी सुखी होऊ शकेन असें वाटत नाही". तिचे असें दुःखोद्गार ऐकल्यावर भिम तिला बोलतो, "अहो सुंदरी, तुझ्या मताशी मी पूर्णतया सहमत आहे. ज्याचे शरीर प्रमाणबद्ध आहे, ज्याच्या पंजावर व मनगटावर धनुष्याच्या दोराचे वळ उठलेले आहेत व ज्याच्या गळ्यात पंचमुखी दोन नागांचे चिन्ह असलेले कडे आहे, असा माझा भाऊ नसेल तर सूर्याशिवायचे नभ असें वाटते. त्याच्या ताकदीवर पांचाल व कुरु लोक अवलंबून आहेत असें कि, त्याच्या जोरावर ते देवांनासुद्धा आव्हान

देण्यास तयार आहेत. अशा माझ्या भावाशिवाय फाल्गुना शिवाय, मलासुद्धा येथे करमत नाही. माझे डोळे पहा, ते निस्तेज आहेत त्याच्याशिवाय. त्याचे अशारितीने शोक व्यक्त करणे होते न होते तेवढ्यात नकुल बोलला, त्याचा आवाज रडकुंडा झाला होता . त्याच्या नेत्रांतून अश्रू येत होते, तो त्या स्थितीत बोलला, ज्याच्या युद्धक्षेत्रातील कथांनी देवसुद्धा चकीत होतात, जो सर्वश्रेष्ठ योद्धा आहे, अशा माझ्या मोठ्या भावाशिवाय येथे रहाणे निरर्थक झाले आहे. अर्जुन उत्तरेकडे गेला आणि शेकडो बलशाली गंधर्वांचा पराभव केला, त्यांच्याकडून अद्वितीय असें घोडे आणले, तित्री व कल्माश जातीचे ते आहेत, जे राजसूय यज्ञात भेट मिळाले. अशा माझ्या भिमानंतरच्या भावाशिवाय येथे कम्यक वनात रहाणे दिवसेंदिवस अशक्य होत आहे. त्याचे शोक प्रदर्शन झाल्यावर त्याचा जुळा भाऊ सांगतो त्याचे दुःख, सहदेव स्वगत बोलतो, राजसुय यज्ञाच्या निमित्ताने ज्यांने अमाप संपत्ती खेचून आणली त्याबरोबर असंख्य दासी आणल्या, ज्याने एका हाती यादवांचा पराभव केला आणि त्याची भार्या सुभद्रा, कृष्णाची बहीण आणली, ज्याने द्रुपदाचे राज्य खालसा केले, जो द्रोणांचा प्रमुख शिष्य आहे, अशा माझ्या दिव्य भावाचा बिछाना रिकमा आहे हे पाहून माझे मन व्यथित होत आहे. ह्यावर इलाज म्हणून आपण सगळे एकदाचे ह्या वनातून कोठेतरी दूर गेले पाहिजे.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वाचा पहिला भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग दुसरा

वैशंपायन सांगतात, आपल्या भावांचे व भार्येचे ते शोक करणे ऐकल्यावर ज्यात सतत धनंजयाचा उल्लेख होता, राजा युधिष्ठीर जोसुद्धा त्याच कारणांमुळें बेचैन झाला होता, अशाप्रसंगी, त्याला ऋषी नारद त्याच्यापुढे उभे असलेले दिसतात. त्यांच्या ब्रह्मतेजांने सभोवार उजळून निघाले होते. जणू काय यज्ञात समिधा टाकल्याने तो अग्नी उफाळून उभा झाला आहे. त्यांचे दर्शन होताच ते सगळे पांडव उठून त्यांच्याकडे गेले. त्यांना अभिवादन करून त्याची पुजा केली. ते असें दृष्य होते जणूकाय इंद्राभावती देव जमा झाले आहेत. त्याच वेळी यज्ञसेनी शिष्टाचाराच्या रिवाजाप्रमाणे त्या तिच्या चार नवर्यांबरोबर उभी होती. जशी वेदात सावितृ अथवा मेरूमागून येणारे किरण उभे असतात. तेजस्वी नारदमुनी त्यांनी केलेली पुजा प्रेमपूर्वक स्वीकरतात. त्यानंतर त्यांची विचारपुस करतात. त्यांनतर प्रसंगानुरूप नारद सांगतात. "मला सांगा, तुम्हाला काय त्रास होत आहे व मी तुमच्यासाठी काय करावे असें तुम्हाला वाटते"? ते ऐकल्यावर धर्माचा मुलगा युधिष्ठीर लवून आणि हात जोडून नमस्कार करत म्हणाला, "अहो नारद मुनी, आपण सगळ्यांचे पुज्य अहात, आपण आमच्याकडे आलात ह्यांतच आमचे भले झाले असे मी समजतो. तरीसुद्धा आपण पुण्यवंत अहात, महान मुनी अहात, म्हणून मी तुम्हाला कांहीं माझ्या शंका विचारू शकलो तर ते बरे होईल. मला सांगा, जगभर आपण पवित्र जागी जाणे, नद्यांत स्नान करणे, विविध पवित्र स्थळं पहाणे, अशा गोष्टी म्हणजे तीर्थयात्रा करणे ह्याला काय महत्व आहे"? ते ऐकल्यावर नारद मुनी त्याला सांगतात, "अरे पांडवा, नीट लक्ष देऊन ऐक, जे ज्ञान बुद्धीमान भिष्मांने पुलस्त्य ऋषीकडून मिळवले, जेव्हां ते पितृ व्रतात होते. त्यावेळी तो भिष्म मुनींच्या सहवासात एका प्रसन्न आणि पवित्र क्षेत्री रहात होता. जेथे बहुधा गंधर्व, ऋषी आणि दैविक शक्ती वास करतात. तेथे रहात असतांना एकदा तो पितरांना अर्घ्य दिल्यानंतर शांतपणे ध्यान करत असतांना त्याला अनेक तेजस्वी ऋषी विलक्षण स्वरुपात दिसू लागले. त्या त्यांच्या पवित्र दर्शनाने त्याला अवर्णनीय असा संतोष झाला. त्यांचे दर्शन झाल्यानंतर तो तुमचा आजोबा, त्या ऋषींची आराधना करू लागला. त्या ऋषींचा कृपाप्रसाद प्राप्त झालेला तो त्यानंतर पूर्ण ध्यानाने, त्यांना विचारतो, "मी भिष्म, आपला दास, आपल्या दर्शनाने मी माझ्या पापापासून मुक्त झालो आहे असें मला

वाटते". असें बोलल्यानंतर तो पवित्र पुण्यप्रतापी भिष्म मौन साधून एकचित्ताने त्यांच्यावर ध्यान करू लागला. ते पाहून ते मुनी अत्यंत आनंदी झाले.

तीर्थयात्रा पर्व भाग दुसरा संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग तिसरा

भिष्माला ऋषी पुलस्त्य सांगतात, "मी तुझ्या तपश्चर्येमुळें संतुष्ट झालो आहे. तुझा संयम, तुझा नम्रभाव, तुझी सात्त्विकता, तुझी नैतिकता, तुझे सत्यवचनी व्रत अशामुळे मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तुझ्या पुण्यप्रतापी पूर्वजांच्या कृपेमुळें मला तू अशा रुपात पाहू शकत आहेस. आम्ही आमच्या दिव्य दृष्टीने कांहींही पाहू शकतो. मला सांग, मी तुझ्यासाठी काय करावे? तुला जे पाहिजे ते मी देईन". ते ऐकून भिष्म त्या मुनीश्वराला सांगतो, "तिन्ही जगाला पुज्य असलेल्या आपल्या सारख्या दैविक ऋषीचे मला दर्शन झाले, ह्यापेक्षा आणखीन काय जास्त मी मागावे"? "परंतु, जर तुमची इच्छा असेल व कांहीं देण्याचा निर्धार असेल तर मी माझ्या शंका विचारू इच्छितो त्यांचे समाधान आपण करावे. मला तीर्थक्षेत्रांबद्दल कांहीं गंभीर प्रश्न आहेत ते मी तुम्हाला विचारतो. त्याबद्दल तपशिलवार माहीती आपण मला सांगावी. मी ते सगळे तुमच्याकडून ऐकू इच्छितो". "पहिला प्रश्न असा किं, आपल्या सारख्या साक्षात देव अशा ऋषींना तीर्थयात्रा कां कराव्या लागतात? तुम्ही जगातील सगळी तीर्थक्षेत्रे पहाण्याचे कारण काय"?

पुलस्त्य त्याला सांगतात, "मी तीर्थयात्रांचे महत्व काय ते नीटपणे समजावून सांगणार आहे. त्याशिवाय ऋषी मुनी तीर्थक्षेत्री कां रहातात तेसुद्धा सांगतो. प्रथम ऐक, कोणाला तीर्थयात्रा केल्याने लाभ होतो, ज्याची इंद्रीय त्याच्या नियंत्रणात आहेत, ज्याचे मन स्थीर आहे, ज्याचे ज्ञान योग्य आहे, ज्याचे वैराग्य आणि कर्म त्याच्या संयमाने मर्यादीत आहे असें लोक तीर्थयात्रांपासून लाभ घेऊ शकतात. जो समधानी आहे, जो भेटवस्तु स्वीकारत नाही, ज्याला दुरभिमान नाही, जो पाप करत नाही, ज्याचा स्वार्थ संयमित आहे, जो पोटापुरतेच खातो, ज्याची भोगइंद्रीये मर्यादित आहेत, असा इसम तीर्थक्षेत्री गेला तर त्याचा त्याला लाभ होऊ शकतो. जो शब्दाचा खरा आहे, ज्याचा क्रोध हितदर्शी आहे, जो सत्याचा समर्थक आहे, जो सगळ्या जीवांबद्दल सहिष्णूता बाळगतो त्याला तीर्थयात्रा उपयोगी ठरतात. असे वेदात सांगितले आहे. ते नित्य आहे. परंतु, अरे शंतनुच्या मुला जे ह्या गुणांनी सिद्ध नाहीत ते जेव्हां यात्रा करतात तेव्हां ती फक्त भटकंती असते त्याचा त्याला अध्यात्मिक दृष्ट्या कांहींही उपयोग होत नाही. ह्यावरून तीर्थयात्रेला जाण्या आधी त्यांनी त्याची कोणत्या प्रकारची तयारी केली पाहिजे ते तुझ्या लक्षात आले असेल.

यज्ञांचे लाभ कोणाला मिळतात ते सांगतो, जो यज्ञ करण्यास लायक नाही अशांने यज्ञ करून त्याला त्याचा उपयोग होत नाही. म्हणजे यज्ञ करणारा यजमान व ब्राह्मण (याज्ञिक) दोघेही तो यज्ञ करण्यासाठी लायक असले पाहिजेत एरव्ही तसले यज्ञ व त्यावर झालेला खर्च व्यर्थ जातो. ज्याची ऐपत आहे अशा राजांने अथवा श्रीमंत माणसांने यज्ञ करावेत. म्हणून अरे युधिष्ठीरा, सामान्यपणे यज्ञ करण्यापेक्षा तीर्थयात्रा करणे जास्त श्रेयस्कर असते. कारण फार खर्च करून यज्ञ संपन्न झाला तरी जर त्यात एक तरी खोट असेल तरी तो यज्ञ व त्यावर झालेला खर्च सगळे वाया जाते. तसे तीर्थयात्रेचे होत नाही. अगदी निर्धन माणूस सुद्धा केवळ गुणी असेल तर मनोभावे तीर्थयात्रा करण्याने मोठ्या खर्चिक यज्ञाचे लाभ प्राप्त करून घेत असतो, हे तीर्थयात्रांचे विशेष आहे. म्हणून सामान्य माणसांना वेद, यज्ञ करण्याची शिफारस करत नाही, त्यासाठी तीर्थयात्रा करण्याचे सांगितले आहे. ज्याच्याकडे धन नाही, जो एकटा आहे, ज्याला कोणी स्नेही, मित्र, सहकारी नाहीत, परंतु त्याची इंद्रीय त्याच्या नियंत्रणात आहेत, ज्याचे मन स्थीर आहे, ज्याचे ज्ञान योग्य आहे, ज्याचे वैराग्य आणि कर्म त्याच्या संयमाने मर्यादीत आहे, ज्याला दुरभिमान नाही, जो पाप करत नाही, ज्याचा स्वार्थ संयमित आहे, जो पोटापुरतेच खातो, ज्याची भोगइंद्रीये मर्यादित आहेत, शब्दाचा खरा आहे, ज्याचा क्रोध हितदर्शी आहे, जो सत्याचा समर्थक आहे, जो सगळ्या जीवांबद्दल सहिष्णूता बाळगतो असा माणूस यज्ञातून मिळणारे लाभ केवळ योग्य प्रकारे तीर्थयात्राकरून मिळवू शकतो. हे तीर्थयात्रेचे महत्व आहे. आणि म्हणून ऋषी जे ह्या प्रकारात येतात, यज्ञ न करता तीर्थयात्रा करणें श्रेयस्कर समजतात. एवढे सांगितल्यानंतर पुलस्त्य भिष्माला सांगतात, आता मी तुला अशा कांहीं तीर्थक्षेत्रांची माहीती सांगतो तेथे तीर्थाटन केल्याने यज्ञ करण्या इतके लाभ होतात. म्हणून जेथे सगळे ऋषी नित्य नेमांने जात असतात. समजा कोणी अग्नीश्तोम यज्ञ केला परंतु, त्या प्रमाणे दानं केली नाहीत, ब्राह्मणांना भेटवस्तु दिल्या नाहीत ज्यामुळें ब्राह्मण प्रसंन्न झाले नाहीत, पशु दानं केली नाहीत असें झाले तर तो यज्ञ करण्याचा इतर खर्च व्यर्थ गेला असें समजले जाते. परंतु, तेच लाभ केवळ तीर्थाटन दिलेल्या नियमांने केल्याने मिळत असतात. ज्याला फार खर्च होत नाही. असें तीर्थक्षेत्र आहे, **पुष्कर**. जे तिनही जगांत ख्यातनाम आहे. अरे कुरु कुळाच्या राजा तुला माहीत नाही पण ते सत्य आहे किं,

दररोज संध्याकाळापासून पहाटे पर्यंत त्या ठिकाणी असंख्य तेजोमय तीर्थ उपस्थित असतात, त्याकाळात तेथे राहून खरी ध्यान तपस्या केल्याने अनेक यज्ञ केल्यासारखा लाभ होत असतो. तेथे आदित्य, वसु, रुद्र, साध्य, मरुत, गंधर्व आणि अप्सरा (हे सगळे देवतांचे प्रकार आहेत) येत असतात. तेथे त्यांच्या सानिध्यात जर तू ध्यानसाधना केलीस तर तुला त्या दिव्य शक्तींचा लाभ होतो, अध्यात्मिक उर्जा वृद्धीगत होते. म्हणून ऋषी अशा ठिकाणी यात्रा करत असतात. मनुष्य देहांत शरीराच्या योगक्षेमाच्या कामामुळें कळत न कळत पाप होत असतेच. मग तो सिद्ध असेल अथवा ऋषी असेल अथवा मुनी असेल अथवा गुह्यक असेल जोवर देहधारी आहे त्याला ते अपरिहार्य आहे. म्हणून तीर्थक्षेत्री जाऊन त्या दैवी शक्तींच्या सानिध्यात ध्यान केल्यामुळें त्या सुक्ष्म पाप कर्मांचे निराकरण होत असते. अशाप्रकारे नित्यनेमाने तीर्थयात्रा केल्याने तुझा आत्मा शुद्ध होत रहातो व शेवटी जेव्हां तुझे ह्या जगातून जाणे होते तू थेट स्वर्गात जातोस. पुष्कर हे तीर्थक्षेत्र इतके प्रभावी आहे कीं, खर्या साधकाने जरी त्याची आठवण करून, आहे त्या जागी सूर्यास्ता नंतर ध्यान (आराध्य दैवतावर एकचित्ताने मन केंद्रीत करणे, त्राटक साधना अशासाठी फार उपयुक्त आहे. त्याला ध्यान करणे असें समजतात) करण्यास सुरुवात केली तर शरीराने तो कोठेही असला तरी मनाने पुष्कर मध्ये असल्यासारखे फायदे त्याला होऊ शकतात.

नारद युधिष्ठीराला पुढे सांगतात, तुझे पणजोबा कमळात बसून अनेक वेळा पुष्करचा अनुभव नित्य घेत असतात. बर्याच ऋषींनी ह्या पुष्करातच त्यांचे अंतिम ज्ञान प्राप्त केले आहे. तो मोक्षाचा दरवाजा आहे. तेथे तुम्ही मनाने जाणे आवश्यक असते, केवळ शरीराने जाऊन उपयोगाचे नाही. कारण त्या पुण्यप्रभावी देवता ज्याच्या कडून कांहीं मिळवावयाचे असते त्यांचा संबंध आपल्या मनाशी असतो, ना कीं, शरीराशी. देव, पितर ह्यांचा सन्मान करणारा पुष्करात स्नान करतो तर त्याचे फायदे दहा अश्वयज्ञ करण्या इतके असतात. त्यासाठी फक्त एका ब्राह्मणाला भोजन दिले तरी ते पुरेसे असते. कारण त्यामुळें त्याचे ह्या व नंतरच्या जन्मांचे नित्य भले होत असते. तुझा पणजोबा तेथे केवळ फळभाज्या, कंदमुळं आणि फळं खाऊन तपस्या करत असें. वेदांत सांगितल्या प्रमाणे सूर्यास्ता पासून पहाटे सूर्य उगवे पर्यंत ध्यान साधना जमेल तशी सुयोग्य करावयाची असते व दिवसां

आराम करावयाचा असतो. अशा तीर्थक्षेत्री अन्नदान, वस्त्रदान करण्याने फार लाभ होतो. ते काम दिवसा करावयाचे असते. त्याकरता क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा वर्णाचे लोक तशी दानं करून पुण्य मिळवत असतात. कांहीं त्यासाठी अन्नछत्र चालवतात, कांहीं कपडे वाटतात. अशा प्रकारे कमी पैशात केवळ तीर्थक्षेत्री तसा उपक्रम चालवला म्हणून कित्येक पुण्यवंत झाले आहेत. अशी दानं ब्रह्माच्या नांवाने जसें ब्रह्मदेव ती करत आहेत अशा अभिनिवेशांने, ब्रह्माचे सेवक म्हणून ते करावयाचे असते, त्यामुळें दुरभिमान संपुष्टात येतो. दान करतांना दान घेणार्याबद्दल तुच्छतेची वागणूक जाणता अथवा अजाणता असेल तर ते दान व्यर्थ जाते. दान घेणारासुद्धा ब्रह्माचेच रुप आहे अशा विनम्र भावाने दान करणार्याच्या व त्याच्या सेवकांच्या मनांत असणे जरुरीचे असते. अशा दानांने त्याला अश्वयज्ञ केल्याचे फायदे होत असतात. त्यामुळें तसे यज्ञ न करता केवळ तीर्थक्षेत्री दानं करणे हेंच पुष्कळ वेळा हितकारक समजले जाते. विशेष म्हणजे ते कोणीही करू शकतो त्यासाठी फक्त तो करणारा सत्त्वशिल [तपश्चर्या करणे, खरे बोलणे, हित करणे, क्षमा करणे, वासनांना आवर घालणे आणि वेदांचा अभ्यास (ज्ञानसाधना) करणे ही सत्त्वशिलतेची लक्षणे आहेत], सात्त्विक, इंद्रीय संयमी असा व्रतस्थ [ब्रह्मचर्य, मनो निग्रह (क्रोध, लोभ आणि मोह ह्यांचे नियंत्रण), शांत वृत्ती, मर्यादा हि साधारण व्रतस्थतेची लक्षणे आहेत] असला पाहिजे मग तो कोणी क्षत्रिय, वैश्य अथवा शुद्र असला तरी चालते, हे ह्या तीर्थाटनाचे विशेष महत्व आहे. यज्ञासाठी यजमान विशेष अधिकारी असावा लागतो तसे बंधन तीर्थाटनात नसते. पूर्ण पश्चात्ताप केलेला कोणीही स्त्री, पुरुष अथवा इतर कोणी अशारितीने तीर्थाटन करतो तो ब्रह्माच्या कृपेत जातो, त्याचे नित्य भले होते. इतके पुष्करचे महत्व सगळ्या तीर्थक्षेत्रात आहे. जो बारा वर्षे पुष्कर मध्ये तपश्चर्या [विपाशना साधना करणे अथवा विचारशून्य अवस्थेत चित्त राखणे. त्यासाठी श्वासोंश्वासावर चित्त केंद्रीत करावयाचे असते. त्याला ध्यानसाधना असें म्हणतात ती न थांबता सातत्याने केल्यास ती तपश्चर्या ठरते.] करतो आधी दिल्याप्रमाणे, तो मोक्ष प्राप्त करत असतो, त्याला पुन्हा जन्मजन्मांतरीच्या फेर्यात अडकावे लागत नाही. त्याला सगळ्या यज्ञांचे लाभ होत असतात. आता सांगतो, यज्ञापेक्षा तीर्थयात्रा जास्त सोयिस्कर असते त्याची कांही उदाहरणे दाखवतो, शंभर वर्षे अग्निहोत्र सांभाळणार्यास जो पुण्यप्रभाव प्राप्त होतो तेवढां पुण्यप्रभाव प्राप्त होण्यासाठी

केवळ एक कार्तिक महीना पुष्कर मध्ये ध्यानसाधना केल्यामुळें होते. तेथे तीन शुभ्र टेकड्या व तीन झरे प्राचीन काळापासून आहेत, त्यांना पुष्कर कां म्हणतात ते कोणालाच माहीत नाही. त्या पवित्र स्थळी जाणे, तेथे ध्यानसाधना करणे, तेथे रहाणे हे सगळे फार अवघड असते. तेथे साधना करणे म्हणजे, मिताहार करणे (आवश्यक तेवढेंच खाणे), विचारशून्य अवस्थेत ध्यान करणे, इतर वासनांचा नाश करणे आणि दररोज त्या परिसराला एक प्रदक्षिणा करणे असे बारा रात्री करावयाचे असते. त्याशिवाय जर जंबूमार्गाने गेले तर ते जास्त श्रेयस्कर ठरते. जंबू मार्ग येथे देवतांची वस्ती असते, जे कोणाही मर्त्य माणसाल दिसत नाहीत. ऋषी आणि पितर तेथे जाऊन ध्यान करतात त्यामुळें त्यांना अश्वयज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त होते. जंबूमार्गी जो पांच दिवस रहातो त्याचे सगळे पाप धुतले जाते. अशी व्यक्ती कधीच नरकात जात नाही. तेथून **तंडुलिकाश्रमी** जावयाचे असते. तेथे राहून जे विचारशून्य अवस्थेत ध्यानसाधना करतात व ब्रह्मचर्य पालन करतात ते ब्रह्माला जाऊन मिळतात. नंतर जे अगस्त्य तलावाकडे जातात, आणि दैवतांची व पितरांची तेथे पुजा करतात, निर्जळी तीन दिवस उपवास करतात, त्यांला अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे पुण्य मिळते. त्या जागेवरून पुढे जाणारा जो फक्त फळें खाऊन रहातो तो कौमर अवस्थेत जातो. तेथून **कण्व मुनींच्या आश्रमा**कडे जावयाचे असते. त्याची पुजा सगळे ज्ञानी जग करते. तेथे एक पवित्र वनश्री आहे. अरें भिष्मा, असें सांगतात, फार प्राचीन काळांपासून असा समज आहे किं, त्या वनात प्रवेश करणार्याची सगळी पापं धुतली जातात. तेथे राहून मिताहार करून जे पितरांचे पुजन व ध्यान करतात ते त्यांच्या सगळ्या इच्छापूर्तीचे फळ मिळवतात. जी मिळवण्यासाठी एरवी त्या त्या प्रकारचे विविध यज्ञ करावे लागतात. त्या आश्रमाला प्रदक्षिणा केल्यानंतर त्या स्थानी जावयाचे असते जेथे ययाति स्वर्गातून पडला होता. तेथे जाणार्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होते. तेथून यात्री **मलयकल** कडे जातात, तेथे **कोटी** नांवाचे क्षेत्र आहे, तेथे ध्यान साधना व स्नान करणे पुण्यकारक समजले जाते. तेथे स्नान करण्याने अश्वयज्ञ केल्याचे पुण्य मिळते. पुण्यवंत लोक तेथून **स्थानूक्षेत्री** जातात. ते उमाचे स्थान आहे. जी भद्रवताची अर्धांगिनी म्हणून समजली जाते. तेथे जाऊन जे इशानदेवावर ध्यान करतात त्यांना अमाप संपत्तीलाभ होतो असें समजतात. तेथे खरी साधना करणार्यांना महादेवाच्या

कृपेने गाणपत्य स्थान प्राप्त होते. त्यामुळें निर्विघ्न कार्यसिद्धी प्राप्त होते. त्यानंतर तो तीर्थयात्री नर्मदेच्या कडे जातो. तेथे पितरांना पाण्याचे अर्घ्य दिल्यामुळें पुन्हा अश्वयज्ञ केल्याचे भाग्य त्याला मिळते. तेथून जो तीर्थयात्री ब्रह्मचर्य सांभाळून तपश्चरण [डोळे मिटून श्वासोंश्वासावर लक्ष केंद्रीत करून विचारशून्य अवस्थेत ध्यान करणे, ह्याला विपाशना, सहज प्राणायाम, सोहंम साधना अशी विविध नावे आहेत] करत रहातो त्याला अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे फायदे होतात व तो स्वर्गात जातो त्याच्या मरणानंतर. त्या नंतर तो **चर्मावती** तेथे संयमित आहार, विहार आणि विचार असें जीवन जगत तो **रंतिदेवा**ची पुजा करतो. त्याला पुनः अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे फायदे होतात. त्या नंतर तो अरवली पर्वताकडे जातो जो हिमालयाचा धाकटा भाऊ समजला जातो. तेथे एक प्राचीन भुयार आहे. तेथे वसिष्ठांचा आश्रम आहे. तेथे एक रात्र रहावयाचे असते, त्यामुळें त्या यात्रीला संमृद्धी प्राप्त होते. तीर्थयात्रा काळात शुक्ल ब्रह्मचर्य पाळावयाचे असते. सर्व काळ ध्यानात (विचारशून्य अवस्था) रहाण्याचा प्रयत्न असावा लागतो. मौनव्रत सांगितले आहे. मिताहार, आराध्य दैवतेची आराधना करणे अशी व्रतस्थता (व्रतस्थतेचे विविध प्रकार प्रचारात आहेत) अपेक्षित आहे. त्या मनस्थितीत जो यात्री **पिंगानदी**त स्नास करतो, तो समृद्धी प्राप्त करतो, त्याला मानमरातब वास्तविक जीवनात प्राप्त होतात. तेथून तो **प्रभास** कडे जातो. तेथे हुताशनी सदैव उपलब्ध असतो. त्याशिवाय वायूदेव सुद्धा असतो. ते दोघे देवांची मुख मानली आहेत. तेथे स्नान करणार्याला अग्नीश्तोम, आणि अतिरत्र यज्ञ केल्याचे फळ मिळते. पुढे जेथे सरस्वती नदी समुद्राला मिळते तो प्रदेश येतो. त्या नदीत स्नान केल्याने तशीच फळं मिळतात. त्याला जीवनात यश प्राप्त होते व त्याच्या मार्गात कोणीही अडथळे निर्माण करू शकत नाही. तेथे तीन रात्री राहून पितरांना अर्घ्य देण्याने तो पुढील आयुष्यात पराक्रमी होतो. त्याला अश्वयज्ञ केल्याचे फायदे मिळतात. तेथून तो **वर्दन** कडे जातो, जेथे ऋषी दुर्वास ह्यांनी विष्णूला वर दिला होता. तेथे स्नान करण्यानेसुद्धा तसेंच वास्तविक फायदे होत असतात. तेथून तो द्वारकेला जातो. तेथे **पिंडारक** नदीत तो स्नान करतो. सगळी व्रतस्थता तशीच पाळावयाची असते. त्यामुळें त्याला धनलाभ होतो. त्या तीर्थावर जो योग्य व लायक आहे त्याला शिवाचे त्रिशूळ दिसते. तेथून त्याने त्या तीर्थक्षेत्री जावयाचे जेथे सिंधू नदी सागराला मिळते. त्या ठिकाणी तो शांतचित्ताने स्नान करतो. तेथे

स्नान करून जो वरुणाला अर्घ्य देतो त्याच्यावर वरुणदेव प्रसन्न होतो. तेथे शंकूकामेश्वर देवाची आराधना करावयाची असते. त्यामुळें अनेक यज्ञ केल्याचे भाग्य प्राप्त होते. त्यानंतर तो खरा तीर्थाटनी त्या क्षेत्राला एक प्रदक्षिणा घालून पुढे जाईल, तेथून तो त्या तीर्थक्षेत्री जाईल ज्याला सगळे **धृमी** म्हणून ओळखतात. ह्याच ठिकाणी सगळ्या देवांनी व प्रत्यक्ष ब्रह्मांनी शीवाची आराधना केली होती. त्या तीर्थक्षेत्री रुद्राची प्रार्थना करावयाची असते. त्यांमुळें अश्वयज्ञ केल्याचे लाभ होतात. विष्णूनी दैत्य व दानवांचा वध केल्यावर आत्मशुद्धीसाठी येथे आला व स्नान करून स्वताची शुद्धी केली होती. तेथून **विशुधरा** नांवाच्या पवित्र स्थळी जावयाचे असते. तेथे स्नान केल्याने अश्वयज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त होत असते. तेथे स्नान करून अर्घ्य देव व पितरांना दिल्याने तो तीर्थी विष्णूलोकात मृत्यू नंतर जातो. तेथे एक पवित्र सरोवर आहे. त्या ठिकाणी वसु असतात. त्या पवित्र स्थानाकडील पाणी प्यायल्याने वसु त्याच्यावर प्रसन्न होतात. त्या जवळ एक आणखीन तीर्थक्षेत्र आहे त्याचे नांव आहे, **सिंधूत्तम**. त्यात स्नान केल्याने सगळी पापं धुतली जातात. त्याशिवाय समृद्धी प्राप्त होते. त्याशिवाय उच्च दर्जाचे सुख प्राप्त होत असते. त्यानंतर आणखीन एक तीर्थक्षेत्र आहे त्याचे नांव आहे, **कुमारिका**. तेथे इंद्राचे वास्तव्य असते असें मानले जाते. तेथे सिद्ध ध्यानात रहातात कारण त्यांने अध्यात्मिक उद्धार सहजपणे होतो असें समजतात. कारण त्या साधनेमुळें साधकाच्या सहाही वासना (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) विरघळून जातात व चिरशांती प्राप्त होते. खरे ब्राह्मण त्या ठिकाणी स्नान केल्यानंतर चंद्रासारखे तेजस्वी होतात. त्यानंतर येथे तीर्थक्षेत्र **भद्रतुंगा**. त्या (तुंगभद्रा?) नदीवर स्नान केल्याने ब्रह्माच्या लोकात प्रवेश मिळतो असें समजले जाते. त्या नंतर येते तीर्थक्षेत्र ज्याचे नांव आहे, **पंचानंद**. येथे केवळ फलाहार (बिया काढलेल्या निव्वळ फळांच्या आहाराला शुद्ध अहिंसक शाकाहार मानले जाते, बाकीच्या शाकाहारात हिंसा होत असते म्हणून ते शुद्ध अहिंसक शाकाहारात समजले जात नाहीत), करावयाचा असतो. चित्तशुद्ध ठेवून ध्यानसाधना केल्याने पांच यज्ञ केल्याचे लाभ होतात असें मानले जाते. अशाप्रकारे वेदांत सगळ्या पवित्र तीर्थक्षेत्रांचा उल्लेख आहे. त्याशिवाय आणखीन तीर्थक्षेत्रे आहेत त्यांची माहीती सांगतो. असा तीर्थयात्रा करून माणूस ब्रह्माच्या जवळ जातो. अरें श्रेष्ठ भरतकुळातील योद्ध्या, यज्ञ करण्यापेक्षा

तीर्थयात्रा कां चांगल्या ते सांगितले. यज्ञ करतांना मुहूर्त साधावा लागतो त्याशिवाय इतर व्यवस्था तंतोतंत असावी लागते जे नेहमी जमेलच असें नाही, बर्याच इतर माणसांच्या मदतीशिवाय कोणताही यज्ञ करता येत नाही. तसे तीर्थयात्रेचे नसते. एकटा ती करू शकतो. त्यामुळें असे चुकीचे केलेले यज्ञ व्यर्थ जातात. ते तीर्थयात्रांत होत नाही. तीर्थयात्रेला मुहूर्त लागत नाही व इतर लोकांच्या योग्यतेचीसुद्धा आवश्यकता नसते. **योनी तीर्था**त स्नान केल्याने माणसाचा पुनर्जन्म देवतेच्या कुशीत होतो असें सांगतात. त्याच्या अंगावर जन्मतः रत्नजडीत दागिने असतात. त्यानंतर आहे, **श्रीकुंड** , तेथे स्नान केल्याने पुण्यप्रभाव वाढतो व समृद्धी प्राप्त होते. नंतर येते **विमल क्षेत्र** त्यात सोनेरी रंगाच्या मासोळ्या वावरत असतात. तेथे स्नान केल्याने तो वसव क्षेत्री (इंद्रलोक) जातो, मृत्यू नंतर. त्या स्नानाने त्याची सगळी पापं धुतली जातात. त्यानंतर येते **वितस्ता** नदी. तेथे पितरांचे श्राद्ध करावे असें सांगतात कारण तेथून केलेल्या श्राद्धामुळें पूर्वज मुक्त होतात आणि त्या नदीत स्नान केल्यामुळें वाजपेय यज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त होते. ती नदी कश्मीर प्रदेशात आहे. तेथे नाग तक्षकाचे स्थान आहे. त्यानंतर पहावयाचे तीर्थ आहे **वदव**. ते तिनही जगांत प्रसिद्ध आहे. तेथे संध्याकाळी स्नान करून त्यावेळी अग्नी देवतेचे स्मरण करून दुध, भात, लोणी ह्यांचा शिधा पितरांना अर्पून त्याशिवाय जे दान करता येईल ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार ते करून तेथे असलेल्या **सप्तज्वाळा** देवतेची पुजा करावी तिला दुध भात व लोणी असा मिश्र प्रसाद चढवावा. जाणकार सांगतात, ह्या तीर्थक्षेत्री पितरांना जे दिले जाते ते त्यांना नित्य पुरेसे असते, म्हणजे अरें भिष्मा, त्यानंतर जरी तुम्ही पुनः श्राद्ध करण्यास राहून गेलात तरी त्यामुळे पितर अशांत होत नाहीत. ऋषी, गंधर्व, पितर, देव, अप्सरा, गुह्यक, किन्नर, यक्ष, सिद्ध, विद्याधर, राक्षस, दैत्य, रुद्र आणि ब्रह्म स्वतः त्याने प्रसन्न होतात. म्हणजे सगळेच शांत होतात. कोणाच्याही प्रकोपाचा त्रास होत नाही, असें करणार्या यात्रेकरूस.

अरे भिष्मदेवा, त्याग बुद्धीने बैराग्यपूर्ण जीवन स्वीकारून, एक हजार वर्षे विष्णूने तप केले. त्यावेळी दुध भात लोणी असा प्रसाद देऊन केशवाची कृपा मिळवली. त्यात सात वेळा ऋचा गाऊन तो प्रसाद देवतेला वाहीला. अशारितीने प्रसंन्न झालेल्या केशवांने आठ सद्‌गुणांचे [निर्हेतुक दानं करणे, निर्हेतुक भेटवस्तु देणे, तपश्चर्या करणे, खरे बोलणे, हित

करणे, क्षमा करणे, वासनांना आवर घालणे आणि वेदांचा अभ्यास (ज्ञानसाधना) करणे अशा आठ सद्गुणांमुळें माणसाला सत्याच्या दिशेने (पुण्याच्या दिशेने) नेण्यास सहाय्यभूत ठरतात.] दान दिले. त्याना ऐश्वर्य असें म्हणतात. त्याशिवाय आणखीन खूप कांहीं दिले. ते करून तो देव अदृष्य झाला. जसें आकाशात ढगांतून वीज चमकून जाते. म्हणून ह्या तीर्थाला **सप्तचारु** असें नाव पडले. जर कोणी चारु (इंद्रासारखा) तेथील सप्तज्वाळा देवीला देईल तर त्याला अमाप संपत्ती आणि शंभर राजसूय यज्ञ केल्याचे भाग्य, शंभर अश्वयज्ञ केल्याची प्रतिष्ठा प्राप्त होते. ते झाल्यावर तीर्थयात्री **रुद्रपाद** नांवाच्या तीर्थक्षेत्री जातो. तेथे महादेवाचे दर्शन होते. त्या दर्शनाने त्याला अश्वयज्ञ केल्याची प्रतिष्ठा प्राप्त होते. तिथून निघालेला शांतचित्त व शुक्ल ब्रह्मचर्य पालन करणारा असा **मणिमत** कडे जातो. तेथे एक रात्र राहील्यानंतर, अग्नीश्तोम यज्ञ केल्याची पत प्राप्त होते. त्यानंतर यात्री **देविका** नांवाच्या जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्री जाईल. असें सांगतात, ह्या ठिकाणाहून ब्राह्मण पहिल्या प्रथम उत्पन्न झाले. त्या ठिकाणा पासून जवळच एक जागा आहे जेथे त्रिशूळधारी महादेवाचे स्थान आहे. तेथे जी नदी आहे तिला देविका असें म्हणतात. त्यामध्ये स्नान केल्यामुळें व महादेवाची पुजा आपापल्या क्षमतेनुसार केल्याने त्या प्रमाणे फळ मिळते. त्यावेळी दुध भात व तुपाचा प्रसाद द्यावयाचा असतो. अशी पुजा मनोभावे करणार्या भक्तावर महादेव अतिप्रसन्न होतात व त्याच्या सर्व इच्छा (पुढच्या जन्मी) पूर्ण करतात. पुढे एक आणखीन तीर्थक्षेत्र आहे त्याचे नांव **कामाख्या** (आसाम मध्ये) असें आहे. तेथे वहाणार्या नदीत स्नान केल्याने माणूस त्याच्या कामात यशस्वी होतो व पूण्य मिळते. तेथे असलेल्या योजना, ब्रह्मपुत्रा आणि पुष्पंम्वा नदीत स्नान केल्याने सर्वप्रकारच्या दुःखापासून मुक्त होतो. ह्या देविका क्षेत्राचे क्षेत्रफळ पांच योजनं लांब व अर्धा योजनं रुंद असें आहे. त्या भागात कोठेही यात्री आपले विधी करू शकतो. त्यानंतर **दीर्घसत्र** नांवाचे क्षेत्र आहे. त्या प्रदेशाची देवता आहे ब्रह्मा. सिद्ध, महान ऋषी नियमितपणे व्रतस्थ जीवन जगत वेदांतील कवनांचे गायन करत एक मोठा यज्ञ करत असतात. असा यज्ञ केवळ ह्या तीर्थक्षेत्री केला तरच राजसूय आणि अश्वयज्ञ केल्याचे लाभ प्राप्त होतात. ते झाल्यावर पुढे **विनाशन** आहे. तेथे सरस्वती मेरूच्या उदरात शिरते व पुन्हा **चमसोद्भेदा**, **शिवोद्भेदा**, **नयोद्भेदा** ह्या ठिकाणी बाहेर येते. चमसोद्भेदा मध्ये स्नान केल्याने अग्नीश्तोम यज्ञाचे पुण्य

प्राप्त होते, शिवोद्भेदा मध्ये स्नान केल्याने समद्धी प्राप्त होते, आणि नयोद्भेदामध्ये स्नान केल्याने त्याला नागलोकांत प्रवेश मिळतो. त्यानंतर एक दुर्गम्य असें तीर्थ क्षेत्र आहे. त्याचे नांव आहे, **शसयान**. तेथे त्या नदीवर बागडणारे करकोचे लुप्त होतात परंतु, पुन्हा कार्तिक महीन्यात दिसू लागतात. तेथील सरस्वतीमध्ये स्नान केल्याने तेज वाढते. त्यानंतर येते, **कुमारकोटी**. तेथे पितरांचे श्राद्ध केल्याने पितर कायमचे तृप्त होतात. पुन्हा श्राद्ध करण्याची गरज रहात नाही. त्यानंतर आहे **रुद्रकोटी** असें सांगतात किं, फार प्राचीन काळी तेथे दहालक्ष मुनी जमा झाले होते. महादेवाचे साक्षात दर्शन घेण्यासाठी. तेथे जमलेला प्रत्येक मुनी बोलत होता, "मी देवाचे दर्शन सर्वात आधी घेणार", त्या सर्वांना एकाच वेळी दर्शन घेता यावे म्हणून, महादेवांनी जितके मुनी तितकी रुप घेतली व त्या सर्वांचे समाधान केले. कारण त्यातील प्रत्येक समजत राहिला किं, महादेवांनी त्यालाच प्रथम दर्शन दिले! त्या मुनींची भक्ती पाहून संतुष्ट झालेले महादेव त्यांना आशिर्वाद देतात कीं, तुमची सत्त्वशिलता अशीच वृद्धींगत होत राहो अशी आख्यायिका आहे. पुलस्त्य भिष्माला पुढे सांगतात, रुद्रकोटीच्या सत्त्वशिल यात्रेमुळें अश्वयज्ञ केल्याचे फळ मिळते. त्याशिवाय पूर्वजांची मध्यावस्थेतून (पिशाच्च अवस्था) सुटका होते व त्यांचा पुढील प्रवास सुरू होतो. त्यानंतर जेथे सरस्वती समुद्राला मिळते ते क्षेत्र आहे. असें समजले जाते किं, ह्या ठिकाणी सगळे देव ब्रह्माच्या नेतृत्वाखाली केशवाची पुजा करतात. तो दिवस असतो, शुक्ल चतुर्दशीचा व महीना असतो चैत्र. ज्या लोकांनी संपत्ती मिळविण्यासाठी कुकर्म केले आहे, ते जर त्या वेळी मोठी दान गरीबांना करत असतील तर त्यांची त्या पापातून सुटका होते असें सांगतात. अशा साठी सगळे ऋषी अशा सगळ्या तीर्थक्षेत्री परिक्रमणा करत असतात. त्यांची तपश्चर्या त्याजागी केल्याने ती जास्त लाभदायक होत असते. म्हणून यज्ञ करण्यापेक्षा तीर्थाटन करणे श्रेयस्कर समजले जाते असे पुलस्त्य भिष्माला सांगतात. अशारितीने तीर्थयात्रा पर्वाचा तिसरा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग चौथा

पुलस्त्य पुढे बोलतात, त्यानंतर **कुरुक्षेत्री** जावयाचे असते. त्या तीर्थक्षेत्राचे खास असे किं, तेथे गेलेल्या कोणालाही त्याच्या पापांचा नाश झाल्याचे जाणवते. जर तो कायम कुरुक्षेत्री रहाण्याचाच निर्धार करतो. कुरुक्षेत्राची धूळ ज्याच्या अंगावर तेथील वारा टाकतो त्यामुळें त्याचे पाप नाहीसे होते. त्याचे मृत्यूनंतरचे जीवन (प्रेतावस्था, पिशाच्च अवस्था) सुसह्य होते. कुरुक्षेत्रात सरस्वतीच्या दक्षिणेस आणि दृशद्वती नदीच्या उत्तरेस जे रहातात ते जणू काय स्वर्गातच रहात असतात. प्रत्येकांने एक महीन्याचा काळ त्या परिसरात आपले जीवन व्यतीत केले पाहिजे, जेव्हां तो सत्त्वशिल राहून तपश्चरण करत असेल, त्यामुळें त्याचा अध्यात्मिक उत्कर्ष होतो. त्याशिवाय **ब्रह्मक्षेत्र** आहे, तेथे ब्रह्मासोबत सगळे स्वर्गातील शुद्ध प्रजाती (ऋषी, सिद्ध, चरण, गंधर्व, अप्सरा, यक्ष, नांग इत्यादी) येऊन जाऊन रहात असतात. ज्याला पापमुक्त व्हावयाचे आहे त्याला त्या तीर्थक्षेत्राला जाणे श्रेयस्कर आहे. ती दोन तीर्थक्षेत्र इतकी प्रभावी आहेत किं, तुम्ही शरीराने कोठेही असा, जरी मनानें तेथे गेलात तरी त्याचा लाभ होत असतो. म्हणून सत्त्वशिल तपश्चरण करणार्यानि मनाने तेथे असल्याचे समजून आपली साधना केली तरी ती फळते.

पवित्र मनाने जो कुरुक्षेत्री वस्ती करतो त्याला राजसूय यज्ञ केल्याचे फायदे होतात. त्यानंतर येते **कुबेराचे तीर्थक्षेत्र**, तेथे पुजा केल्याने हजार गाई दान केल्याने जे पुण्य प्राप्त होते ते प्राप्त होते. त्या क्षेत्राचे नांव आहे **मनकनका**. ते तेथे असणार्या त्या नांवाच्या यक्षाच्या नावावरून घेतलेले आहे. त्यानंतर, अरे राजा (भिष्मा), विष्णूचे क्षेत्र येते. जेथे हरी सदैव उपस्थित असतात. तेथे पुजा व ध्यानसाधना करण्याने हजारो गाई दान केल्याने मिळणारे पुण्य प्राप्त होत असते. त्याला हरीचे द्वार (**हरद्वार**) असें म्हणतात. येथे तपश्चरण करणारा विष्णूलोकी जातो मृत्यूनंतर. त्यानंतर येते **परिप्लव** तेथे स्नान करण्याने अग्नीश्तोम व अतिरत्र अशा यज्ञांपेक्षा मोठे श्रेय प्राप्त होते. त्यानंतर आहे **पृथ्वी तीर्थ**, त्यानंतर येते **शालुकीनी** तीर्थ, तेथे असलेल्या झर्यात आंघोळ केल्याने दहा अश्वमेध यज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होते. त्या झर्यालासुद्धा **दशश्वमेधा** असेंच नांव आहे. त्यानंतर येते **सर्पादेवी**, हे नांगांचे तीर्थक्षेत्र आहे. तेथे पुजा करून ध्यानसाधना केल्यामुळें अग्नीश्तोम यज्ञाचे फल मिळते. त्याशिवाय नागलोकांत मान्यता प्राप्त होते. त्यानंतर आहे **तरंतुक**, तेथे

एक रात्र रहावयाचे असते. त्यामुळें एक हजार गाईचे दान केल्याचे श्रेय प्राप्त होते असं समजले जाते. त्यानंतर संयमित मनस्थितीत यात्री **पंचानंद** नांवाच्या तीर्थक्षेत्री जातो. तेथे असलेल्या तीर्थास **कोटी** असें नांव आहे. तेथे ध्यानसाधना एक रात्रभर केल्यानें अश्वमेध यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर **आश्विनीकुमारांच्या तीर्थक्षेत्री** येतो. त्यानंतर येते **वराह** (डुक्कर तीर्थ) तीर्थ, असें सांगतात, येथे विष्णू वराहाच्या रुपात प्रथम उभा होता. ह्याठिकाणी स्नान करण्याने अश्वमेध यज्ञाची फळं मिळतात. त्यानंतर आहे **सामजयंती** तीर्थ. तेथे स्नान केल्याने (स्नान म्हणजे त्यात ध्यानसाधना, तपश्चरण असें सगळे विधी अभिप्रेत असतात) राजसूय यज्ञाचे फळ मिळते. त्या जवळ एक आणखीन तीर्थक्षेत्र आहे, **एकहंस** नावाचे. तेथे स्नान करण्याने हजार गाईचे दान केल्यासारखे पुण्य मिळते. त्यानंतर येते **कृतसौच**, तेथे तपश्चरण केल्याने विष्णू लोकाचे दरवाजे उघडतात, मृत्यूनंतर. त्यानंतर येते **मुंजावत**. हे तीर्थक्षेत्र स्थानुला फारच प्रिय आहे. तेथे एक दिवस व रात्र निर्जळी उपोषण केल्याने व त्याबरोबर स्थानुचा जप केल्याने गाणपत्य दर्जा साधकाला मिळते म्हणजे तो शंकराच्या गणात समाविष्ट होतो. त्यानंतर येते **यक्षिणी** तीर्थ. तेथे स्नान करून यक्षिणीची पुजा मनोभावे केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात. यक्ष आणि यक्षिणी सहज प्रसन्न होणारे असतात म्हणून, अरे भिष्मा, त्या तीर्थक्षेत्राचे महत्व जनसामान्यांसाठी विशेष असते. योगक्षेमात यक्षांची मदत घेण्याचे वेदात सांगितले आहे. त्या मानाने हे तीर्थक्षेत्र ऋषी मुनी, सिद्ध, साद्ध्य अशांसाठी तेवढे खास नसले तरी जनसामान्यासाठी विशेष आहे. म्हणून ते क्षेत्र कुरुक्षेत्राचा दरवाजा असें मानतात. यात्री मनोभावे त्या क्षेत्राला प्रदक्षिणा घालतात. ते बर्याच अंशी **पुष्कर** एवढे महत्वाचे असते, ज्यांना मोक्षापेक्षा वास्तविक जीवनात जास्त रस आहे. त्याची निर्मिती जमदाग्नीच्या मुलांनी परशुरामाने जनसामान्यांसाठी केली असे सांगतात. तेथे पितरांची व देवांची पुजा करून नेमस्त जीवन (सर्व विकार, वासना ह्यांच्या मर्यादा राखून त्यात रहाणे) सांभाळले तर अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तो सर्वस्वी यशस्वी होतो. त्यानंतर येते **रामह्रद** क्षेत्र. त्याची कथा अशी आहे. ती तुला सांगतो, "परशुरामांने रागाच्या भरात असंख्य भ्रष्ट क्षत्रियांचा नायनाट केला, त्याच्या रक्ताने पांच तलाव भरले गेले इतके रक्त त्यानी जमिनीवर सांडले होते. त्या रक्तानेच अर्घ्य परशुरामाने त्याच्या पितरांना दिले व विनंती केली कीं, माझ्या हातून मोठे

पापकृत्य झाले आहे. त्यापासून माझी मुक्ती व्हावी". त्या रक्ताच्या अर्घ्याने संतुष्ट झालेले त्याचे पितर त्याला सांगतात किं, "ते भ्रष्ट क्षत्रिय तुझ्याकडून मारले गेले ती ब्रह्माचीच रचना होती. म्हणून तू त्यातून मुक्त होत आहेस". त्या  नंतर राम त्याच्या पितरांस विनंती करतो कीं, त्याला एक वर मागावयाचा आहे व जर ते खरोखरच त्याच्यावर प्रसन्न झाले असतील तर ते त्याला तो वर देतील. ते ऐकल्यावर त्याचे पितर त्याला विचारतात, कीं, त्याला कोणता वर पाहिजे. ते ऐकल्यावर तो क्षत्रिय त्याचे दोनही हात जोडून विनंती करतो कीं, माझी तपोसाधना पुनः पहिल्यासारखी यथोचित सुरु होवो. त्याला ते अनुमति देतात. त्या नंतर परशुराम आणखीन बोलतो कीं, त्याची इच्छा आहे किं, हे पांच तलाव जे आज रक्ताने भरलेले आहेत ते पुढील पिढ्यांसाठी तीर्थक्षेत्र व्हावे. म्हणून त्या रक्ताच्या तलावात स्नान केल्याने स्वर्गात जाण्याचे मागितले, तेसुद्धा पितरांनी मंजूर केले. त्यापुढे जे येथे पितरांचे श्राद्ध मनोभावे करतात त्यांच्या अशक्य मनिषासुद्धा सिद्ध होतील असे सांगितले. त्यानंतर ते पितर अदृष्य झाले. शुक्ल ब्रह्मचर्य पाळून इतर व्रतस्थता सांभाळून तपश्चरण करणार्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतील. त्यानंतर येते **वंशमुलक** तीर्थक्षेत्र. ह्या क्षेत्री स्नान करणार्याचा वंश वाढत जातो. निःसंतान लोकांनी येथे स्नान करावयाचे असते. त्यानंतर आहे **कायाशोधन** क्षेत्र. येथे स्नान केल्याने माणसाच्या अंगातील सगळ्या व्याधी नष्ट होतात. त्यानंतरचे तीर्थक्षेत्र आहे **लोकोदर**. ह्याठिकाणी सृष्टीच्या निर्मितीचे काम आरंभले गेले असे समजतात. त्यानंतर आहे **श्रीतीर्थ**. तेथे स्नान करून साधना केल्याने पितर संतुष्ट होतात. ब्रह्मचर्य आचरणाने पितर स्वतःहून मदत करण्यासाठी येतात असे समजले जाते. त्यानंतर आहे **कपिल तीर्थ**. येथे स्नान साधना केल्याने अन्न धान्याची समृद्धी विपुल होते असें समजले जाते. त्यानंतरचे तीर्थ आहे **सूर्यतीर्थ**. येथे निर्जळी उपवास करून ध्यानसाधना करणार्याला अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तो अंति सूर्यलोकात जातो. त्यानंतर आहे **गोभवन** तीर्थक्षेत्र. तेथे स्नान केल्याने हजार गाईंचे दान केल्याचे पुण्य मिळते. त्यानंतर आहे तीर्थ **शंखिणी**. त्यात व **देवीतीर्था**त स्नान करण्याचे तसेंच फायदे  आहेत. अरे भिष्मा, त्यानंतर तो यात्री **तरंदक** तीर्थाकडे जाईल. ते सरस्वती नदीच्या तटावर आहे. त्याची प्रमुख देवता आहे यक्षपती कुबेर. जो स्वर्गाचा द्वारपाल आहे. त्या तीर्थक्षेत्री स्नान करण्यामुळें अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय लाभते. त्यानंतर येते त्या

तीर्थाचे नांव आहे **ब्रह्मावर्त**. त्या ठिकाणी आंघोळ केल्यामुळें ब्रह्मलोकात प्रवेश मिळतो मृत्यू नंतर. त्यानंतर येते त्या तीर्थाचे नांव आहे, **सुतीर्थ**. त्या तीर्थावर सगळे पितर आणि देव सदैव उपस्थित असतात. तेथे संयमित जीवन राखून ध्यान साधना करणार्याने स्नान केल्यावर तो मृत्यूनंतर थेट पितृलोकात जातो. त्याच प्रमाणे, त्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळत असते त्याचा लाभ त्याला ह्या जन्मात होऊ शकतो. **आम्वुमती** कडे असलेले तीर्थ सुतीर्थ, हे एक उत्तम तीर्थक्षेत्र आहे. त्यानंतर येते **काशीश्वर** तीर्थ. तेथे स्नान करणारा सगळ्या व्याधी मुक्त होतो. त्याला ब्रह्मलोकी फार मान मिळतो. **मत्री** तीर्थात स्नान करणार्याचे वंश चांगले वाढतात. तसेंच पुत्र प्राप्तीसाठी तेथे स्नान करण्याचा प्रघात आहे. **शीतवन** तीर्थाकडे जाण्या आधी मनोनिग्रह, शांतवृत्ती, वासनाक्षोभ विमुक्त असा तो असावा लागतो. त्या तीर्थामध्ये यात्री केशवपन करून घेतो. त्याप्रकारचे आणखीन एक तीर्थ आहे त्याचे नांव आहे **श्वविलोमपाह**, तेथे विद्वान ब्राह्मणांना फार संतोष होतो. तेथेसुद्धा केशवपन करावे लागते. त्यानंतर आंघोळ करावयाची असते. तेथे प्राणायाम करून देह शुद्धी करावयाची असते. तेथे ऋषी फार काळ ध्यानात बसणे प्रशस्त समजतात. त्यानंतर येते **दशअश्वमेधिका**. तेथे स्नान करण्यामुळें आत्मशांती मिळते. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **मनुषा**. अशी आख्यायिका आहे कीं, फार प्राचीन काळी व्याधांनी मारलेल्या शरांमुळें अनेक काळवीट मरून तेथील पाण्यात बुडाली, त्यांचा जन्म झाला माणसांत. ब्रह्मचर्य आचरणार्यांनी तेथे स्नान करावयाचे असते. त्याची सगळ्या पापांपासून मुक्तता होते व स्वर्गात जातो असा समज आहे. मनुषाच्या पूर्वेस अपगा नावांची नदी आहे. तेथे सिद्धांचे मोठा स्थान आहे. तेथे धान्याचे दान करणारा पितरांची कृपा मिळवतो. जर तेथे एका ब्राह्मणांला भोजन दिले तर ते दहा हजार ब्राह्मणांना भोजन देण्याइतके पुण्यकारक समजले जाते. त्या तीर्थावर एक रात्र राहून पितर व देवांची पुजा करणार्याला अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येते **ब्रह्मोदुम्वर** तीर्थ, तेथे सप्तर्षींच्या नावाने कुंड आहेत त्यात स्नान करावयाचे असते . त्यानंतर येते **केदारनाथ** तीर्थ. ते फार उंचीवर आहे. जाण्यासाठी मुष्किल असे आहे. तेथे केवळ जाण्याने सर्व पाप धुतली जातात असा समज आहे. तेथे साधना करणार्याला अणिमा सिद्धी प्राप्त होऊ शकते. त्याच्या मदतीने तो अदृष्य होऊ शकतो. त्यानंतर येते त्या तीर्थाचे नांव आहे **शरक**. तेथे महादेवाचे दर्शन

होऊ शकते जर यात्री खरोखरच पवित्र असेल. असें मानतात किं, कृष्ण चतुदर्शीच्या समयी त्याने मागितलेले सगळे त्याला प्राप्त होते. **शरक** व **रुद्रकोटी** मध्ये जे तलाव, कुंड आहेत तेथे असे समजतात कीं, ती तीस लाख तीर्थस्थानं आहेत. तेथे आणखीन एक तीर्थक्षेत्र आहे, त्याचे नांव आहे, **इलस्पाद**. तेथे स्नान केल्यामुळे पितर आणि देवांची पुजा केल्यामुळें तो कधीही नरकात जात नाही व त्याला वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येतात **किंडन** व **किंजप्य** तीर्थक्षेत्रे. तेथे बसून भक्ती केल्यास, वेदांचे पठण केल्यास मोठे पुण्य मिळते. त्यानंतर आहे **कलशी**, तेथे तपश्चरण करून स्नान केल्यास अग्नीश्तोम यज्ञाचे श्रेय मिळते. शरकाच्या पूर्वेस आणखीन एक तीर्थक्षेत्र आहे, त्याचे नांव आहे **अनाजन्म**. ते नारदांचे स्थान आहे. जो तेथे प्रार्थना करून नारदांची पुजा करतो त्याला मृत्यूनंतर नारद त्यांच्या स्वर्गातील प्रदेशात जागा देतात. शुक्ल दशमीच्या वेळी यात्री **पुंड्रीका** तीर्थासि जाईल. तेथे स्नान करून ध्यान करणार्या माणसास पुंड्रीका यज्ञाचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **त्रिपीश्तप**. ते तिनही लोकांत प्रसिद्ध आहे. तेथे वैतरणी नदी वहाते. त्या नदीत स्नान करावयाचे असते. तेथे स्नान करण्याने सगळी पाप धुतली जातात. तेथे शंकराचे दर्शन होते जर तुमची योग्यता आहे. शंकराबरोबर नदी व त्रिशूळसुद्धा दिसतो. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र, **फलकीवन**. तेथे बसून देवांनी हजारो वर्षे ध्यानसाधना केली व ते देवत्वाला गेले. तेथे जाऊन साधना करण्याने अग्नीश्तोम व अतिरत्र अशा दोनही यज्ञाचे श्रेय मिळते. त्यापुढे एक तीर्थक्षेत्र आहे, **सर्वदेव**. त्यानंतर आहे **पनिखत**. तेथे स्नान करण्याने व साधना करण्याने राजसूय, अग्नीश्तोम व अतिरत्र यज्ञांपेक्षा मोठे श्रेय मिळते. त्यापुढे ऋषींचा प्रदेश सुरु होतो. तेथे तीर्थक्षेत्र **मिश्रक** आहे. अशी आख्यायिका आहे कीं, व्यासांनी सगळ्या ऋषींच्या सोयीसाठी सगळ्या तीर्थक्षेत्राच्या मिलाफातून एकतीर्थक्षेत्र तयार केले ते हे होय. म्हणून येथे स्नान करण्याने सगळ्या तीर्थात स्नान केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येते **व्यासवन**. त्यानंतर येते **मनोजव**. तेथे स्नान करण्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. त्यानंतर आहे **देवीतीर्थ**, ते मधुवटीत आहे. तेथे स्नान करण्याने व ध्यानसाधना करण्याने देवांची कृपा होते. त्यानंतर आहे **कौसुकी** आणि दृशद्वती नद्या. त्यांच्या तटावर सगळी तीर्थच तीर्थ आहेत. त्यानंतर **व्यासस्थली** येते. तेथे व्यास त्यांच्या पुत्रशोकानी व्याकुळ झालेले आत्महत्या करण्याचा

प्रयत्न करतात परंतु, देव त्यांना मरून देत नाहीत. (हे व्यास अतिप्राचीन आहेत, महाभारतकार कृष्णद्वैपायन नव्हेत) तेथे ध्यानसाधना केल्याने एक हजार गाई दिल्यासारखे पुण्य मिळते. त्यानंतर येते **किंदत्त**. असं सांगतात, जो त्या कुंडात तीळाचे दाणे टाकील त्या प्रमाणात त्याचे यश त्याला मिळेल. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **वेदी**. तशीच आहेत तीर्थक्षेत्रे **अहास** व **सुदीन**. त्यांचे सुद्धा तसेंच गुण आहेत. त्यानंतर **मृगधूम** नांवाचे क्षेत्र आहे. तेथे स्नान करण्याचे तसेंच फायदे आहेत. त्यानंतर येते **गंगानदी**. ती सगळीच तीर्थक्षेत्रमय आहे. सात्त्विक प्रवृत्तीच्या माणसांने महादेवाची भक्ती करत तिच्यात स्नान केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **वमनक** तीर्थ. तेथे **विष्णूपाद** मध्ये स्नान केल्याने व वामनावताराचे स्मरण केल्याने पापनाश होतो. तो विष्णूलोकी जातो. त्यानंतर आहे, **कुलंपुन** तेथे गेल्याने त्याच्या वंशाचा उद्धार होतो. तेथून तुम्ही **पवनह्रद** कडे जातो. ते क्षेत्र मरुतांचे आहे. तेथे कृपा होते वायुदेवाची. **अमरह्रद** मध्ये स्नान करण्यामुळें व इंद्राची पुजा केल्याने तो इंद्र लोकी जातो. तेथे तो बरीच वर्षे स्वर्गात रहातो. त्यानंतर **सलिसूर्य** तीर्थक्षेत्री असलेल्या **सलिहोत्र** ठिकाणी स्नान केल्याने तो अश्वविद्या संपन्न करण्यात यशस्वी होतो. सरस्वती नदीच्या किनार्यावर एक तीर्थ क्षेत्र आहे त्याचा नांव आहे **श्रीकुंज** . तेथेसुद्धा तसेंच फायदे होतात. त्यानंतर येते **नैमिषकुंज** . ऋषींनी त्यांच्यासाठी आराम करता यावा म्हणून हे क्षेत्र तयार झाले. तेथे स्नान करण्याने अग्नीश्तोम यज्ञाचे फायदे होतात. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **कन्या**. त्यानंतर येते **तीर्थब्रह्म**. तेथे क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र स्नान करून ब्राह्मण होतात. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **सोम**. तेथे स्नान केल्यामुळें तो मृत्यूनंतर सोमलोकी जातो. त्यानंतर आहे **सप्तसारस्वत**. तेथे श्रेष्ठ ज्ञानी ऋषी मनकानक ह्यांनापूर्ण ज्ञान प्राप्त झाले. त्या तीर्थक्षेत्राची आख्यायिका सांगतो, फार प्राचीन काळी, एक ऋषी मनकानक नावांचा, स्वताच्या मनगटाला कुसाच्या धारदार पात्याने जखम करतो. तेव्हां त्यातून लाल रक्त येण्याऐवजी हिरवा पाल्याचा रस वाहू लागतो. ते पाहिल्यानंतर तो ऋषी आनंदाने नाचू लागतो. त्याच्या जटा मोकळ्या करतो व ते लांबच लांब केस उडवत तो बेभान नांचत रहातो, जणू काय महादेवाचे तांडवच असें ते नाचणे होते. ते पाहून त्या भागातील सगळे चर अचरसुद्धा नाचू लागतात. प्राण्यांबरोबर झाडे डोलू लागतात. त्यामुळें सृष्टीचे नियम मोडल्यासारखे होत होते. ते पाहून ब्रह्म व इतर

देव मनकानकाच्या कृतीमुळें व्यस्त होतात. ते महादेवाला भेटतात व मनकानकाची गोष्ट सांगतात. ते महादेवाला सांगतात मनकानक सृष्टीचे नियम मोडत आहे. असें कांहीं करा किं, ह्याचा नांच बंद होईल. ते ऐकून महादेवांना आनंद झाला. ते मनकानकाला भेटले. व म्हणाले, "अहो श्रेष्ठ ऋषीवर, आपण कां असें नाचत अहा? आपल्या अशा नांचण्या मागील कारण काय"? तो महान ऋषी बोलतो, "अहो पुण्यवान, मी एक बैरागी आहे. मी सत्याच्याच मार्गाने जाणारा आहे. तुम्हाला दिसत नाही कां, माझ्या नसांतून पाल्याचा हिरवा रस वहात आहे. ते पाहून मला अत्यंत आनंद झाला आहे. म्हणून मी नांचत आहे. ते ऐकून महादेव हसत त्याला सांगतात, त्यात नवल ते काय. पहा असें बोलून, महादेवांने त्यांच्या बोटाला त्यांच्या नखांने एक जखम केली. त्या जखमेतून पांढरी शुभ्र राख येऊ लागली. ते पाहून तो महान ऋषी शरमिंदा झाला व महादेवाच्या पाया पडला. त्याला समजते किं, रुद्रा पेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही. नंतर तो ऋषी महादेवाची स्तुती करू लागला. "अहो त्रिशूळधारी तू सगळ्या ऋषींचा त्राता आहेस. तू देव आणि असुरांचा आधार आहेस. तू ही सगळी सृष्टी चराचर उत्पन्न केली आहेस. तूंच ती सगळी पुन्हा गिळून टाकणार आहेस युगांती. तू कोणालाही पूर्णपणे समजला जाणारा नाहीस. मग मी तुला कसे समजणार? ब्रह्मा व इतर देव तुझ्यातूनच उत्पन्न झाले आहेत. तू सर्वस्व आहेस, निर्माता व विनाशकर्ता. तुझ्या कृपेमुळें ते देव मजेत त्याची कामं करत आहेत". अशी स्तुती केल्यावर तो ऋषी पुन्हा सांगतो, "अहो देवादिदेव, माझ्यावर कृपा करा. म्हणजे माझी तपस्या सदैव वृद्धींगत होत राहो". ते ऐकल्यावर तो कृपानिधी आनंदात त्या ऋषीला सांगतो, "अहो मनकानका, तू कळत नकळत सृष्टीचे नियम मोडत आहेस. खरे ज्ञानी असें करत नाहीत. म्हणून तू निसर्गनियमांचे उल्लंधन होणार नाही अशाप्रकारे तुझी सिद्धी वापरून ब्रह्माला त्याच्या कामात मदत केली पाहिजेस. तू जे हे करत आहेस त्यामुळे सृष्टीची शिस्त व मर्यादा बिघडत आहेत. ते तू करू नकोस. खर्या ज्ञानीप्रमाणे तू ह्यापुढे ब्रह्माने घालून दिलेले सृष्टीचे नियम मोडणार नाहीस. सृष्टीचे नियम मोडणारे चमत्कार करण्याचा मोह दैत्य, दानव ह्यांना होतो. तू ऋषी आहेस. देव आणि ऋषी ब्रह्माने दिलेल्या सृष्टीच्या नियमांत राहून त्याची कामं करत असतात. ते चमत्कार करत नाहीत". पुढे महादेव त्याला आश्वासन देतात कीं, "अहो ब्राह्मण, तुझी तपस्या अशीच माझ्या कृपेने

वृद्धींगतच होत राहील. आणि ह्यापुढे मी स्वतः तुझ्या बरोबर रहाणार आहे तुझ्या आश्रमात. येथे मी सप्तसारस्वतात स्नान करत राहीन. जे येथे येतील त्यांच्या सगळ्या कामना पूर्ण होतील. ते त्या मार्गाने सारस्वत प्रदेशात जातील" असें बोलून महादेव अंतर्धान पावले.

अशी ती आख्यायिका आहे, अरे भिष्मा, ह्या तीर्थक्षेत्राची. सारस्वत झाल्यानंतर तो यात्री **औषनास** नांवाच्या जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्री जाईल. भार्गवाची सेवा करण्यासाठी सगळे देव, ब्रह्मदेव स्वतः आणि ख्यातनाम कार्तिकेय त्या स्थानी दुपारी व संध्याकाळी हजर असतात. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **कपलमोच** जेथे स्नान केल्यामुळें सगळी पाप धुतली जातात. तेथे आंघोळ करण्याने सगळी पाप धुतली जातात. त्यानंतर तो यात्री **अग्नीतीर्था**कडे जाईल. तेथे ध्यानसाधना करून आंघोळ करण्याने तो अग्नी लोकात प्रवेश मिळवतो, त्याच्या वंशाचा उद्धार होतो, म्हणजे त्याच्या कुळांत लोकोत्तर पुरुष जन्म घेतात. अरे भरत कुळाच्या अग्रणी, आणखीन तीर्थक्षेत्र सांगतो ती समजून घे. एक तीर्थक्षेत्र आहे जे विश्वामित्राशी संबंधित आहे. तेथे स्नान केल्यामुळें तुम्ही ब्राह्मण होता. त्यानंतरचे तीर्थ आहे, **ब्रह्मयोनी**, शुद्ध चित्त व शरीराने जो तेथे तपोश्चरण करील त्याला ब्रह्मलोकी स्थान मिळते त्याच्या मृत्यूनंतर. त्याशिवाय त्याच्या मागच्या व पुढच्या अशा सात पिढ्यांचे भले होईल. **पृथोदक**, ह्याचा संबंध आहे कार्तिकेयाशी. तेथे स्नान करून पितराच्या वर ध्यान साधना करण्याचे फायदे सांगितले आहेत. तेथे स्नान केल्याने योगक्षेमाच्या कार्यामुळें जाणता अथवा अजाणता जे पाप आपण करतो त्यापासून मुक्ती मिळते. त्याशिवाय तेथे राहून ध्यानसाधना करत तपोश्चरण केल्याने अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त होते आणि तो मृत्यूनंतर स्वर्गात जातो. हे क्षेत्र कुरुक्षेत्रापेक्षा श्रेष्ठ आहे. पृथोदक हे सारस्वतापेक्षा जास्त श्रेष्ठ समजले जाते. जे तेथे मृत्यू पावतात साधना करत, त्यांचा उद्धार होतो. तो अमर होतो व कायम स्वर्गात जातो. त्याची स्तुती सनतकुमारांनी केली आहे. त्याचप्रमाणे व्यासांनीसुद्धा त्याचे कौतुक केले आहे. वेदांतसुद्धा त्याचा उल्लेख आहे. योग्य प्रकारे साधना करणार्यासाठी ह्याच्यापेक्षा जास्त हितकारक दुसरे तीर्थ नाही. त्यात स्नान करणारा निश्चितपणे स्वर्गात पोहोचतो त्याच्या मृत्यूनंतर. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **मधूश्रव** त्याचे नांव. तेथे स्नान केल्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य प्राप्त होते. त्यानंतर

**सरस्वती** व **अरुणा** ह्या नद्यांच्या संगमाचा प्रदेश एक तीर्थक्षेत्र आहे. तेथे उपोषण करून ध्यानसाधना केल्याने अग्नीश्तोम व अतिरत्र यज्ञ केल्याचे पूण्य मिळते. त्याच्या मागच्या व पुढच्या सात पिढ्यांचा उद्धार होतो. फार प्राचीन काळी ब्रह्मणांवर कृपा करण्यासाठी दर्भीने हे क्षेत्र तयार केले त्याचे नांव **अर्धकिल** आहे. तेथे केवळ स्नान करून कोणीही ब्राह्मण होतो जे एरवी, मंत्रोच्चारण करत उपोषण व इतर विधी करून ब्राह्मण व्हावे लागते, असें हे क्षेत्र आहे. असें समजतात दर्भीने येथे चार समुद्रांचे पाणी आणले होते. असे समजतात कीं, येथे स्नान करणार्याच्या सगळ्या विवंचना संपुष्टात येतात. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **शतसहस्रक**. त्याच्या जवळ आहे **सहस्रक**, त्यांच स्नान केल्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. तेथे उपोषण करून दानं केली तर परिणाम द्विगुणीत होतो. त्यानंतर आहे **रेणुका** क्षेत्र. तेथे स्नान करून पितरांचे श्राद्ध करावयाचे असते. त्याशिवाय अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. पुढे आहे **विमोचन** तीर्थ. दानं घेण्यामुळें जे पाप ब्राह्मणाला लागते त्यापासून मुक्त होण्यासाठी येथे ब्राह्मणांनी आंघोळ करावयाची असते. ब्रह्मचर्य आचरून ध्यानसाधना केल्याने दानांचे पापापासून विमोचन होते. त्यानंतर येते **पंचवटी**. तेथे गेल्याने मोठे पुण्य लाभते. त्यानंतर आहे वरुण देवाचे तीर्थ ज्याचे नांव आहे **तेजसा**. त्याचा स्वामी आहे योगीदेव म्हणजेच स्थानु. तेथे महादेवावर एकलक्ष केंद्रीत करून ध्यान केल्याने साक्षात शंकर प्रसन्न होतात. असें समजले जाते. तेथे सगळ्या देवांनी व ब्रह्मांनी गुह्य (शंकर) ह्याला त्यांचा प्रमुख म्हणून नेमले होते. त्याच्या पूर्वेस एक तीर्थ आहे त्याला **कुरु** म्हणतात. तपोश्वरण करणार्याने तेथे स्नान केल्याने त्याची आत्मिक शुद्धी होते कारण, तेथील देवता त्याला त्या कामात मदत करतात. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **स्वर्गद्वार**. तेथे हवन पुजन सरून स्नान केल्याने अग्नीश्तोम यज्ञाचे फायदे होतात व तो ब्रह्मलोकी जातो. त्यानंतर आहे **अनारक**. ह्या क्षेत्री स्नान करणार्यावर कोणत्याही प्रकारची आपत्ती येत नाही असा समज आहे. येथे सगळे देव ब्रह्मा आणि नारायण स्वतः नेहमी उपस्थित असतात. तेथे रुद्र व त्याची अर्धांगिनी सुद्धा असते. तेथे ध्यानसाधना करणार्याला दुःख भोगावे लागत नाही. असें सांगतात. त्यानंतर आहे तीर्थ **विश्वेश्वर**. त्याची देवता आहे साक्षात उमा. तेथे तपस्या करणार्यांना साक्षात नारायणाचे दुग्धसागरात बसलेला असे दर्शन होते असें अनुभवी सांगतात. तेथे तपस्या करणारा थेट विष्णूलोकी जातो. तेथे

स्नान करण्याने शाश्वत सुखाचा अनुभव मिळतो. त्यानंतर येते **स्वस्तिपूर**. तेथे प्रदक्षिणा कराव्या लागतात. त्यामुळें एक हजार गाई दिल्याचे पुण्य मिळते. त्यानंतर आहे **पवनतीर्थ**. तेथेसुद्धा इतर तीर्थक्षेत्रांप्रमाणेच स्नान करणे व इतर उपचार करणे आवश्यक असते. त्याने तसेंच लाभ होतात. सर्वच तीर्थक्षेत्री पितरांची पुजा हे समान आहे. त्याशिवाय देव व जेथे त्या क्षेत्राची देवता सांगितली आहे तेथे त्या देवतेची पुजा करावयाची असते. त्यानंतर आहे **गंगाह्रद** क्षेत्र. त्या जवळ आहे **कृपक्षेत्र**. तेथे एकंदर मिळून तीनशे लक्ष तीर्थक्षेत्रे आहेत. त्यांची देवता आहे महेश्वर. तेथे साधना केल्याने गाणपत्य स्थान मिळते. त्याच्या घराण्याचे कल्याण होते. त्यानंतर येते **स्थानुवत** क्षेत्र. तेथे स्नान करण्याने स्वर्ग मिळतो मृत्यूनंतर. त्यानंतर आहे **वदरीपचन**. तो त्या ऋषीचा आश्रम आहे. तेथे वसिष्ठ येऊन रहाता असं समजले जाते. तेथे फक्त लहान आकाराच्या करवंदाचे सेवन करावयाचे असते. जी तेथे वनात मिळतात. असें बारा वर्षे रहावे लागते. त्याशिवाय उपोषण करावयाचे असते, त्यामुळें तो चिरंजीव होतो. त्यानंतर येते **इंद्रमार्ग**. तेथे एक रात्र उपवास केल्याने व इतर नेहमीच्या गोष्टी सांभाळल्याने तो इंद्रलोकी जातो. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **एकरात्र**. तेथे व्रतस्थ राहून भोगेंद्रीयांचे संयमन करून जो रहातो तो ब्रह्माकडे जातो. त्यानंतर येतो **आदित्यचा आश्रम**. तेथे साधनायुक्त स्नान केल्याने तो यात्री आदित्याच्या लोकी जातो. त्याच्या वंशाचा उद्धार होतो. त्यानंतर **सोमतीर्थ** येते. त्यानंतर येते ज्याच्या फासळ्यांपासून इंद्राचे अस्त्र वज्र तयार झाले त्या दधीचीचे तीर्थक्षेत्र. **दधीची ऋषीचा आश्रम**. ते फार मोठे क्षेत्र आहे. येथे सारस्वत कुळांचा महा तपस्वी असा ऋषी अंगिरस जन्मला. तेथे स्नान पुजा केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येतो **कन्याश्रम** तीर्थक्षेत्र. तेथे तीन दिवस राहून मिताहार करतो त्याला उत्तम स्त्रीसुख मिळते. त्याशिवाय सर्व भोग संपल्यावर तो थेट ब्राह्माकडे जातो. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **सन्निहती**. तेथे व्रतस्थ राहून स्नान केल्याने शंभर अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तेथे होमहवन करून पुजा यज्ञ केल्याने नित्य स्वरुपाचे सुख मिळते. सगळी अशी क्षेत्रे नद्या, झरे, तलाव, कुंड , ह्यात देवदेवतांचा वास असतो म्हणून जेथे शुद्ध पाण्याचे स्थान आहे तेथे तसेंच उंच पहाडांवर देवदेवताची स्थानं असतात. ती सगळी तीर्थक्षेत्रात येतात. त्या सगळ्यांचा एकत्रितपणे उल्लेख सन्निहती म्हणून केला जातो. अरे राजा, आता मी सांगतो तुला अशा ठिकाणी

श्राद्ध करण्याचे फायदे काय असतात. सूर्यग्रहणाच्या काळात श्राद्ध करून शुद्धी स्नान केल्यास सर्व पितरांचे कल्याण होते. त्याशिवाय अश्वयज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होत असते. त्याची सगळी पाप स्नान केल्यामुळें धुतली जातात व तो निष्पाप होतो. तसा माणूस ब्रह्माच्या लोकी जाऊ शकतो. **कोटी**तीर्थात स्नान केल्याने कुबेर प्रसन्न होतो. **मचक्रुक** तीर्थक्षेत्री स्नान केल्याने त्याला समृद्धी प्राप्त होते. **गंगाह्रद** क्षेत्री स्नान केल्याने राजसूय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. **नैमिष** तीर्थात स्नान केल्याने माणसाची विवेक शक्ती सुधारते व तो पूण्यवान होतो. **कुरुक्षेत्र** सर्वात जास्त चांगले परिणाम देणारे आहे. केवळ "मी कुरुक्षेत्री रहाणार, मी कुरुक्षेत्री रहाणार", असें सारखे बोलतो त्याची सगळी पाप धुतली जातात व तो निष्पाप होतो. त्या ठिकाणी ब्रह्मर्षी साधना करतात ते देवतांसाठी एकाद्या यज्ञकुंडासारखे असते. त्या भागात जेथे **तरंतुक**, **अरंतुक** आहेत व परशुरामाचा तलाव आहे, त्याशिवाय मचक्रुक आहे त्या सगळ्या प्रदेशाला **समंतपंचक** असें समाईक नांव आहे. त्या प्रदेशाला ब्रह्माचे यज्ञकुंड समजले जाते. म्हणून तेथे मोठे नरहिंसाचार (नरबळी) अपेक्षित असतात. एवढे ऐकल्यावर राजा भिष्मदेव ऋषी पुलस्त्यांना विचारतो, "अहो गुरुवर्य, मला सांगा पाप म्हणचे काय, म्हणजे असे कोणते कृत्य केल्याने पाप लागते व असें कोणते कृत्य केल्याने पुण्य लागते"? पुलस्त्य त्याला सांगतात, अरे कुरुवंशाच्या राजा, ज्या कृत्यामुळें अथवा त्या प्रकारचे विचार करत राहिल्यामुळें त्या माणसाची अध्यात्मिक अवस्था कमी होते ते पापकारक समजले जाते. त्याच प्रमाणे ज्या विचारांमुळें आणि कृत्यामुळें त्याची अध्यात्मिक अवस्था सुधारते त्याला पुण्य कर्म असें समजतात. माणसांनी त्याची अध्यात्मिक अवस्था सतत सुधारत जावे असें वेद सांगतात कारण, त्यामुळें तो अंती देवत्वाला जातो. तसेंच जर तो सतत त्याची अध्यात्मिक अवस्था बिघडवत असेल तर तो नकारात्मक अशा दैत्य, दानव, असुर अशा अवस्थेत जाऊन शेवटी अशा ठिकाणी पोहोचतो किं, तेथून तो कधींच बाहेर येऊ शकत नाही". पुढे ऋषी पुलस्त्य सांगतात, "यज्ञ, तीर्थयात्रा इत्यादि पुण्यभाग वाढवण्याचे मार्ग म्हणून सांगितलेले आहेत. तेथे गेल्याने व जरुरी साधना केल्याने (तपोश्चरण) पुण्यभाग निश्चितपणे वृद्धीगत होत जातो. म्हणून भिष्मा, सगळे ऋषी तीर्थयात्रा करत असतात".

अशारितीने तीर्थयात्रा पर्वाची चौथा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग पांचवा

एवढे सांगितल्यावर पुलस्त्य पुढे सांगतात, त्यानंतर धर्माच्या अप्रतिम तीर्थक्षेत्री जावे. जेथे तो न्यायदेव यम हजारो वर्ष घोर तपस्या करत होता. त्याच्या त्या तपस्येमुळें ती जागी तीर्थक्षेत्र बनली आहे. म्हणून त्याचे नांव त्या ठिकाणाला आहे. तेथे तपस्या केल्याने त्या तपस्व्याच्या घराण्याचा उद्धार होतो. त्यानंतर आहे **ज्ञानपवन** तीर्थक्षेत्र. तेथे भेट देणार्याला अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तो मुनींच्या लोकात जातो. त्यानंतर यात्री **सौगनक्षेत्री** जाईल. तेथे असलेल्या **धीकवनात** असें समजतात कीं, सगळे देव ब्रम्हा बरोबर असतात. त्याशिवाय सिद्ध ऋषी, चरण, गंधर्व, किन्नर आणि नांग तेथे असतात. जसे कोणी त्या धीकवनात प्रवेश करतो त्याला त्याच्यात शुद्धी झाल्याचे जाणवू लागते. त्यानंतर त्या तीर्थयात्रीने **सरस्वतीदेवीची** आराधना करावयाची असते. तेथे तिला **प्लाक्षा** असें म्हणतात. त्या झर्यात यात्रेकरू स्नान करील. जो झरा एका वारुळातून वहात असतो. तेथे प्रार्थना केल्यांने सगळे पितर व देवता प्रसन्न होतात. त्याशिवाय अश्वयज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होते. तेथे एक खास तीर्थ आहे त्याचे नांव **इशानध्युश्ता** असें आहे. ते त्या वारुळापासून दूर आहे. त्यांचा उल्लेख पुराणांत आहे. तेथे स्नान केल्याने हजारो कपिला गाई दान केल्याचे पुण्य मिळते आणि अश्वयज्ञाचेसुद्धा श्रेय मिळते. पुढच्या प्रवासात **सुगंधा** आणि **सतकुंभा** व **पंचयक्ष** येतात. त्यात स्नान केल्यामुळें त्याला स्वर्गात स्थान प्राप्त होते. तीर्थक्षेत्र **त्रिसुलाखत** येथे स्नान केल्यानंतर पितरांचे व देवांचे स्मरण करावयाचे असते. त्यात त्यांची स्तुती करावयाची असते. तसे केल्यांने मृत्यूनंतर तो गाणपत्य होतो. म्हणजे तो गणपतीच्या गणातला एक होतो. देवी **शाकंभरी** हे एक ख्यातनाम तीर्थक्षेत्र आहे. गेली एक हजार दैविक वर्षे ती केवळ औषधी खाऊन राहिली होती. अनेक तेजस्वी ऋषी तिच्या दर्शनासाठी मुद्दाम येत असतात. तेथे ती देवी त्यांना शाकाहार शिकवते. म्हणून त्या ऋषीमुनींनी तिला असें नांव दिले आहे. तेथे शुक्ल ब्रह्मचर्य पाळून एकचित्ताने ध्यान करत तीन दिवस व रात्री काढावयाच्या असतात. मग जर शाकंभरी देवी प्रसन्न झाली तर बारा वर्ष शाकाहार केल्याचे श्रेय त्याला मिळते. त्या तिथून **सुवर्ण** तीर्थी जातो, तेथे असें सांगतात विष्णूने रुद्राची प्रार्थना केली होती. त्याप्रकारे शीवाकडून त्यांने अनेक अवघड वर मिळवले होते जे सहसा कोणाला महादेव देत नाही. त्या तपस्येने संतुष्ट झालेला

त्रिपुरारी कृष्णाला बोलतो, "तू सर्वात जास्त आवडता देव होशिल मानव युगात. आणि विश्वात सर्वश्रेष्ठ ठरशिल". वृषभ चिन्ह असलेला देव तेथे पुजल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय आणि गाणपत्य स्थान मिळते. त्यानंतर तीर्थ येते **धुमवती**. तेथे तीन रात्री निर्जळी उपवास केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात. त्या तीर्थक्षेत्राच्या दक्षिणेकडील अर्ध्याभागात **रथावर्त** नांवाचे तीर्थक्षेत्र आहे. तेथे मोठ्या भक्तिभावाने जावे, भोगांपासून अलिप्त असें मन ठेवून संयमी असे जीवन असल्यास महादेव संतुष्ट होतात. त्यामुळें त्याची प्रदक्षिणा करून साधना करावयाची असते. त्यानंतर **धारा** नांवाचे तीर्थ येते. तेथे पाप धुतले जाते. त्याची सगळी दुःख दूर होतात. त्यांनतर हिमालयातील गंगा उगमाचे तीर्थ क्षेत्र जे स्वर्गाचे द्वार समजले जाते तेथे एकचित्ताने ध्यान करत स्नान करावयाचे असते. त्यानंतर **सप्तगंगा**, **त्रिगंगा** आणि **सक्रावर्त** ह्या ठिकाणी ऋषी ध्यान साधना करत असतात. ते दिसत नाहीत पण ते असतात, त्याना लवून नमस्कार करून तेथे स्नान करावे. त्यानंतर येते **कनखल** क्षेत्र आहे. तेथे तीन दिवस उपोषण केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर यात्री **कपिलावर्ताकडे** जातो. तेथे एक रात्र उपोषण केल्यांने एक हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. ते नागांच्या कपिल नावांच्या राजाचे तीर्थक्षेत्र आहे. तेथे **नागतीर्थ** आहे. तेथे स्नान करण्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. त्यानंतर शंतनुचे तीर्थ ज्याला **ललितिका** म्हणतात, तेथे स्नान केल्याने त्याचा अधःपात कधीही होत नाही. जे यात्री **गंगा व यमुना ह्यांच्या संगमावर** स्नान करतात त्यांना दहा अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याशिवाय त्याच्या घराण्याचा उद्धार होतो. **सुगंधा** तीर्थक्षेत्री स्नान केल्याने पापं धुतली जातात. त्याशिवाय तो ब्रह्माच्या लोकी सन्मानाने रहातो. त्यानंतर तो **रुद्रावर्तात** जातो. तेथे स्नान केल्यामुळे तो स्वर्गात जातो मृत्यूनंतर. **गंगा व सरस्वती ह्यांच्या संगमावर** स्नान करणार्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याशिवाय तो स्वर्गात जातो त्याच्या मृत्यूनंतर. त्यानंतर **भद्रकर्णेश्वर** येते. तेथे स्नान करून पुजा केल्याने तसेंच श्रेय मिळते. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **कुवजाम्रक**. तेथे स्नान केल्याने हजार गाई दान केल्याचे श्रेय मिळते आणि स्वर्गारोहण साध्य होते. त्यानंतरचे तीर्थ आहे **अरुंधतीवत**. ब्रह्मचर्य आचरून ध्यानसाधना करत व्रतस्थ राहून तेथे स्नान केले किं, अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर **समुद्रक** तीर्थ आहे. त्यात स्नान करून तीन रात्री साधना केल्याने समान फळं मिळतात. त्याच्या

घराण्याचा उद्धार होतो. त्यानंतर येते **यमुनाप्रभाव** हे यमुनेच्या उगमस्थळी आहे. तेथे स्नान केल्याने अश्वयज्ञ केल्याचे फायदे होतात. त्यानंतर येते **दर्विसंक्रमण**, त्यात तेंच फळं मिळते. त्यानंतर **सिंधूप्रभाव** आहे. तेथे गंधर्व आणि सिद्ध यात्रा करतात. तेथे सप्ताह राहून साधना केली कीं, संपन्नता होते. त्यानंतर तीर्थक्षेत्र **वेदी** आहे. त्यामुळेसुद्धा अश्वयज्ञाचे फळ मिळतात. त्यानंतर **ऋषीकुळ** आणि **वसिष्ठ** ही क्षेत्रे येतात. तेथे यात्रा करण्यामुळें यात्रेकरू ब्राह्मण पदाला जातो. त्यानंतर आहे **भृगुतूंग**. तेथे साधना केल्याने तो अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळवतो. त्यानंतर आहे **वीरप्रमोक्ष**. तेथे स्नान करून साधना केल्याने त्याची सगळी पापं धुतली जातात. त्याशिवाय अश्वयज्ञाचा लाभ होतो. त्यानंतर आहेत **कृत्तिका** व **मघा** अशी तीर्थक्षेत्रे. तेथे संध्याकाळी स्नान करून रात्रभर तपोश्वरण केल्याने अग्नीश्तोम आणि अतिरत्र यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. पुढे क्षेत्र आहे विद्या. तेथे तपोश्वरण करणार्याला सगळ्या विद्या साध्य होतात. त्यानंतर आहे **महाश्रम** तीर्थक्षेत्र. त्यात स्नान केल्याने पश्चात्ताप झाला असल्यास सगळी महापापं धुतली जातात. एकवेळ जेवून रहावे लागते. त्यामुळे बरेच फायदे होतात. त्याच्या प्रभावामुळें मागील व पुढच्या दहा पिढ्यांचे भले होते. **महालयात** यात्रा करून दानं करावी लागतात, त्यानंतर सगळी पापं धुतली जातात. त्यानंतर आहे **वेताशिका**. तेथे साक्षात ब्रह्म ध्यान करत असतात असें समजले जाते. तेथे पुजा केल्याने अश्वयज्ञाचा फायदा होतो आणि उशनास अवस्थेस तो जातो. त्यानंतर येते **सुंदरीका** क्षेत्र. तेथे सिद्ध ध्यानसाधना करत असतात. ते आपल्याला दिसत नाहीत. तेथे स्नान संध्या केल्याने पुढच्या जन्मी तो/ती अप्रतिम सुंदर होतात. त्या नंतर आहे **ब्राह्मणीक्षेत्र**. घोर तपस्या करणार्यांसाठी ते चांगले आहे. ब्रह्मचर्य आचरून तेथे स्नान करतो तो ब्रह्मपदी जातो. त्यानंतर येते **निमिष** क्षेत्र. सिद्धांचे अतिप्रिय असें हे तीर्थक्षेत्र आहे. असें सांगतात किं, केवळ ह्या तीर्थक्षेत्री जाण्याचा संकल्प सोडला तरी त्याची अर्धी पापं धुतली जातात. तेथे साक्षात ब्रह्मदेव वास करतात असें सांगतात. प्रामाणिक तीर्थंकरानी एक महीना तेथे राहून तपोश्वरण करावयाचे असते. अशारितीने तपस्या केल्याने त्याला गोयज्ञ केल्याचे पुण्य मिळते. त्याच्या मागील व पुढील सात पिढ्यांचे कल्याण होते. अरे भिष्मा, बहुतेक तीर्थक्षेत्रे निमिषात असतात. (निमिष म्हणजे कोणतेही घनदाट अरण्य जेथे हिंस्त्र श्वापदांचा वावर कमी असतो, झरे वहात असतात. जर एकाद्या तीर्थक्षेत्री माणसाची वस्ती

वाढत गेली तर त्या क्षेत्राचे पावित्र्य कमी होते म्हणून तीर्थक्षेत्रे साधारणपणे निर्मनुष्य असावीत. आज सगळ्याच तीर्थक्षेत्री मानव वस्ती घनदाट झाली असल्यामुळें बहुतेक तीर्थक्षेत्रे व्यर्थ झाली आहेत. त्याचे कारण मानव वस्ती झाली कीं, तेथे पापाचरण सुरू होते.) तो तीर्थयात्री निमिषात दीर्घ उपोषणाने देहत्याग करतो तो अनंतात आनंदमय अवस्थेत स्वर्गीय सुखात रहातो. हे सगळे ज्ञानी जाणतात. त्यानंतर येते **गंगोद्भेद** क्षेत्र. तेथे उपोषण करून तीन रात्री तपस्या करतो त्याला वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तसेच करत राहीला तर तो अखेरीस ब्रह्मात विलीन होतो. देवांच्या आणि पितरांच्या नांवाने अर्घ्य द्यावयाचे असते. तो सारस्वत लोकात जातो. त्यानंतर येते **वहुद** तीर्थक्षेत्र संयमी जीवन ठेवून ब्रह्मचर्य आचरण पाळून तेथे एक रात्र काढल्यास तो देवांनी प्रिय होतो. आता भिष्मा, तुला **देवसत्र** यज्ञाचे श्रेय मिळते. आता सांगतो महत्व **क्षिरवती** तीर्थाचे. तेथे पवित्र लोक जात असतात. तेथे ध्यानसाधना करणार्याला वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **विमलशोक**. विनम्रतेने व ब्रह्मचर्याने युक्त असें तेथे एक रात्र काढावी, स्वर्गाचे दरवाजे उघडले जातात. त्यानंतर आहे **गोप्रतारा**. ते सरयू नदीच्या तटावर आहे. जेथे प्रभूरामाने देहत्याग केला. त्या तीर्थाचा महिमा मोठा आहे. तेथे स्नान करावे. रामाच्या कृपेने त्या तीर्थंकराचे कल्याण होते. त्यानंतर येते रामतीर्थ हे गोमती किनारी आहे. तेथे स्नान केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. त्या शिवाय त्याच्या कुळाचा उद्धार होतो. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **शतसहस्रिका**. तेथे संयमित आहार विहार व विचार आचरून तो दहा हजार गाई दान करण्यासारखे पुण्य मिळवतो. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **भरत्रिस्थान**. तेथे पुजा केल्याने त्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येते **कोटीकार्तिकेय**. तेथे स्नान केल्याने हजार गाई दान करण्याचे पुण्य प्राप्त होते. तेथून तो **वाराणसी** ह्या ख्यातनाम तीर्थक्षेत्री येतो. तेथे वृषभनाथाची पुजा करावयाची असते. त्यानंतर तो **कपिलाह्रद** जातो व तेथे स्नान करतो. त्यामुळें राजसूय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. नंतर येते **अविमुक्त** क्षेत्र तेथे स्नान केल्याने त्याची पापं धुतली जातात त्यामुळें  ब्राह्मणाचा खून करणार्याला क्षमा केली जाते. ह्या तीर्थावर सर्व त्याग करणार्याला सर्व मुक्ती मिळते. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **मार्कंडेय**. हे गंगाकिनारी आहे. तेथे स्नान केल्याने अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याशिवाय त्याच्या कुळाचा उद्धार होतो. नंतर आहे **गया**. तेथे ध्यानसाधना करून स्नान

केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. त्याशिवाय त्याच्या कुळाचा उद्धार होतो. एक मुलगा जरी गयेची तीर्थयात्रा करील तर सगळ्या कुटूंबाचे भले होते. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **अक्षयवट**. तिन्ही लोकांत प्रसिद्ध असे हे क्षेत्र पितरांच्या शांतीसाठी खास आहे. तेथे महानदीत स्नान करावयाचे असते. त्यानंतर देवांना अर्घ्य द्यावयाचे असते. तेथे श्राद्ध घातल्यास पुनः श्राद्ध घालण्याची आवश्यकता नसते कारण ते पुरेसे असते असे समजतात. तेथून **ब्रह्मसर** येते. तेथे यमदेवाचे क्षेत्र आहे. अशी आख्यायिका आहे किं, ब्रह्मांने एकदा त्या सरोवरात एक बळीचा स्थंब उभा केला होता. त्या स्थंबाला प्रदक्षिणा घातल्याने वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **देनुका** तीर्थ. तेथे एक रात्र राहून तीळाचे आणि गाईचे दान करून साधना झाली तर तो इसम निष्पाप होतो. तो मृत्यूनंतर सोमलोकी जातो. असें सांगतात फार प्राचीन काळी एक कपिला व तिचे वासरू तेथे चरत असें त्याच्या पावलाचे ठसे तेथे दिसतात. त्या जागी स्नान करावयाचे असते. त्यामुळें आंघोळ करणारा निष्पाप होतो. त्यानंतर आहे **गृध्रवत** तीर्थक्षेत्र. तेथे ब्राह्मणाने राखेने स्नान केले तर त्याला बारा वर्षे तप केल्याचे श्रेय मिळते. जर इतर वर्णाचा असेल तर तो निष्पाप होतो. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **उद्यंत पर्वत राशी**. तो सगळा परिसर पवित्र असल्याने तीर्थक्षेत्रा सारखा आहे. तेथे सावित्रीची पावले आहेत. जो ब्राह्मण त्याच्या पहाटेची, दुपारची व रात्रीची अशा तीन प्रार्थना करतो तर त्यामुळें त्याला बारा वर्षे त्या प्रार्थना केल्या सारखे श्रेय मिळते. नंतर येते **योनीद्वार** तीर्थक्षेत्र. तेथे जाऊन तपस्या करणार्याचे जन्मजन्मांतरीचे फेरे संपतात. त्यानंतर तो **फाल्गू** तीर्थाला जातो. तेथे तीर्थयात्रा केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते व जीवनात यश मिळते. त्यानंतर आहे **धर्मप्रिष्त**, तेथे यमांने वास्तव्य केले होते असें समजतात. तेथे असलेल्या कुंडातील पाणी प्यावयाचे असते . त्यानंतर स्नान करावयाचे व देवांना आणि पितरांनी अर्घ्य द्यावयाचे असते. त्यामुळें तो निष्पाप होऊन स्वर्गात जातो. तेथे मातंगऋषीचा आश्रम आहे. त्या आश्रमात प्रवेश केल्यांने सर्व क्षीण जातो व शांत प्रसन्न होतो. तेथे तीर्थयात्रा केल्याने गवयान यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तेथे यमदेवाची मूर्ती आहे तिची पुजा करावयाची असते. त्यामुळें त्याला अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **ब्रह्मस्थान** तीर्थ. तेथे गेल्याने व पुजा केल्याने अश्वयज्ञ आणि राजसूय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. ऋषी कक्षिवना सारखा तो स्वर्गात राहिल. तेथे प्रथम यक्षांना प्रसाद द्यावयाचा व

नंतर तो खावयाचा असतो. असें प्रत्येक दिवशी तेथे असे पर्यंत करावयाचे असते. ब्राह्मणाची हत्या करण्याच्या पापापासून तो मुक्त होतो. त्यानंतर तो यात्री पुढे **मणीनाग** क्षेत्री जाईल. तेथे स्नान केल्यामुळें हजार गाई दिल्याचे श्रेय मिळते. कोणत्याही सापाच्या वंशाच्या प्रजातीने दंश केला तरी त्याची बाधा होत नाही. तेथे एक रात्र राहिल्याने सर्व पापांचा नाश होतो. त्यानंतरचे तीर्थक्षेत्र आहे **ब्रह्मर्षी गौतमाचे** ते एका अरण्यात आहे. तेथे अहिल्याचे सरोवर आहे तेथे स्नान केल्याने तो यात्री उच्चस्थानी जातो. त्यानंतर श्रीक्षेत्र आहे. तेथे स्नान केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. पुढे क्षेत्र आहे **ऋषी जनका**चे. त्याचे पुजा देवसुद्धा करत असतात. त्यात स्नान करणारा विष्णूलोकास जातो. त्यानंतर **विनासन** आहे. तेथे स्नान केल्यामुळें तो निष्पाप होतो. त्याशिवाय वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याशिवाय तो सोमलोकात जातो मृत्यू नंतर. त्यानंतर तो **गंडकी नदी**कडे जातो. ज्यातून सगळ्या आधीच्या तीर्थांचे पाणी वहात असते. तेथे स्नान केल्यामुळें तो सूर्य लोकास जातो. त्यानंतर तो **विसला** कडे जातो. ती नदी त्रिलोकात ख्यातनाम आहे. त्या नदीत स्नान केल्याने अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते, स्वर्गात जातो. गुह्यकांना अत्यानंद देणारे ऋषी **अधीवंग** ह्यांचे अरण्यात असलेले तीर्थक्षेत्र आहे, गुह्यक म्हणजे शीवभक्त. त्यानंतर येते **कंपन** तीर्थक्षेत्र. तेथे सिद्ध नेहमी यात्रा करत असतात. त्याची योग्यता पुंड्रिक तीर्था एवढीच आहे. कारण तेथे स्नान करून प्रार्थना केल्याने पुंड्रिक यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तो मृत्यू नंतर स्वर्गात जातो. त्यानंतर येते ती जागा ज्या ठिकाणाहून **महेश्वरी** नांवाचा झरा वहात आहे. त्यात स्नान केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. त्याशिवाय त्याच्या कुळाचा उद्धार होतो. त्यानंतर एक **दैवीसर** तलाव आहे त्यात स्नान केल्याने सर्व प्रकारचे दुर्दैव संपते आणि यशाची सुरुवात होते. त्यानंतर आहे सोमपाद. ब्रह्मचर्य आचरून विनम्रभावाने स्नान केल्यास सर्व पापांचा विनाश होता व तो पुण्यवान होतो. त्यानंतर **महेश्वरपाद** आहे. तेथे स्नान करावयाचे असते. त्यामुळें अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्या एका तीर्थक्षेत्री असंख्य तीर्थस्थानं आहेत. एक नीच असुर एका कासवाच्या रुपात ते तीर्थस्थान त्याच्या पाठीवर घेऊन पळून जात होता, त्याच्या कडून ते विष्णूने परत मिळवले. अशी आख्यायिका आहे. त्या तिर्थावर स्नान केल्याने पुंड्रिक यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर तो मृत्यूनंतर नारायण लोकी जातो. त्यानंतर आहे **नारायण तीर्थ**.

तेथे नारायण सदैव उपस्थित असतात असें समजतात. लोककल्याणार्थ ते तेथे असतात. त्यांच्या बरोबर ब्रह्म, देव, रुद्र, आदित्य, वसु असें सगळे त्यांच्या सह लोककल्याणार्थ तेथे असतात. त्या ठिकाणी असलेल्या विष्णूच्या स्थानाला शाळिग्राम म्हणतात. तेथे जप साधना व स्नान केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. मृत्यूनंतर तो नारायणाच्या लोकी जातो. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **जातीस्मर**. तेथे आंधोळ करून पुजा केल्याने आपले मागील जन्म आठवतात. त्यानंतर आहे, **महेश्वरपुर**. तेथे महादेवाची पुजा करतात. तेथे उपोषण करून साधना केल्याने त्याच्या सगळ्या कामना पूर्ण होतात. मग येते **वामन तीर्थ**, तेथे स्नान केल्याने माणूस निष्पाप होतो. तेथे तपोश्वरण केल्याने भाग्य उजळून निघते. त्यानंतर आहे **कुसिका** तीर्थ. तेथे स्नान केल्याने मोठ्यातले मोठे पाप धुतले जाते असें समजतात. त्याशिवाय राजसूययज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होते. त्यानंतर सांगण्यासारखे तीर्थक्षेत्र आहे, **चंपक**. तेथे एक रात्र साधना केल्याने एक हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. त्यानंतर आहे, तीर्थक्षेत्र जयश्थिल. तेथे साक्षात विश्वेश्वर त्याच्या अर्धांगिनी बरोबर वास करत असतो असें समजतात. खर्या सिद्ध साधकाला त्यांचे उभयतांचे दर्शन होते असें अनुभवी सांगतात. असा भाग्यवान भक्त पुढे मित्र–वरुण लोकी जातो. तेथे तीन दिवस उपोषण करणारा अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळवतो. त्यानंतर येते **कन्यासंवैद्य** तीर्थक्षेत्र. तेथे स्नान केल्याने व्रतस्थ असल्यास मनुचे दर्शन होते. जाणकार असें सांगतात किं, तेथे तांदूळांचे दान करावयाचे असते अथवा जे देता येईल ते दान करावे त्यामुळें कन्याकुमारीचे दर्शन होते. असा नित्य स्वर्गात जातो. मग येते **निश्चीर** क्षेत्र. तेथे ब्रह्माचे स्थान आहे. तेथे वसिष्ठांचा आश्रम आहे. तेथे विधीयुक्त स्नान केल्याने वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्या नंतर आहे **देवकूट**. तेथे नित्य वास असतो सिद्धऋषींचा. तेथे यात्रा करणार्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याच्या कुळाचा उद्धार होतो. त्यानंतर आहे **मुनीकौशिक** तलाव. तेथे कौशिकाचा पुत्र विश्वामित्र पूर्णज्ञान प्राप्त करतो. तेथे स्नान करण्याने वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्या ठिकाणी एक महिना रहावयाचे असते. त्यामुळें अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर **महाह्रद** येते. तेथे स्नान करणार्याला कधीच अपयश येत नाही. सोन्याचे दान ब्रह्मणांना केल्याचे पुण्य मिळते. त्यानंतर आहे **विरश्राम** तीर्थ, तेथे साक्षात कार्तिकेय वास करतात असें सांगतात. तेथे साधना केल्यामुळें

अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **अग्नीधारा** क्षेत्र. तेथे स्नान करून विष्णूवर एकचित्ताने ध्यान केल्याने अग्नीश्तोम यज्ञाचे श्रेय मिळते. पुढे हिमाच्छादित **ब्रह्मसर** आहे. तेथेच आहे **कुमारधारा** तीर्थ. तेथे स्नान केल्याने सर्व इच्छापूर्ती होतात असे जाणकार सांगतात. तेथे तीन दिवस उपोषण केल्यास ब्रह्महत्त्येचे पातक धूतले जाते. त्यानंतर **गौरीदेवी**च्या तीर्थक्षेत्री यात्री जातो. ते फार उंचावर आहे. तेथे **स्तनकुंड** आहे. त्यात स्नान केल्याने त्याला वाजपोय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर तो पितर व देवांचा तेथे पुजा करतो. त्यामुळें अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. तो मृत्यूनंतर इंद्रलोकी जातो. नंतर येते तीर्थक्षेत्र, **तम्रारुन** तेथे साक्षात देव यात्रा करण्यासाठी जातात असे जाणकार सांगतात. तेथे स्नान करण्याने नरमेध यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. पुढे कार्तिका, अरुणा व कौशिकी ह्या तीन नद्यांच्या संगमावर **त्रिवेणी तीर्थ** क्षेत्र आहे. तेथे तीन रात्री तपोश्वरण करून उपवास धरल्यास तो निष्पाप होतो. पुढे **उर्वशी तीर्थक्षेत्र** आहे. त्यानंतर आहे **सोमाश्रम**. त्यानंतर येतो **कुंभकर्णाश्रम**. तेथे असलेल्या गोमुखाला स्पर्श करून ध्यान करणार्याचे तप पूर्ण असेल तर त्याला आधीचे जन्म आठवू लागतात, तो इंद्रलोकी जातो. त्यानंतर **नंदा** नदीत स्नान केल्याने त्याचे पाप धुतले जाते. तेथे असलेल्या नदीत एक बेट आहे. त्याचे नांव आहे **वृषभ**. त्या नदीत स्नान करणारा स्वर्गात जातो. त्यानंतर तीर्थक्षेत्र आहे, **औदालक**. तेथे मुनी फार यात्रा करतात. तेथे स्नान केल्यामुळें योगक्षेमामुळें जी पाप होत असतात ती धुतली जातात. त्यानंतर आहे पवित्र तीर्थक्षेत्र **धर्म**. तेथे ब्रह्मर्षी जास्त यात्रा करतात. तेथे स्नान केल्याने वाजपेय यज्ञाचे श्रेय मिळते. त्याला स्वर्गात फार मानाने वागवले जाते. त्यानंतर आहे **चंपा** त्यानंतर **भागिरथी**, तेथे स्नान केल्याने तशीच फळं मिळतात. नंतर तो यात्री **दंडपर्ण** तीर्थक्षेत्री येतो. तेथे स्नान केल्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य त्याला मिळते. त्यानंतर आहे **ललितीका** क्षेत्र. तेथे स्नान केल्यामुळें राजसूय यज्ञाचे श्रेय मिळते व तो मृत्यू नंतर स्वर्गात जातो.

अशारितीने तीर्थपर्वाचा पांचवा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग सहावा

पुलस्त्य ऋषी सांगतात, त्यानंतर यात्री **संवेद्य** तीर्थाकडे जातो. त्या पाण्यला स्पर्श करणारा खरा साधक ज्ञानी होतो. रामांने हे तिर्थ क्षेज्ञ फार प्राचीन काळी सामान्यांसाठी तयार केले जेणेकरून ते ज्ञानी होतील. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र, **लौहित्य**. तेथे पुजा केल्याने सोने वाटल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर **करतोया नदी** कडे तो येतो. तेथे उपोषण तीन दिवस रात्र करावयाचे असते. त्यामुळें अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. तसें ब्रह्माचे आदेश आहेत. ज्ञानी सांगतात कीं, जर कोणी गंगा समुद्राला मिळते त्या भागात जाऊन स्नान करतो तर त्याला दहा अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर गंगा ओलांडून पलिकडे गेले कीं, तेथे स्नान करावयाचे असते, तेथे तीन दिवस रात्र काढावयाची असतात. तेथे स्नान केल्याने दहा अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. सर्व पापं धुतली जातात. नंतर येथे **वैतरणी नदी**. तेथे स्नान केल्याने सगळी पापं धुतली जातात. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र **विराज**. तेथे आंघोळ केल्याचे तो चंद्रासारखा प्रकाशित होतो, त्याची सर्व पापं धुतली जातात. त्या स्नानमुळें हजार गाई दान केल्याचे पुण्य त्याला मिळते व कुळाचा उद्धार होतो ते वेगळे. त्यानंतर **सोना व ज्योतिरथी ह्यांच्या संगमा**वर पितरांना व देवांना अर्घ्य द्यावयाचे असते. तसेंच **वंसगुल्मा** जेथे सोना व नर्मदा मिळतात त्या तीर्थक्षेत्रावर स्नान केल्याने अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र ज्याचे नांव आहे, **वृषभ**. ते कोसलात आहे. तेथे तीन दिवस व रात्री उपोषण केल्याने वाजपेय यज्ञाचे श्रेय मिळते आणि हजार गाई दिल्याचे पुण्यसुद्धा मिळते. त्याशिवाय कुळाचा उद्धार सुद्धा होतो. त्याशिवाय तीन वृषभ दान केल्याचे श्रेय मिळते. **पुष्पावती** मध्ये स्नान केल्याने व तीन दिवस रात्री उपवास केल्याने त्याच्या कुळाचा उद्धार होतो. एक हजार गाई दिल्याचे श्रेय मिळते. **बदरीका** मध्ये स्नान केल्याने त्याला दीर्घायुष्य मिळते व शिवाय तो स्वर्गात जाते त्याच्या मृत्यूनंतर. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र, **चंपा**, भागिरथीमध्ये स्नान केल्यामुळें हजार गाई दान केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **लपेतिका**. तेथे असलेल्या पुण्यवंताच्या सानिध्यात तो रहातो. तसे केल्याने वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याची देव दखल घेण्यास सुरुवात होते. त्यानंतर **महेंद्र पर्वत** येतो. ते जमद्ग्न ऋषीचे स्थान आहे. परशुराम तेथे सदैव असतात असें समजले जाते. तेथे स्नान विधी केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. तेथे

मांतंगांचे तीर्थक्षेत्र आहे त्याचे नांव आहे **केदार**. तेथे पुजा केल्याने हजार गाई दिल्याचे श्रेय मिळते. नंतर **श्रीपर्वता**कडे जावयाचे असते. तेथे शंकराची आराधना करावयाची असते. त्यामुळें अश्वयज्ञ केल्याचे श्रेय प्राप्त होते. तेथे स्नान केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. तो जीवनात यशस्वी होतो. पांड्य देशातील **वृषभ पर्वता**वर जाऊन देवांची पुजा करावयाची असते. त्यामुळें वाजपेय यज्ञाचे श्रेय मिळते. त्यानंतर येते **कावेरी नदी**. त्या नदीवर अप्सरांचे येणे जाणे चालूच असते. त्या अप्सरा तेथे स्नान करण्यासाठी येत असतात. तेथे स्नान केल्याने हजार गाई दान केल्याचे श्रेय मिळते. तेथून **कन्याकुमारी** कडे जातात. ते समुद्र किनारी आहे. तेथे स्नान केल्याने सर्व पापं धुतली जातात. तेथून यात्री बहुधा **गोकर्ण** कडे जातो. ह्या तीर्थक्षेत्री सगळे देव ब्रह्मासह असतात. त्यांची पुजा यक्ष, पिशाच्च, किन्नर, नाग, सिद्ध, चरण, गंधर्व, माणसें, पिनाग, तसेंच देवता ज्या नद्या, समुद्र आणि पर्वतांच्या आहेत त्या सगळ्या उमाची पुजा तेथे करत असतात. तेथे यात्रा यशस्वी झाली तर तो गाणपत्य स्थानी जातो त्यासाठी बारा दिवस तो साधना तेथे करील. त्याशिवाय निष्पाप होतो. त्यानंतर आहे तीर्थ **गायत्री**. तेथे साधना केल्यास हजार गाई दिल्याचे पुण्य मिळते. कांहीं विलक्षण अनुभव येतात कांहीं ब्राह्मणांना येतात असें सांगतात. ते असें कीं, जर तो ब्राह्मण गायत्री मंत्र गाऊ लागला तर त्याला विशेष सूर लागतो, इतर कोणी गायले तर तसे होत नाही. त्यानंतर **सवर्त ऋषीच्या कुंडा** कडे जावयाचे असते. तेथे पुजा केल्याने त्याचे व्यक्तिमत्व प्रभावी होते व वास्तविक जीवनात तो यशस्वी ठरतो. तेथून **वेणा नदी** येते. तेथे पितरांचे श्राद्ध करावे व देवांना अर्घ्य द्यावे. तेथून **गोदावरी** येते. तेथे सिद्धांचे जाणे फार आहे. तेथे साधना केल्याने सर्वश्रेष्ठ असा गोयज्ञ साध्य केल्याचे श्रेय मिळते. तेथून तो **वासुकी** तीर्थक्षेत्री जातो. त्यानंतर वेन्ना नदीत आंघोळ केल्याने त्यास वाजपेय यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. तेथे तो पितरांना पिंड देतो. हजार गाई दान केल्याचे श्रेय मिळते. नंतर आहे **ब्रह्मस्थान** क्षेत्र. तेथे तीन दिवस साधना केल्याने हजार गाई दान केल्याचे श्रेय मिळते, पुढे तो मृत्यूनंतर स्वर्गात जातो. त्यानंतर आहे **कुसप्लवन** क्षेत्र. ब्रह्मचर्य पालन करून जर तो तीन रात्री साधना करणार असेल तर त्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर आहे **देवह्रद** तीर्थ. ते कृष्णा व वेन्ना नद्यांच्या संगमावर आहे. त्याच प्रमाणे आणखीन एक तीर्थक्षेत्र आहे, **जातीस्मरह्रद**. तेथे साधना केल्याने

त्याला मागील जन्मांचे ज्ञान होते. ह्या क्षेत्री इंद्राने त्याचे शंभर यज्ञ केले होते व मग त्याला इंद्रपद मिळाले होते. खर्या साधकाला केवळ तेथे जाण्याने अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर **सर्वदेव ह्रद** करावयाचे असते. त्यानें हजार गाई दान केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर येते पवित्र तीर्थ **पयोशनी**. तेथे पुजा करण्याने हजार गाई दिल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर तीर्थक्षेत्र आहे **दंडक**. केवळ तेथे गेल्याने हजार गाई दान केल्याचे श्रेय लाभते. नंतर आहे **सरभंगा** तीर्थ. ते शुकाचे तीर्थ क्षेत्र आहे. तेथे साधना करणार्याला कधीही दुर्भाग्य होत नाही. त्याच्या कुळाचा उद्धार सुद्धा होतो. मग आहे **सुर्परक**. तेथे परशुराम रहात असें. त्याची ती तपोभूमी आहे. त्यानंतर आहे, **सप्तगडवर** तीर्थ आहे. तेथे मर्यादांचे भान ठेवून आपल्या वासनांना उत्तेजन न देता तो तीर्थंकर त्या तीर्थक्षेत्री पुजा करतो. पुढे जातो ते क्षेत्र आहे, **देवह्लद**. तेथे साधना करणार्याला देवीसत्र यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्यानंतर तो **तुंगक** वनात जातो. त्या प्राचीन वनात ऋषी सारस्वत ह्यांनी संन्याशाना वेद शिकवले. तेथे ब्रह्मचर्य आचरून साधना करावयाची असते. कालांतराने मुनी वेदांचे ज्ञान विसरले. त्यावेळी सारस्वतांतील महान ऋषी अंगिरस ह्यांनी आपल्या ध्यान समाधीत प्रथम ओम उच्चारून योग्य प्रकारे इतर कवनांचे उच्चारण करत वेद पुन्हा प्रचारात आणले. त्यमुळें ते मुनी पुन्हा वेदाचे स्मरण करु लागतात. ते झाल्यानंतर सगळे ऋषी, वरुणदेव, अग्नीदेव, प्रजापति, नारायण, महादेव आणि ब्रह्मदेव भृगूंना पुरोहित म्हणून आमंत्रित करतात व अग्न्याधन यज्ञ संपन्न करतात. त्यानंतर ते सगळे आपापल्या ठिकणी जातात. अशा ह्या वनाची ख्याति आहे. असें सांगून पुलस्त्य पुढे भिष्माला सांगतात, जे ह्या वनात प्रवेश करतात, पुरुष असो अगर स्त्री असो त्यांची सर्व पापं धुतली जातात. तेथे एक मांस राहून साधना करण्याने तो ब्रह्मपदी पोहोचतो. त्याच्या वंशाचे कल्याण होते. त्यानंतर येते तीर्थक्षेत्र, **माधविका**. तेथे यात्री देव आणि पितरांना अर्घ्य देईल. त्यामुळें त्याला अग्नीश्तोम यज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याशिवाय त्याला चांगली बुद्धी प्राप्त होईल. त्या क्षेत्र एक पर्वत आहे तो त्र्यैलोक्यात ख्यातनाम आहे. त्याचे नांव आहे **कलंजर**. तेथे एक स्वर्गीय सरोवर आहे. त्यात स्नान केल्याने हजार गाई दान केल्याचे पुण्य मिळते. त्याच्या कुळाचा उद्धार होतो हे विशेष. त्यानंतर आहे **मेधाविका** क्षेत्र. तेथे देव आणि पितरांनी पाण्याचे अर्घ्य द्यावयाचे असते. त्यामुळें अग्निश्तोम यज्ञाचे श्रेय मिळते. नंतर

आहे **मंदाकिनी** नदी. तिच्यात स्नान केल्याने माणूस निष्पाप होतो. तो स्वर्गात जातो. त्यानंतर आहे तीर्थश्रेत्र पर्वत **चित्रकूट**. तेथे स्नान करून जो पितरांनी व देवांनी अर्घ्य करून पुजा करतो तो अश्वयज्ञाचा मानकरी होतो. त्याशिवाय अध्यात्मिक दृष्ट्या उच्चपदाला जातो. नंतर आहे **भरतृस्थान** तेथे देवांचे सेनानी कार्तिकेय रहातात. तेथे गेल्याने माणूस त्याच्या जीवनात यशस्वी होतो असें समजतात. त्यानंतर आहे तीर्थक्षेत्र **कोटी**. तेथे पुजा केल्याने हजार गाई दान केल्याचे भाग्य लाभते. कोटीला प्रदक्षिणा करावयाच्या असतात. त्यानंतर येते **ज्येष्ठस्थान**. तेथे भाग्यवान तिर्थकाराला महादेवाचे दर्शन होते. तेथे एक प्राचीन पवित्र विहीर आहे. असें समजतात कीं, त्या कुव्यात चार समुद्रांचे पाणी येत असते. त्या पाण्यात स्नान करावयाचे असते. त्यामुळें तो अध्यात्मिक उच्च अवस्थेत जातो, त्याचे नित्य कल्याण होते. त्यानंतर आहे **शृंगवरपुर**. तेथे फार प्राचीन काळी प्रभू रामचंद्राने गंगा ओलांडून पलिकडे स्नान केले होते. त्यामुळें तो निष्पाप झाला होता. यात्री तेथे पूर्ण ब्रह्मचर्य आचरून साधना करेल तर त्याचे कल्याण होईल व त्याला वाजपेय यत्र केल्याचे भाग्य लाभेल. पूर्ण पश्चात्तापाने जो गंगास्नान करतो त्याची सगळी पापं धुतली जातात. नंतर आहे **मयूरवट**. ते क्षेत्र महादेवाचे आहे. तेथे वाकून नम्रभावाने प्रार्थना करणारा गाणपत्य स्थानी जातो. गंगेच्या त्या ठिकाणी स्नान करणारा निष्पाप होतो. त्यानंतर आहे **प्रयाग** क्षेत्र. ऋषीमुनींने स्तुती केलेले असें हे क्षेत्र फार प्राचीन आहे. तेथे देवांचे येणे जाणे नित्य असते असे ऋषी, जे सगळे जाणतात, ते सांगतात. ब्रह्मदेव तेथे असतात व इतर देव जसें लोकपाल (इंद्र, यम, वरुण, वायू, गणेश आणि अग्नी), सिद्ध, पितर तेथे ब्रह्माची पुजा करत असतात. त्याशिवाय सनतकुमार, अंगिरस, नांगेश्वर, सुपर्ण, आणखीन सर्व समुद्रांच्या आणि नद्यांच्या देवता तेथे हजेरी लावत असतात. त्याशिवाय गंधर्व, अप्सरा, स्वतः हरहरेश्वर, प्रजापति येतात. जणू काय पृथ्वीवरील ते ब्रह्मसभेचे छोटे रुप आहे. त्या भागात गंगा फार वेगांने वहात असते. त्याच्या जवळून तिची लहान बहीण यमुना वहात असते. तिचे गंगेत समाविष्ट होणे त्या जागी निश्चित केलेले आहे तसे ते होते. त्या संगमाला जगातील अतिपवित्र तीर्थक्षेत्र समजले जाते. प्रयाग त्यात पुनः श्रेष्ठ समजले जाते. तेथे प्रयाग, प्रतिस्थान, कमवल, अस्वतर आणि भोगवटी ह्या ठिकाणी यज्ञ करावयाचे असतात. तेथे ब्रह्मदेव स्वतः यज्ञ करत

असतात अशी धारणा आहे सगळ्या सिद्धांची. तेथे अनेक राजेरजवाडे येतात यज्ञ करण्यासाठी. महान योगी ज्यांची संपत्ती आहे त्यांचे वैराग्य असें सिद्ध तेथे ध्यान करतात. म्हणून ते क्षेत्र सदोदीत पुण्यप्रभावात असते. त्या सगळ्यात प्रयाग अत्यंत पवित्र मानले जाते. तेथील माती घेऊन जावयाचे असते. म्हणजे घरात बसूनसुद्धा एका डबीत ती माती ठेवून त्या वर एकचित्त करून साधना केली तरी ती फळते असे समजतात. तेथे स्नान केल्याने राजसूय यज्ञाचे व अश्वयज्ञाचे भाग्य लाभते. त्या स्थानी जे दान केले जाते त्याच्या दोनशेपट होऊन ते तीर्थंकाराला परत मिळते. कित्येक प्रयाग मध्ये अखेरचा श्वास घेणे योग्य समजतात. त्या ठिकाणी असें संगतात लक्षावधी तीर्थक्षेत्रे एकत्रित अशी आहेत. गंगा व यमुना संगमावर स्नान करण्याने चार प्रकारच्या ज्ञानाचे श्रेय मिळते. प्रयागात जी अनेक तीर्थ आहेत त्यातील **वासुकी** व **भोगवटी** श्रेष्ठ आहेत. तेथे स्नान करणार्याला अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. त्याशिवाय आणखीन एक तीर्थक्षेत्र आहे तेथे त्याचे नांव आहे **रामप्रपातन**. तेथे स्नान केल्याने अश्वयज्ञाचे श्रेय मिळते. अरे भिष्मा, गंगेत कोठेही स्नान केल्याने कुरुक्षेत्री गेल्याचे श्रेय लाभते. इतके ते श्रेष्ठ आहे. परंतु, त्याला अपवाद सांगतात तो **कनखल**. असें सांगतात, कृतयुगात, सगळी तीर्थक्षेत्रे सारखीच पवित्र होती. त्रेतायुगात फक्त पुष्कर त्या योग्यतेचे पवित्र समजले जात होते. द्वापार युगात कुरुक्षेत्र त्या योग्यतेचे समजले गेले. कलियुगात संपूर्ण गंगा त्या योग्यतेची पवित्र समजली जाईल. असे संकेत आहेत. पुष्करमध्ये यात्रा करतांना वैराग्य महत्वाचे आहे. महालयात दानं करणे महत्वाचे असते, मलय पर्वतात स्वताचे प्राणार्पण करणे योग्य समजतात. **भृगुतुंगा त** तीर्थंकराने अन्न त्याग करून समाधी घ्यावयाची असते. पुष्करात, गंगा यमुना संगमावर, स्नान करण्याने त्याच्या मागील व पुढच्या अशा सात पिढ्यांचा उद्धार होतो. गंगेच्या नांवाचा जप करतो तो निष्पाप होतो. असे सांगतात किं, गंगेत जीव देणार्याच्या अस्थी जोवर त्या पाण्यात आहेत तोवर तो स्वर्गात रहातो. अरे भिष्मा, प्रत्यक्ष ब्रह्मदेव सांगतात कीं, गंगा सगळ्या तीर्थात श्रेष्ठ आहे, सगळ्या देवांत केशव श्रेष्ठ आहे आणि सगळ्या माणसांत ब्राह्मण श्रेष्ठ असतो. सर्व गंगा क्षेत्र पवित्र समजावे. ज्याना ध्यान साधना करण्यात आयुष्य व्यतीत करावयाचे आहे त्यांच्यासाठी गंगाक्षेत्र उत्तम आहे. हे तीर्थ आख्यान सगळ्यानी वाचावे व इतरांनी वाचून सांगावे त्यामुळें प्रत्यक्ष तीर्थाला गेल्याचे श्रेय प्राप्त होते. केवळ अशा पवित्र

तीर्थक्षेत्रांच्या सदैव स्मरणाने तो पुण्य मिळवत असतो. त्यानी त्याला आत्मशांती आणि मनोरंजन सुद्धा होते. ऋषी ते ऐकण्यात आनंद मानतात. त्याच्या नित्य वाचनाने व ऐकण्याने ते सगळे स्वर्गात जातात. असें सांगतात किं, त्या आख्यानाच्या वाचनाने व ऐकण्याने शत्रू मित्र होतात. ते आख्यान वाचणार्याची मेधा सुधारते, पुत्र प्राप्ती होते, पैसे हवे असतील तर ते मिळतात, गरीब श्रीमत होतात. राजा सम्राट होतो. वैश्य आणखीन धनवान होतो. शुद्र त्याच्या इच्छा प्राप्त करतो. ब्राह्मण शुद्ध होऊन स्वर्गात जातो. अरे राजा भिष्मा, येथे जी तीर्थक्षेत्रे सांगितली आहेत त्यातील कांही तेथे पोहोचण्यास अवघड आहेत कांहीं सहज आहेत. सगळी क्षेत्रे तो त्याच्या आयुष्यात करू शकणार नाही, पण तो कल्पनेने तेथे जाऊ शकतो म्हणून त्यांची माहिती मी अशी दिली आहे किं, तू तेथे निदान कल्पनेने जाऊ शकशिल. तेथे जाऊन वसु, मरुत, आदित्य, आश्विनी, ऋषी अशा दैवी शक्तींच्या प्रभावाखाली जरी घरात स्नान केलेस व ते तीर्थातील जल आहे असं समजून साधना केलीस तरी तुझे कार्य यशस्वी होईल. कारण भिष्मा, हे सगळे आपल्यातच असते. परंतु, भ्रमामुळे ते समजत नाही. वेदात ते ज्ञान दिले आहे तेंच मी तुला आता सांगितले. ज्याचे मन स्थीर नाही, ज्याच्या मनात कली घुसला आहे, ज्याचे ब्रह्मचर्य अशुद्ध आहे, ज्याचा अहंकार भ्रष्ट झाला आहे, ज्याचा स्वार्थ विकृत आहे असा मनुष्य तीर्थयात्रा करण्यास अयोग्य असतो. अशा माणसाने केलेली यात्रा तीर्थक्षेत्राची यात्रा न होता केवळ भटकंती ठरतो. त्याचा कांहींही उपयोग नसतो. ज्याच्यात हे दोष नाहीत असा सामान्य माणूस तीर्थयात्रा करण्यास परिस्थितीमुळें असमर्थ असेल तर, जरी कल्पनेने घरात बसून तीर्थयात्रा करील तर ही तो ते पुण्य मिळवू शकतो असें सांगतात. परंतु, अरे भिष्मा, तू तसा नाहीस. तुझा स्वार्थ गुणी, सत्त्वशिल आहे. तुझे वैराग्य तेजस्वी आहे. तुझे ब्रह्मचर्य शुद्ध आहे आणि तू शरीराने तीर्थयात्रा करण्यास सक्षम आहेस म्हणून तू ह्या तीर्थयात्रा करण्यास योग्य ठरतोस. तुझ्या अशा परिक्रमणा तुझ्या पितरांना समाधान देतील. देव प्रसन्न होतील व तुला पुढचा मार्ग दाखवतील. तू पृथ्वीवरचा वसवा आहेस. म्हणून तू वसुंना प्रसन्न करू शकशिल. आणि अनंतकाळ प्रसिद्ध रहाशिल. पुलस्त्य ते सांगून भिष्माची रजा घेतात व त्याला यात्रा सुरू करण्याचा संकल्प सोडण्यास सांगून अंतर्धान पावतात. भिष्म त्यानंतर त्या सगळ्या तीर्थयात्रा शास्त्रविधीनुसार आरंभतो. सर्व

तीर्थयात्रांच्या शेवटी तो प्रयागला पोहोचतो. त्याची सगळी लहान मोठी पापं नष्ट झालेली असतात. जो तिर्थंकर त्या सगळ्या यात्रा साक्षात करतो तो शंभर अश्वयज्ञाचा मानकरी ठरतो व मृत्यूनंतर मोक्ष प्राप्त करत असतो.

नारद असें सांगत असतात युधिष्ठीराला. जसें पुलस्त्याने भिष्माला सांगितले तसेच ते नारदांनी युधिष्ठीराला सांगितले होते ते मी वैशंपायन अरे राजा जनमेजया तुला सांगत आहे. वैशंपायन पुढे सांगतात, असे बोलून नारद युधिष्ठीराला सांगतात किं, तुझ्या ह्या परिस्थितीत यज्ञ करण्यापेक्षा त्याहूनही जास्त लाभदायक असें तीर्थाटन पांडवांनी करावे त्याच्यामुळें तुमचे पूण्य वाढेल व अनेक राजसूय, अश्वयज्ञ, अग्नीश्तोम, वाजपेय असें विविध यज्ञ केल्याचे फायदे मिळतील. त्यासाठी वनवासात वेळ घालवण्यापेक्षा तीर्थाटन हांच तुमच्यासाठी योग्य मार्ग आहे असें नारद पांडवांना सांगतात. त्याशिवाय अनेक प्रकारची दानं केल्याचे भाग्य लाभेल. त्यात तुमचा काळ सुखात जाईल व गत घटनांच्यावर जे आज तुम्ही खंत करत अहात ते करावयाची आवश्यकता रहाणार नाही. कारण तीर्थाटन हा चांगला उपक्रम समजला जातो. तिर्थयात्रा करण्यासाठी जे आठ गुण [दानशूरपणा, तपश्चर्या करणे, खरे बोलणे, हित करणे, क्षमा करणे, उपोषण करणे, वासनांना आवर घालणे आणि वेदांचा अभ्यास (ज्ञानसाधना) करणे] यात्रीत असणे जरुरीचे असते ते तुझ्यात आहेत. परंतु, त्यातील बर्याच तीर्थक्षेत्री राक्षसांचा सुळसुळाट फार झालेला आहे. परंतु, तुम्ही पांडव धनंजय नसला तरी त्या राक्षसांचा मुकाबला करू शकाल. तुम्ही जर तेथील राक्षस हटवले तर ते एक मोठे पुण्यकर्म तुमच्याकडून होईल. मला तुम्हाला सांगावयास हर्ष होतो किं, त्या तीर्थक्षेत्री महान ऋषी जसें, वाल्मिकी, काश्यप, अत्रेय, कुंडजथ्रा , विश्वामित्र, गौतम, एसित, देवल, मार्कंडेय, गलव, भारद्वाज, वसिष्ठ, उद्दलक, शौनक, त्यांचा मुलगा आणि व्यास, दुर्वास असें सगळे तुमची वाट पहात आहेत. तुम्ही जाणार असाल तर ऋषी लोमसा तुमच्या बरोबर येऊ इच्छितात. तुम्ही त्याला तुमचा मार्गी (वाटाड्या) करावे म्हणजे तुमचा प्रवास सुखरुप होईल. त्याशिवाय आणखीन कितीतरी तुमच्या सह यात्रेत सामील होतील जे ब्राह्मण आज येथे आहेत. मी नारद ठिकठिकाणी तुम्हाला भेटतच जाईन. ह्या तीर्थयात्रेने तुमची ख्याती दूरवर होईल. जशी महाभिषाची झाली होती. त्या प्राचीन ययाति व पुरुरव ह्यांच्या सारखी तुझी ख्याति

सर्व कडे होईल. प्राचीन राजा भगीरथ व राम जसें त्यांच्या गुणां करता ओळखले जात होते तसे तू ओळखला जाशिल अशा यात्रे नंतर. जसें मनु किंवा इक्ष्वाकू तसेंच पुरू किंवा वैन्य आणि वृत्राचा नाश करणारा इंद्र त्यांच्या दुश्मनांचा संहार करून मान्यवर झाले तसे तू तुझ्या वैर्यांचा नाश करून सर्वात मान्यवर होणार आहेस. त्यानंतर तुम्ही राज्य कराल निर्विघ्नपणे. तुला त्या थोर क्षत्रियासारखी, कार्तवीर्यरूणा सारखी प्रसिद्धी मिळेल.

पुढे वैशंपायन सांगतात, अरे राजा जनमेजया, अशारितीने त्याची समजून काढल्यानंतर नारद त्यांची रजा घेतात. आणि नेहमीप्रमाणे, अंतर्धान पावतात. त्यानंतर राजा युधिष्ठीर तेथे जमलेल्या ब्राह्मणां बरोबर तीर्थयात्रेच्या बद्दल चर्चा करू लागतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वाचा सहावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग सातवा

वैशंपायन सांगत असतात, आपल्या भावांचे विचार लक्षात घेऊन व नारदांचा सल्ला श्रेष्ठ मानून युधिष्ठीर धौम्य ऋषींना जे पांडवांसाठी ब्रह्मदेवासारखे होते, बोलतात, "मी शास्त्रे आणि अस्त्रे मिळवण्यासाठी अर्जुनाला पाठवले आहे. तो माझ्यावर फार भरवसा करतो, आपल्याला माहीत आहे किं, भविष्यात कौरव आणि आम्ही पांडव ह्यांच्यात युद्ध होणार आहे राज्य मिळवण्यासाठी, त्यावेळी आम्हाला कौरवांच्या सैन्यातील अग्रणी भिष्म, द्रोण, कृपाचार्य, अश्वत्थामा, कर्ण अशा अतिरथींशी लढावयाचे आहे. त्यात निश्चित यश मिळण्यासाठी मी धनंजयाला त्या तोडीची व त्याहीपेक्षा जास्त कार्यक्षम अशी शस्त्र, अस्त्र आणि त्यांची मंत्रविद्या शिकण्यासाठी पाठवले आहे. ते काम तो करत आहे, हल्ली तो इंद्राच्या म्हणजे त्याच्या जन्मदात्याच्या घरी रहात असून तेथे त्यांनी सगळी महाशक्तिमान शस्त्रे मिळवली आहेत व त्याचा तो सराव करत आहे. त्याच्यात क्षत्रियाचे सहा गुण (विवेक, हिम्मत, धाडस, शौर्य, सहिष्णूता, मर्यादा) ओतप्रोत आहेत. ते होत असतांना आम्ही येथे नुसते बसून आहोत त्यामुळें त्याची फार आठवण आम्हा सगळ्यांना येत असते. आपण जाणताच अहात किं, अर्जुन व कृष्ण दोघे प्राचीन काळातील नर व नारायण असा नांवांने ओळखले जाणारे ऋषी आहेत. त्यांची गुणवत्ता अप्रतिम आहे. ते दोघे जर एकत्र असतील तर अपयश येण्याचा संभव नसतो हेसुद्धा आपण जाणता अहात. नारदांने सुद्धा त्याबद्दल सांगितले आहे. कौरवांची नजर अर्जुनावर आहे त्यासाठी त्याला जास्त तयारीने युद्धासाठी सज्ज होणे अपरिहार्य ठरते हेसुद्धा आपण जाणता अहात. जर आम्ही पूर्ण तयारीने सज्ज नाही झालो तर माझे सगळे सैन्य ते अतिरथी कापरासारखे जाळून टाकतील अशी मला भिती वाटते. फक्त धनंजय आणि कृष्ण असें दोघेच आमच्याकडे आहेत ज्यांच्यापुढे कर्णाची ताकद टिकाव धरू शकणार नाही. माझा विभत्सू इंद्राकडून व महादेवाकडून ती प्रभावी शक्तिशाली आयुध आणेल तसें झाले तरच आम्ही त्या युद्धात कौरवांचा पाडाव करू. तो माझा बंधू विभत्सू ते कार्य करत असतांना आम्ही येथे रिकाम टेकडे नुसते बसलो आहोत. त्यामुळें आम्हा सगळ्यांना ह्या कम्यक वनात रहाण्याचा कंटाळा आला आहे. त्याबद्दल मी नारदमुनींना विचारले तेव्हां त्यांनी पुलस्त्य ऋषींने जे मार्गदर्शन आमचे पणजोबा भिष्म ह्याना केले तेच मला सांगितले ते आपण ऐकले आहेच.

येथे राहून मला पुनः पुन्हा कौरवांकडून झालेल्या अपमानाची सारखी आठवण येते व फार मनस्ताप होतो. जरी माझ्या सोबत सगळी पवित्र ब्राह्मण मंडळी असली व खाण्यापिण्याची ददात नसली तरी त्या आठवणींपासून दूर जाण्यासाठी कांहीं केलें पाहिजे असें मला सुद्धा वाटत आहे. म्हणून मी आपल्याला विनंती करतो किं आपण असें कांहीं सुचवू शकाल कां, जेथे जाण्याने आपल्या मनाला आनंद होईल व समय चांगल्या प्रकारे व्यतीत होईल. मी हे अरण्य कम्यक, सोडून जाऊ इच्छितो, आपले काय मत आहे ते कृपया सांगा कारण आपल्या मतानुसार आम्ही पांडव तसे करू इच्छितो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वाचा सातवा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग आठवा

वैशंपायन सांगतात, पांडवांना हतबल व निराश झालेले पाहून धौम्य ऋषी जे बृहस्पतिसारखे श्रेष्ठ होते, युधिष्ठीराला सांगतात, "अरे निष्पाप राजा, मी तुझे दुःख समजू शकतो. मी तुला कांहीं पवित्र आश्रमांबद्दल, तीर्थक्षेत्रांबद्दल सांगू शकतो जेथे गेल्याने तुम्हा पांडवांना समाधान वाटेल. कांहीं पर्वत आहेत तेथेसुद्धा तुम्ही जाऊ शकता. त्यासाठी ज्यामुळें तुमचा समय आनंदात जाईल. तशा मनाला प्रसन्नता देणार्या ठिकाणी तू व द्रौपदी आणि बाकीचे पांडव त्यांचा समय चांगल्या प्रकारे व्यतीत करू शकाल. त्या दृष्टीने माझ्या मते पूर्व दिशेने असलेले सुंदर प्रदेश विचारात घेण्यासारखे आहेत. तेथे अनेक राजर्षी रहातात. त्या ठिकाणी एक प्रदेश आहे ज्याला सगळे **नैमिष** म्हणतात, तो स्वर्गासारखा आहे. तेथे स्वर्गीय देवता नेहमी जात असतात. त्या भागात बरीच पवित्र तीर्थक्षेत्रेसुद्धा आहेत. त्या प्रदेशातून पवित्र नदी **गोमती** वहात असते. तेथे यज्ञ करण्यासाठी उत्तम अशा कांहीं जागा आहेत. त्यात उल्लेख करण्यासारखा आहे गयेचा पर्वत. तेथे बरेच राजर्षी जात असतात तीर्थ यात्रा करण्यासाठी. तेथे सूर्यासाठी यज्ञ करण्यासाठी म्हणून एक जागा आहे. त्या क्षेत्रा अक पवित्र सरोवर आहे त्याचे नांव आहे, **ब्रह्मसर**, त्याला राजर्षी फार मानतात. अरे युधिष्ठीरा पूर्वीपासून असे म्हणतात किं, अनेक पुत्र जन्माला घालावेत म्हणजे निदान त्यातील एकतरी **गया** पर्वताला भेट देईल. त्या तीर्थाला भेट देणार्याला अश्वयज्ञ केल्याचे श्रेय मिळते. त्याशिवाय मागच्या व पुढच्या दहा पिढ्यांचे कल्याण होते. तेथे एक मोठी नदी आहे. तिला **गयासीर** म्हणतात. त्या ठिकाणी एक वडाचा वृक्ष आहे. ब्राह्मण त्याला अनादिअनंत वृक्ष असें मानतात. तेथे पितरांना दिलेला शिधा कायम पुरतो. त्या जागेतून एक नदी वहाते तिला **फाल्गु** नदी असें म्हणतात. तिचे पाणी पवित्र समजले जाते. त्याशिवाय तेथे एक जागा आहे, त्या जागेला **कौशिकी** म्हणतात. त्या परिसरात सदैव फुल व फळांनी डवरलेले वृक्ष आहेत. तेथे मिळणारी कंदमुळं चवदार असतात. तेथे विश्वामित्र त्यांची तपस्या करत असतं. तेथेच त्याना ब्राह्मण पद मिळाले. त्या परिसरातून गंगा सुद्धा वाहते. त्या भागातील गंगेच्या तटांवर भगिरथाने अनेक यज्ञ केले होते. त्या यज्ञात त्याने मोठी मोठी दानं केली होती". धौम्य पुढे सांगतात, "पांचाल देशांत एक वन आहे त्याचे नांव आहे, **उत्पल**. तेथे कौशिक वंशाच्या प्रसिद्ध राजा, विश्वामित्राने त्याच्या पुत्रासह यज्ञ

केले होते. विश्वामित्राचे अमानवी सामर्थ्य पाहून चकित झालेला जमदाग्नीचा मुलगा राम त्याची स्तुती करतो. कम्यक वनात विश्वामित्र इंद्राबरोबर सोमरस प्याला होता. त्यानंतर त्याने क्षत्रिय पर्णाचा त्याग केला व स्वताला तो ब्राह्मण सांगू लागला. तेथे गंगा यमुना संगमाचा भाग आहे तेथे स्नान केल्याने सर्व पाप धुतली जातात. त्याला आम्ही ऋषी फार मानतो. फार प्राचीन काळी ब्रह्मदेवानी यज्ञ केले होते. म्हणून त्या भागाला **प्रयाग** असें नांव पडले. त्या मार्गात अगस्त्य ऋषींचा आश्रम आहे. तो आश्रम ज्या वनात आहे त्याला **तपस वन** असें नांव आहे. तेथे अनेक ऋषी आणि राजर्षी नित्य यात्रा करत असतात. तेथे एक श्रेष्ठ दर्जाचे तीर्थक्षेत्र आहे त्याला **हिरण्यविंद** म्हणतात. ते तीर्थक्षेत्र कलंजारा पर्वतावर आहे. तो सगळा प्रदेश अतिशय नयनरम्य आहे. वातावरणसुद्धा सदैव प्रसन्न करणारे आहे. त्या परिसरात आणखीन एक जागा आहे, तो डोंगर **महेंद्र** म्हणून प्रसिद्ध आहे. भृगुवंशातील राम त्या ठिकाणी यज्ञ करुन गेला आहे. ब्रह्मसर सरोवरात भागिरथी शिरते. तेथे रहाणारे लोक पुण्यप्रभावी आहेत व त्यांच्या केवळ दर्शनाने पुण्य मिळत असते. त्या जवळ मांतंगऋषींचा आश्राम आहे. त्याला **केदार** म्हणतात. त्या ठिकाणी एक डोंगर आहे ज्याला **कुंद्रोद** म्हणतात. त्या तेथे असलेल्या वाहत्या झर्याचे पाणी निशाद राजा नळ ह्याने पिऊन त्याची तहान भागवली होती. त्या जवळ **देववन** आहे. पुष्कळ संन्याशी तेथे वस्ती करतात. त्या परिसरार एक नदी आहे जीला **वहुदा** म्हणतात. त्या शिवाय डोंगराच्या पलिकडे त्याच्या माथ्यावरून वहाते **नंदा** नांवाची नदी. अरे राजा मी तुला पूर्वेकडील तीर्थक्षेत्रांची थोडक्यात माहिती सांगितली. तुला इतर दिशांतील तिर्थक्षेत्रांची महिती पाहिजे आहे कां"? अशारितीने तीर्थयात्रा पर्वाचा आठवा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग नववा

धौम्य पुढे सांगत रहातात, एक युधिष्ठीरा, माझ्या माहितीप्रमाणे मी आता तुला दक्षिणेकडील पवित्र तीर्थक्षेत्रांची माहीती सांगतो. त्या भागात एक अतिपवित्र नदी वहात असते तिचे नांव आहे **गोदावरी**. त्या प्रदेशाला महारठ्ठ असें म्हणतात. दर्या खार्यातून ती वहात असते तिच्या तटावर संन्याशी नेहमी जात असतात. तिच्यानंतर आहे **वेण्णा** आणि नंतर येते **भिमा**. त्या नद्यात स्नान केल्याने व्रतस्थ असलेल्याची पाप धुतली जातात. त्याच्या सभोवार वनश्री आहे व तो प्रदेश अतिसुंदर आहे. त्या वनश्रीमध्ये विविध प्रकारचे पक्षी, हरणं, सांबरं मोठ्या संख्येने वावरत असतात. त्या प्रदेशात संन्याशाचे आश्रम आहेत. तेथे राजर्षी **नृगा**चे तीर्थ आहे. तेथे आणखीन एक नदी आहे तिचे नांव आहे **पयुशनि**. तेथे ब्राह्मणांचे येणे जाणे नित्य असते. तेथे महान ऋषी मार्कंडयने नृगराजाची स्तुती केली होती. जेव्हां तो पयुशनि नदीच्या तटावर वराह यज्ञ करत होता. त्या प्रसंगी इंद्र सोम जास्त प्यायल्याने बेहोष झाला होता. त्यावेळी ब्राह्मणांना दिलेल्या भेटवस्तुंमुळें तेसुद्धा संतुष्ट झाले होते. असें म्हणतात त्या नदीचे पाणी जरी हवेच्या जोरामुळें माणसावर शिंपले गेले तरी त्याची पापं जी तो त्याच्या आयुष्यात करणार आहे ती सगळी त्या पाण्याने धुतली जातात. तेथे शिवाची एक प्रतिमा आहे जी पाहिल्याने भाविक साक्षात शीवाच्या लोकांत जातो. जर तुलना केली एका बाजूस गंगेचे जल व दुसर्या बाजूस पयुशनि, माझ्यामते ते जास्त प्रभावी आहे. त्या नंतर **वरुणश्रोतस** नांवांचा डोंगर आहे, त्यावर **मथार** नांवाचे वन आहे. त्या वनात झाडे फुलांफळांनी नेहमी डवरलेली असतात. तेथे यज्ञ केले जातात. असें सांगतात, किं, **प्रवेणी**च्या उत्तरेस **कण्वमुनींचा आश्रम** आहे. त्याशिवाय इतर अनेक ऋषींचे आश्रम आहेत. तेथे एक तीर्थक्षेत्र आहे त्याचे नांव आहे, **सुर्पारक**. तेथे ऋषी जमदाग्न ह्याचे दोन यज्ञ कुंड आहेत त्याचे दर्शन घ्यावयाचे असते. त्या कुंडांची नांवे आहेत , **पाषाण** व **पुनसचंद्र**. त्याच्या जवळ एक तीर्थक्षेत्र आहे त्याच नांव आहे **अशोक**. त्या परिसरातसुद्धा ऋषींची भरपूर साधना स्थळं आहेत. त्यामुळें तेथे अरे कुंतीपुत्रा , फार मोठा पुण्यसंच होत असतो. त्या परीद्यांच्या देशात अगस्त्य व वरुण ह्यांची स्थानं आहेत. तेथे **कुमारी**चे तीर्थक्षेत्र आहे. आता ऐक कुंतीपुत्रा , मी तुला **ताम्रपर्णी** ची माहिती सांगतो. त्या तिर्थक्षेत्री साक्षात देव मोक्ष मिळवण्यासाठी तपस्या करत होते. त्या

परिसरात एक गोकर्ण नावाचा तलाव आहे. तो तलाव त्रैलोक्यात प्रसिद्ध आहे. तेथील पाणी फार थंड असते. ते पवित्र आणि भाग्यकारक असते. त्या पाण्याने अर्घ्य देण्याने मोठे पुण्य मिळते. परंतु, त्या तलावाजवळ जाणे फारच दुरापास्त आहे. जर तुम्ही पुण्यवान नसाल तर तेथवर तुम्ही पोहोचू शकत नाही. त्या जवळ एक तीर्थ क्षेत्र आहे जे अगस्त्याच्या शिष्याचे आहे. त्याला **देवसभा** असें म्हणतात. तेथे घनदाट वनश्री आहे. फळांची व कंदमुळांची रेलचेल असते. त्यामुळें तेथे साधक ध्यानसाधना करण्यासाठी मोठ्या संख्येने जातात. तेथे डोंगर आहे त्याचे नांव आहे, **वैदुर्य**. त्या पहाडात मौल्यवान रत्नांच्या खाणी आहेत. स्वाभाविकपणे तो प्रदेश संपन्न आहे. त्या डोंगरावर सुद्धा अगस्त्य ऋषींचा आश्रम आहे. ही दख्खनची तीर्थक्षेत्र झाली आता मी तुला सांगतो सौराष्ट्रातील पवित्र जागांबद्दल. तेथे जो समुद्र किनारा आहे तेथे **चमसोद्भेद** तीर्थक्षेत्र मशहूर आहे. त्याशिवाय **प्रभास** आहे. ती तीर्थक्षेत्रे देवांना फार पसंत असतात. त्या भागात **उजयंत** नांवाचा डोंगर आहे. तेथे प्राचीन ऋषी नारद श्लोक गात असतं. तेथे जर तू वैराग्यपूर्ण असे व्रतस्थ जीवन जगलास तर तुला ते अतिप्राचीन काळी गाईलेले नारदांचे श्लेक आजही ऐकू येतात. ते श्लोकांचे ध्वनि त्या आकाशात कायम गुंजत असतात. फक्त योग्य माणसालाच ते ऐकायला येतात. त्याजवळ आहे **द्वारका** (**द्वारवती**) तीर्थ. तेथे मधू राक्षसाचा वध करणारा केशव ज्यास तुम्ही सगळे पांडव, कृष्ण म्हणून ओळखता तो रहातो. खरे तर, तो अतिप्राचीन व नित्य सत्य असा आहे. केशव म्हणजेच गोविंद अति शुद्ध निर्मळ असा आहे. सगळ्या पुण्यप्रभावाचा कस आहे. त्याच्यापेक्षा श्रेष्ठ असे कांहीं ही नाही. तोंच जीवनातील मुलभूत तत्त्व आहे. तो पूर्ण ब्रह्म आहे. असा तुमचा आमचा कृष्ण तेथे रहात असतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील नववा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग दहावा

धौम्य पुढे सांगत असतात, आता मी सांगतो पुण्य कमावण्यासाठी चांगली असलेली तीर्थक्षेत्रे जी पश्चिमेकडे आहेत. त्या प्रदेशाला आपण अनारद्व म्हणतात. तेथे पश्चिमवाहीनी अशी नदी नर्मदा वहात असते. तिच्या सभोवारच्या प्रदेशात प्रियंगु व आंब्याच्या राई आहेत. त्याशिवाय वेत व बांबूची बेट तेथे भरपूर वाढलेली आहेत. सगळ्या तीर्थांकडे जसे नद्या, तलाव, वनश्री असतात तसे सगळे येथे सुद्धा आहेत. साक्षात ब्रह्मदेव त्यांच्या सोबत ऋषी, चरण, सिद्ध अशांना घेऊन तेथे सदैव जात असतात. नर्मदेच्या पवित्र पाण्यात स्नान करण्यात भाग्य आहे असें समजतात. असें सांगतात किं, तेथे मुनी विश्रवास ह्यांचा आश्रम आहे. तेथे वास्तविक संपत्तीचा देव कुबेर (दैवी संपत्तीची देवता लक्ष्मी आहे) जन्मला होता. तेथे एक ख्यातनाम तीर्थ आहे एका डोंगरमाथ्यावर त्याचे नांव आहे, **वैदुर्य**. त्या डोंगरावरील वृक्षांना नेहमी फुल व फळं असतात. त्या डोंगरमाथ्यावर एक टांकी आहे त्यात सुंगर कमळं सदैव उमलत असतात. तेथे देव आणि अप्सरा, गंधर्व भटकण्यासाठी जातात. तो प्रदेश साक्षात पृथ्वीवरील स्वर्ग समजावा इतका प्रसन्न आहे. म्हणून तेथे सिद्ध नेहमी जातात. त्या जवळ विश्वामित्री नांवाची नदी आहे. ती विश्वामित्रानी उत्पन्न केली असे समजतात. त्या नदीच्या तटांवर असंख्य तीर्थक्षेत्रे आढळतात. असें सांगतात किं, राजा ययाती, नहुषाचा मुला, स्वर्गातून पडला. तेथे असलेल्या **मैनक** पर्वतावर एक तलाव आहे त्याचे नांव आहे **पुण्य**. तेथे आणखीन एक डोंगर आहे त्याचे नांव **असित**. त्या ठिकाणी फळं, कंदमुळं विपुल असतात. म्हणून ती जागा साधकांसाठी पर्वणीची जागा आहे. तेथे **काकक्षासेना**चा आश्रम आहे. तेथे **च्यवन ऋषीं**चा सुद्धा आश्रम आहे. ते तीर्थक्षेत्र असे आहे युधिष्ठीरा कीं, फार मेहनत न घेतासुद्धा माणसाला साधना करणे सोपे होते. तेथील दैवते त्याला मदत करत असतात. त्यानंतर आहे **जंबुमार्ग**. तेथे साधक योगी वगैरे भटकण्यासाठी येतात. तेथे निसर्ग फार सुदर आहे. सगळे मन प्रसन्न करणारे आहे. त्यापुढे **केतुमाला** नांवाचे क्षेत्र आहे. त्यानंतर आहे **मेध्या** जेथे बैरागी साधना करत असतात. त्यानंतर आहे **गंगाद्वार**. तेथे **सैंधव** नावांचे अरण्य आहे. तेथे अनेक ऋषी वस्तीकरून रहातात. असें समजतात कीं, तेथे मातीतून मीठ बाहेर येते. ते क्षेत्र ब्रह्मदेवाचे खास आहे. त्याजवळ आहे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पुष्कर. मोक्ष मिळवण्याच्या उद्देशाने ते सगळे मुनी तेथे

यात्रा करत असतात. पुष्करात स्नान करणार्याचे पापं धुतले जाते जर तो त्या योग्यतेचा असेल. त्यानंतर तो यात्री मृत्यूनंतर स्वर्गात जातो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील दहावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग अकरावा

धौम्य सांगत असतात, आता मी तुला सांगतो माहिती उत्तर दिशेला असलेल्या तीर्थक्षेत्रांची. ती माहिती नीट लक्ष देऊन ऐक. नीट मन लावून ऐकण्यामुळें ते सांगितलेले चांगले समजते व त्याचे फायदे होतात. त्या उत्तर भागात सरस्वती नदी वाहत असते. तिच्या बाजूने समुद्राला जाऊन मिळणारी यमुना नदी वाहत असते. यमुना नदीचा प्रवाह फार वेगवान आणि उसळणारा असतो. तेथे एक तीर्थक्षेत्र आहे त्याला मी **प्लाक्षवातरण** असें म्हणतो. ते अतिशय पवित्र स्थान आहे. त्या ठिकाणी ब्रह्मांने फार प्राचीन काळी सारस्वत यज्ञ केला होता. त्या जवळ आणखीन एक तीर्थ क्षेत्र आहे त्याचे नांव आहे **अग्नीशिरस** तेथे स्नान व पुजा केल्याने मोठे पुण्य प्राप्त होते. त्याची जमीन साम्य फेकून प्राचीन काळचा राजा सहदेव ह्यांने मोजली होती. त्याची स्तुती इंद्राने केली होती ती कवन अजून ज्ञानी लोक आठवतात. त्या यमुना नदीच्या तटावर त्या सहदेवांने यज्ञ केला होता. हजारो ब्राह्मणांना त्याने दानं व भेटी दिल्या होत्या. त्या महान राजाने तेथे पांचशे तीस अश्वयज्ञ केले होते. आम्ही फार प्राचीन काळी होऊन गेलेल्या सरभंगाबद्दल ऐकले आहे. तो सगळ्यांच्या इच्छा पूर्ण करत असें. त्या महान ऋषीचा आश्रम तेथे आहे. त्यामुळें तेथे पुण्यप्रभाव फार आढळतो. अरे कुंतूसुता , कौंतेया, ही **सरस्वती नदी** सगळीच्या सगळी पुज्य आहे. म्हणून ती हेंच एक मोठे तीर्थक्षेत्र झाले आहे. ह्याच स्थानी महान ऋषी वालखिल्य हेसुद्धा येथेच यज्ञ करत असतं. त्या परिसरात आणखीन एक नदी आहे तिचे नांव आहे **दृशद्वती**. त्यानंतर आहे **न्यग्रोधाक्य, पांचालख्य** व **पुन्यक, दालभ्यघोषा, दालभ्या** हे सगळे पवित्र आश्रम आहेत आनंदयासास ऋषींचे. त्यानंतर आहे एतवर्ण व अववर्ण जे ब्राह्मण वेदाच्या ज्ञानात अग्रणी होते. ते अनेक प्रसिद्ध यज्ञ करत असतं. त्याशिवाय आणखीन एक **विशाख्यायुप** तीर्थ आहे जेथे अतिप्राचीन काळी वरुण आणि इंद्र स्वतः आले होते. त्या दोघांनी तेथे घोर तप केले होते. त्यामुळें ती जागा फार पवित्र झाली आहे. त्यानंतर आहे **पालाशक**. जेथे ऋषी जमदाग्नीने तप केले व यज्ञसुद्धा केले होते. असें सांगतात तेथे त्या नद्या मानवी रुप घेऊन त्या ऋषींच्या भोवती फिरत होत्या. ते पाहून विभावसु (अग्नीदेव) ह्याने त्या ऋषींच्या स्तुतीप्रित्यर्थ कवन गाईली होती.

"पहा त्या नद्या जमदाग्नी भोवती फेर धरून नाचत आहेत. जो यज्ञ करून देवांना संतुष्ट करत आहे व ब्राह्मणांना समाधान देत आहे".

ज्या जागी गंगा पहाडाच्या कठोर कपार्या फाडून उताराला येते जेथे गंधर्व, राक्षस, अप्सरा, किन्नर वावरत असतात. त्या जागेला **गंगाद्वार** म्हणतात. अरे युधिष्ठीरा, सनत्कुमार ती जागा तीर्थक्षेत्र म्हणून मानतात जेथे ब्रह्मर्षी जात असतात ती **कनथल** फार पवित्र समजली जाते. तेथे एक पहाड आहे ज्याचे नांव आहे **पुरु** व जेथे राजा पुरुरव जन्मला व जेथे भृगुने घोर साधना केली. त्या परिसराला आज **भृगुतुंग** म्हणतात. त्या स्थाना जवळ महान तीर्थ आहे ज्याला भ**द्री** (बद्रीनाथ) म्हणून ओळखतात. तेथे भृगुचा आश्रम आहे. अरे कौंतेया, जो भूत आहे, वर्तमान आहे व भविष्य सुद्धा आहे असा नारायण आणि विष्णू जो अनंत आहे, जो उत्तम पुरुष म्हणून समजला जातो, जो सदैव महत्वाचा असतो तो ह्या भद्रीकडे असतो. असें सांगतात, हल्लीचा गंगेचा पाण्याचा प्रवाह थंड आहे तो पूर्वी उन होता. त्या गंगेच्या किनार्यावर सोन्याची वाळू होती. तेव्हां ते श्रेष्ठ ऋषी नारायणाला भेटले व त्यांच्या विनंतीमुळें ते पाणी थंड झाले. नारायण, सर्व देवांत श्रेष्ठ, तो ह्या तीर्थात रहात असतो. नारायण जो जगाचा आत्मा आहे, जो सर्व पुण्याचा कस आहे, जो सगळ्या योग्यात श्रेष्ठ आहे, जो अनादि अनंत आहे, जो ह्या जगाचा कर्ता त्राता व विघाता आहे. ज्याच्या भोवती सगळे ज्ञानी, ऋषी यात्रा करतात. तो ह्या प्रदेशात आहे. समजले कां पांडवा. नारायण ही अति प्राचीन देवता आहे. विश्वाच्या निर्मितीच्या आधीपासून ती आहे. म्हणून हे तीर्थ सर्वात जास्त महत्वाचे ठरते. अशी सगळी तीर्थ आहेत, माझ्या राजा, जेथे तुम्ही यात्रा करण्यासाठी जाऊ शकता. त्या तीर्थक्षेत्री वसु, साध्य, आदित्य, मरुत आणि आश्विनी नेहमी जात असतात. जे स्वतः स्वर्गीय दैवता आहेत. तेथे तुझ्याबरोबर जे ब्राह्मण आहेत त्यांना घेऊन तुम्ही सगळे भाऊ व पांचाली असें सगळे यात्रेला जा. ह्या उपक्रमामुळें तुझ्या विवंचना लुप्त होतील.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील अकरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग बारावा

वैशंपायन सांगतात, अरे कुंतीपुत्रा , अशाप्रकारे धौम्य सांगत असतांना त्याच वेळी श्रेष्ठ ऋषी लोमस तेथे उपस्थित झाले. धौम्याचे विवेचन संपले होते व म्हणून त्यानंतर ते सगळे पांडव आणि ब्राह्मण, लोमस ऋषींच्या भोवती जमा झाले. जसें स्वर्गात देव इंद्राभोवती गोळा होतात तसे ते झाले होते.

युधिष्ठीर लोमसांचे क्षेमकुशल करतो व येण्याचे प्रयोजन काय म्हणून विचारतो. ते ऐकल्यावर ऋषी लोमस त्यांच्या नेहमीच्या मृदू स्वरात सांगतात, ते त्यांच्या भटकंतीत स्वर्गात गेले होते. तेथे त्यानी अर्जुनाला इंद्रसभेत इंद्रा बरोबर त्याच्या आसनावर बसलेले पाहिले. त्याचे त्याना आश्चर्य वाटले. त्यानंतर शक्र मला बोलले कीं, मी तुम्हास पृथ्वीवर जाऊन भेटावे व सांगावे त्यांच्या बंधूची खुशाली. त्यानंतर अर्जुनसुद्धा मला तशीच विनंती करतो, तो म्हणाला त्याला त्याच्या धाकट्या भावांची फार आठवण येते, म्हणून मी तुम्हाला भेटण्यास आलो आहे. मी आता सांगतो काय तेथे झाले, तुझ्या बरोबर हे सगळे ब्राह्मण व कृष्णासुद्धा ते ऐकेल तर ते उत्तम होईल. पार्थाने रुद्राकडून त्यांची सगळी आयुध मिळवली आहेत. ज्यासाठी तू त्याला तेथे पाठवले होतेस. शीवांने तपस्या करून मिळवलेली ती आयुध जी समुद्रमंथनातून बाहेर आली होती व जी कोणालाही पेलत नव्हती. ती आता विभत्सूकडे आहेत तो त्यांचा सराव करत आहे. तसा सराव पृथ्वीवर करणे श्रेयस्कर नाही म्हणून तो तेथेच इंद्राच्या घरात रहात आहे. त्या आयुधाचे तंत्र व मंत्र तो शिकत आहे. त्यांने इंद्राचे वज्र व दंड सुद्धा मिळवले आहे. त्या शिवाय ब्रह्मास्त्र त्याच्या कडे आहे. यम आणि कुबेराने सुद्धा त्याला त्यांची आयुध दिली आहेत. हि आयुधं कशी फेकावयाची, कशी परत बोलवावयची, उलटवावयाची अशी सगळी पद्धत तो शिकत आहे. ती जागृत कशी करावयाची व कशी निद्रीस्त करावयाची हे सगळे तो शिकत आहे. पुढे ऋषी लोमस बोलतात, वरुणानीसुद्धा त्याचे आयुध अर्जुनाला दिले आहे. त्या शिवाय तो अप्सरांकडून सर्व प्रकारची संगीतातील वाद्ये वाजवायला शिकला आहे. तो नृत्यसुद्धा शिकत आहे. तो विश्ववसुच्या मुलाकडून वेदातील सामचे उच्चारण कसे करावयाचे ते सुद्धा शिकत आहे. ते सगळे शिकत तुमचा भाऊ तेथे मजेत रहात आहे. एवढे सांगितल्यावर तो ऋषी युधिष्ठीराला बोलतो अरे राजा आता नीटपणे ऐक मी काय सांगत आहे ते. स्वर्गाचा

राजा तुला निरोप देत आहे किं, जोपर्यंत अर्जुन सर्व विद्या शिकून पृथ्वीवर परत येईल तोपर्यंत तुम्ही पांचजण वैराग्यपूर्ण जीवन जगण्यात आपला समय व्यतीत करतील व जमल्यास तीर्थाटन करतील त्यामुळें तुमची शक्ती वृद्धींगत होऊन ती पुढील समयासाठी उपयोगी येईल. ह्याचे कारण असें आहे किं, तुम्हाला कर्णाशी मुकाबला करावयाचा आहे. जो तुमच्यावर प्राणपणाने वैर धरून लढणार आहे. इतर ज्यांची तुम्ही भिती धरता तो म्हणजे, भिष्म, द्रोण, कृप तुम्हाला हात लावणार नाहीत कारण ते मनाने तुमच्या बरोबर आहेत. म्हणून फक्त कर्णाचेच खरे आव्हान आहे. तो मोठा तपस्वी आहे. त्याच्या तपस्येने तो दुसरा आदित्य होत आहे कारण तो स्वतः आदित्याचाच पुत्र आहे. त्याच्या जन्मदात्या मातेने त्याला टाकले ते त्याच्या जन्मदात्या सूर्याला सुद्धा आवडलेले नव्हते. म्हणून त्याचे बळ सुद्धा त्याच्या बरोबर आहे. त्याची तिरंदाजी अतुलनीय आहे. म्हणून तो साक्षात महेश्वरासारखा होत आहे. तरी एक लक्षात घे किं, अर्जुन तरी कर्णाच्या पेक्षा सहापट आहे, म्हणून तू असा सतत घाबरत राहू नकोस. ते तुला जेव्हां अर्जुन प्रत्यक्ष येथे येईल तेव्हां दिसेलच. म्हणून तुम्ही जोवर तो येत नाही तोवर तीर्थयात्रा कराव्यात. जसे तू तीर्थयात्रा करशिल तुला ऋषी त्यांचे महात्म्य सांगतील.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील बारावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग तेरावा

लोमस ऋषी पुढे सांगतात, आता धनंजय तुला काय सांगतो आहे त्याचा निरोप देतो. तो तुला सांगतो आहे कीं, तुम्ही सगळे पुण्य जमवण्याच्या प्रयत्नात असावे. त्यासाठी सर्व प्रकारच्या व्रतस्थता व तपश्चरणात वेळ घालवावा. त्यामुळें तुमची नैतिकता उंचावेल व सगळ्या देवता आपल्याला पुरक होतील. त्यासाठी विविध तीर्थक्षेत्री जात रहा. तेथे दानं करा व ब्राह्मणांना संतुष्ट करा. असें तो तुला सांगत आहे. तो आणखीन बोलला किं, तुम्ही माझ्याबरोबर त्या तीर्थांना भेटी द्याव्या. पुढे तो मला बोलला किं, मी तुमचे तेथे असलेल्या राक्षसांपासून संरक्षण करावे. जसें दधीचीनें इंद्राचे संरक्षण केले व अंगिरसानी सूर्याचे केले होते. तो मला विनंती करत होता कीं, मी तुमचे संरक्षण त्या राक्षसांपासून करावे जे तशा जाण्यास अवघड असलेल्या तीर्थक्षेत्री दबा धरून बसलेले असतात माणसाला खाण्यासाठी. त्यातील कांहीं डोंगरा एवढे प्रचंड आहेत. परंतु, तुमच्या संरक्षणामध्ये असतांना ते राक्षस त्यांच्या वाटेला जाणार नाहीत. अर्जुनाला दिलेल्या वचनाखातर व इंद्रानेसुद्धा लक्ष घालण्यास सांगितले असल्यामुळें, मी तुमच्या सोबत येणार आहे. तुम्हाला मी सांगू इच्छितो किं, ह्या आधीसुद्धा मी दोनदा ह्या तीर्थयात्रा केल्या आहेत. तुमच्या सोबत आलो तर ती तिसरी पाळी असेल. तुला सांगतो, "अरे युधिष्ठीरा, मनु व इतर राजर्षी असेंच तीर्थयात्रा करत होते. अशा यात्रा केल्याने तुझ्या मनातील भिती निघून जाईल. एक लक्षात घे अरे कौंतेया, जे पापप्रवृत्तीचे असतात, ज्यांची मन बेताल (चंचल) असतात, जे मूर्ख (अडाणी) असतात, जे तिर्थक्षेत्री स्नान करत नाहीत, ज्यांना नैतिकतेचे भान नसते, ज्यांना घटनांचे गांभिर्य समजून वागण्याची अक्कल नसते असें लोक तीर्थयात्रा करूनही त्याचा फायदा करून घेऊ शकत नाहीत. परंतु, तुमची बाब तशी नाही. तुमच्यात ह्या प्रकारचा एकही दोष नाही. म्हणून तुम्ही तीर्थयात्रा केल्यास त्याचा उपयोग पुढील कार्यात जे पुण्य पाहिजे ते मिळवण्यासाठी होईल. त्या यात्रामुळे जसा भगिरथाने अथवा ययातीने स्वतःचा उद्धार केला तसा तुझा होईल". ते ऐकल्यावर युधिष्ठीर सांगतो, "हे तुमचे उत्तेजक बोलणे ऐकून मला उत्साह आला आहे. तुम्हाला मी माझा आनंद सांगू शकत नाही. ज्याच्या बरोबर दैवी सामर्थ्य असलेले ऋषी सोबत येत आहेत त्याच्यासारखा भाग्यवान कोण बरे असेल? ज्याचा भाऊ धनंजय आहे, जो दुसरा इंद्रच आहे,

आपल्याला सांगतो, धौम्याच्या सांगण्यानंतर माझा निश्चय झाला आहे किं, आपण सगळे तीर्थयात्रेला निघालेच पाहिजे". पुढे तो बोलतो, "अहो ब्रह्मज्ञानी तुम्ही ठरवा केव्हा निघावयाचे म्हणजे त्याप्रमाणे आपण तयारीला लागू. आता आपण सगळे तीर्थयात्रेला जायचेच".

वैशंपायन पुढे बोलतात, ते झाल्यावर ऋषी लोमस युधिष्ठीराला सांगतात, "अरे राजा जास्त सामान घेऊ नकोस. अशा यात्रेत कमीतकमी भार असावा. आम्ही ऋषी, मुनी कांहींच न घेता निघतो पण तू तुझ्या सगळ्या परिवारासह निघत आहेस तेव्हां थोडेच अतिआवश्यक तेवढेंच जिन्नस बरोबर घेऊन निघ. त्यामुळें त्या जिकीरीच्या प्रवासात पुढे त्रास होणार नाही. आम्हा वैराग्याना उपाशी रहाण्याची सवय असते तशी तुझ्याबरोबर येणार्या पोटभर खाणार्या ब्राह्मणांना झेपेल कां ते सुद्धा पहावे. ज्यांना झेपणार नाही त्यांना शक्यतर बरोबर घेऊ नकोस. यात्रा ही, शरीराच्या सोशिकपणाची परीक्षा असते. त्यात जे यशस्वी ठरतील तेंच तुझ्याबरोबर घे. त्याशिवाय विविध ऋतुंचे नखरे सोसावे लागतात. थंडीत थंडीचा, उन्हाळ्यात उष्णतेचा, पावसाळ्यात पावसाचा असा सगळा त्रास कोणतीही तक्रार न करता सहन करणारेच यात्रा करू शकतात. ज्या ब्राह्मणांना ऐषारामाची सवय आहे, जे मिष्टान्न खाणे पसंत करतात, ज्याना चांगले रुचकर जेवणच घ्यावे असें वाटते, ज्याना सुरा पिण्याची सवय आहे, ज्यांना मांसाहाराशिवाय जमत नाही, ज्याना स्वतःचे खाद्य स्वता बनवता येत नाही अशांना तू बरोबर घेऊ नकोस. त्याच प्रमाणे आता पर्यंत जे नागरीक तुझ्याकडे इमानदारी म्हणून रहात होते त्यांना तू आतापर्यंत पोसत होतास त्यांना आता तू परत धृतराष्ट्राकडे जाण्यास सांग. असे लोक तीर्थयात्रेसाठी योग्य नसतात. परंतु जर धृतराष्ट्राने त्यांना घेण्याचे नाकारले कारण ते तुला मानतात तर त्या लोकांना तू पांचालांकडे जाण्यास सांग. दृष्टद्युम्न त्यांना सांभाळून घेईल".

वैशंपायन बोलत असतात, त्याप्रमाणे जे यात्रेच्या दृष्टीने व्यर्थ ठरले त्याना यात्रेस न्यावयाचे नाही असें ठरले. त्यामुळें कष्टी झालेले ते सगळे हस्तिनापुराकडे पाठवले गेले. हस्तिनापुरात ते पोहोचले तसें अंबिकापुत्र भिष्माला पांडव यात्रेला जात आहेत ते समजले. तेव्हा मोठ्या मनाने त्यांने त्या सगळ्या ब्राह्मणांना व यतींना आणि नागरीकांना स्वीकारले व त्यांची योग्य व्यवस्था केली. अशारितीने सगळी व्यवस्था झाल्यावर अगदी मोजके लोक

घेऊन युधिष्ठीर तीर्थयात्रेला आपला परिवार घेऊन निघाला. त्यात कृष्णा होती. त्या सर्वांनी कम्यक वनाच्च्या देवतेला आदरपूर्वक प्रणाम केला. तेथे ते सगळे तीन दिवस राहिले ऋषी लोमसांबरोबर. त्या तीन दिवसांत ते यात्रेला जाण्याची तयारी करत होते. एक वेगळेच उत्साहाचे वातावरण तेथे जाणवत होते.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील तेरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग चौदावा

वैशंपायन सांगतात, त्या तिथे असलेल्या कांहीं ब्राह्मणांने कुंतीपुत्रांना विनती करण्यास सुरुवात केली किं, "अहो कुंतीपुत्र तुम्ही आता तीर्थ यात्रेला जात अहात तेथे आम्हालासुद्धा जावेसे वाटते. परंतु, तुम्ही चांगलेच जाणता किं, तेथे आमच्यासारख्याना एकट्याने जाणे केवळ अशक्य आहे. तुमच्या बरोबर स्वतः ऋषी लोमस आहेत तसेंच ऋषी धौम्य आहेत त्याच्यामुळें तेथे पिडा देणार्या राक्षसांचा तुम्ही पाडाव करू शकाल व तुमची यात्रा संपन्न होईल. तरी आम्ही आपल्याला विनंती करतो कीं, अगदी तुमच्या गटात नसलो तरी सहप्रवासी म्हणून आम्हाला तुमच्या सोबत त्या यात्रेला चालण्याची परवानगी द्यावी. अशी संधी इतक्या पवित्र मंडळींच्या सहवासात करण्याचा योग पुन्हा येण्याची शक्यता दुरापास्त आहे. म्हणून आम्ही तुमच्या बरोबर सहप्रवासी म्हणून येऊ इच्छितो. तुमच्या बरोबर शस्त्रधारी योद्धे आहेत ज्यांच्या पुढे हिंस्र श्वापद टिकाव धरू शकणार नाहीत. म्हणजे प्रवास खडतर जरी असला तरी सुरक्षित असेल. तसे जर तुम्ही आम्हाला तुमच्या सह येण्याची परवानगी दिली तर तुमची मोठी कृपा झाला असे आम्ही समजू. ह्या निमित्ताने आम्ही सुद्धा निष्पाप होऊ शकू. जो प्रवास अष्टकांनी व कार्तवीर्यानी त्यांच्या काळात केला तो आम्ही तुमच्या कृपेने करू शकू. आम्हाला ते प्रभास, तो महेंद्र पर्वत ती गंगा, ते गंगाद्वार असें सगळे ज्यांच्याबाबत ऋषी पुलस्त्य, ऋषी धौम्य, मुनी नारद अशा सगळ्यानी जे सांगितले व नेहमी पुराणातून वाचतो व ऐकतो ते प्रत्यक्ष पहाण्याचे व त्यात स्नान करण्याचे भाग्य केवळ तुमच्या कृपेने आम्हाला प्राप्त होईल. प्रेमळ मनाचे ते पंडुपुत्र ती विनंती ऐकून आनंदाने अश्रू ढाळू लागतात. त्याना त्या लोकांची विनंती नाकारता येत नाही व ते मोठ्या मनाने एकदम बोलतात, "ठिक आहे, तसे व्हावयाचे असेल तर चला तुम्हीसुद्धा आमच्या बरोबर". त्यानंतर योग्य मुहूर्तावर त्यांना भेटण्यास नारद, व्यास आणि ऋषी पर्वत येतात व त्यांचा तीर्थयात्रेला प्रारंभ होतो. त्या आधी ते ऋषी पांडवांना कांहीं सागतात ते सांगतो. सगळ्या चार पांडवांना उद्देशून ते बोलतात, "तीर्थयात्रेला जाण्यापूर्वीची मनस्थिती कशी असावी ते सागतो ते ऐका, तुमच्या मनातील सगळे पापकारक विचार (मद, मत्सर व अकारण क्रोध हे पापकारक विचारांचे मूळ आहे म्हणून त्या विकारांना मनात उत्तेजन द्यावयाचे नाही.) पूर्णपणे टाकून द्यावेत. तसे करून मगच

यात्रेला निघा. सगळ्या चराचरांबद्दल सहानुभूती असू द्या. सुडाचे विचार नसूद्या. फक्त आणि फक्त यात्रेच्या तिर्थांचाच तेवढा विचार तुमच्या मनात असला पाहिजे. योगक्षेमापुरते शरीराचे व्रत पाळा त्यापेक्षा जास्त कांहीं वाढवू नका. म्हणजे तुमची अध्यात्मिकता वृद्धिंगत होईल व तीर्थस्थानातील दैवते तुम्हाला प्रसन्न होतील. त्यानंतर त्या तीन ऋषींची पादपुजा झाली. त्यानंतर अशा यात्रांना जाणारे जशी कवने गातात तशी कवनं गात तो समुह पवित्र मनानें यात्रेला अखेरीस प्रारंभ करतो. आता ते पांडव पुश्य नक्षत्र उगवत असतांना अग्रहयान काळी कम्यक अरण्य सोडतात. त्यांच्या बरोबर कांहीं ब्राह्मण व ऋषी साथीला होते. पांडवांच्या अंगावर कातड्याची वस्त्रं होती व हातात शस्त्रं होती जसे क्षत्रिय यात्रेला जातात तसें ते निघालेले होते.

अरे जनमेजया, ते तुझे पूर्वज हातात धनुष्य व पाठीवर बाणांनी बरलेला भाता अशा तयारीने चालू लागतात. त्यांच्या बरोबर त्यांची पत्नी इंद्रसेना होती. त्याशिवाय इतर सेवक होते. ते सगळे एकंदर चौदा गाड्यांने त्यांचे सामान जिन्नस घेऊन चालत होते. आता ते प्रथम पूर्व दिशेकडे तोंड करून चालत होते.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चौदावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग पंधरावा

तीर्थयात्रा ठरल्याप्रमाणे चालू झाली होती. जो तो आपापल्या काफिल्या बरोबर एकत्रितपणे त्या यात्रींच्या जथ्यात चालत होते. तीर्थयात्रेत चालणारे जसें भक्ती कवने गांत असतात तशी कवने ते यात्री मोठ्या तन्मयतेने गांत होते. त्यामुळें त्यांचा सभोवार पवित्र झाल्याचे जाणवत होते. पांडवाचा मोठा बंधू धर्माचा मुलगा, युधिष्ठीर मात्र त्याच्याच तंद्रीत असा एकटा असल्यासारखा चालत होता. त्याच्या मनांत विविध प्रश्न घोटाळत होते. अखेरीस न राहता तो ऋषी लोमसांना, जे त्याच्या बाजूने चालत होते, विचारतो. युधिष्ठीर बोलतो, "अहो महान ऋषींनो, मला माहीत आहे किं, मी फार मोठा भाग्यवान राजा ह्या जगातील आहे. तरीसुद्धा माझ्यापाठी विवंचनांचे घोडे सदैव धावत असते. कधी मला वाटते जरी प्रत्यक्ष भगवान माझा साथी असला, सगळे ऋषी माझ्याबरोबर असले, सगळी नैतिकता माझ्या बरोबर असली, मी सत्त्वशिल, व्रतस्थ असें सदैव पुण्यकारक जीवन जगत आहे. अनेक ब्राह्मणांचे शुभाशिर्वाद सदैव माझ्यासाठी असले तरी दुर्दैव सुद्धा माझ्यापाठी हात धुवून लागल्यासारखे कां आहे ते मला समजत नाही.

त्या उलट, असें कोणतेही उत्तम गुण नसलेले माझे चुलत भाऊ, सदैव पापाचरण करत असतांना, दुष्ट कारवाया करण्यात धन्यता मानत असलेले व त्यात बुडलेले असे असूनही ते कोणत्याही विवंचनेत सापडलेले सकृत्दर्शनी दिसत नाहीत. ते मजेत राज्यभोग भोगत आहेत. असे विरोधाभासाचे दर्शन मला होत आहे. त्यामुळें माझ्या मनात गोंधळ उडालेला आहे. जर एवढी सच्चाई सांभाळून फक्त दुर्दैवच पदरात पडणार असेल तर ती पुण्याई, ती सत्शिलता, ती उदात्त नैतिकता माणसांने  कशाला पाळावयाची"? त्यापेक्षा माझ्या चुलत भावांसारखे स्वैर जीवन जर जास्त सुख देणारे असेल तर तेंच योग्य नाही कां? असें मनाला घोर लावणारे विचार सतत माझ्या मनात येतात व मला बेचैन करून सोडतात. तरी ब्राह्मणांनो मला ह्या विरोधाभासा मागील सत्य काय आहे ते सांगाल तर बरे होईल".

ते विलक्षण मनःस्थितीतील प्रश्न ऐकल्यावर ऋषी लोमसा त्याला बोलतात, "अरें धर्मपुत्रा तू असा खच्ची झाल्यासारखा बोलू नकोस. त्याचे असें आहे, पापकर्माने जे सुख समृद्धी, यश प्राप्त होते ते फार काळ टिकत नाही. त्याचे यश ज्या कुकर्मामांवर अलंबून असते ती कुकर्म त्याला अंती नाशाच्या दिशेने नेत असतात. मी अनेक दैत्य व दानव फार मोठे

यशस्वी झालेले पाहिले आहेत. परंतु, सृष्टीच्या नियमानुसार ते शेवटी अशा टप्प्याला पोहोचतात कीं, ते नष्ट होतात. मी त्या घडतांना कृतयुगात पाहिले आहे. देव त्यांच्या पुण्यवंत जीवनासाठी ओळखले जात होते. असुर मात्र त्याच्या पापमय जीवनासाठी ओळखले जात असतं. देव तीर्थयात्रा करत. असुरांनी त्या करण्याचे कधी मनावर घेतले नाही. तशा परिस्थितीत सुरुवातीच्या काळात असुर देवांपेक्षा जास्त प्रभावी ठरत होते. परंतु, त्यांनां जे यश मिळाले त्यामुळें त्यांचा दुराभिमान वाढत गेला. मद व मत्सर त्यातून क्रोध असें विकाराचे चक्र वाढत गेले व त्यात ते अडकत गेले हे मी पाहिले आहे. त्यामुळें मर्यादा तत्त्वाचा त्याना विसर पडला. अशारितीने एक एक करून दुर्गूण त्यांत वाढत गेले व त्यांची एकी संपुष्टा आली. ते परस्परात लढू लागले. दुरभिमान माणसाला आणखीन पापमय करतो.कारण त्याला "अरे", हा मर्यादांची आठवण करून देणारा रहात नाही. अरे ला कारे चा प्रश्न विचारून धुडकावले जाऊ लागले. तेथेच मर्यादा संपली व त्यांचा नाश झाला. तू कौंतेया, त्यांची आताची यशस्वरुप स्थिती पाहून भाळला आहेस पण ती फार काळ रहाणार नाही. ती कधीही नित्य नसते. अशा परिस्थितीत कली त्यांच्यावर हावी होतो व एकदा कलीच्या तावटीत एकादा अडकला, तसे नळ राजाचे झाले, कीं,त्याचा विनाश अटळ असतो. असे नाशात्मे स्वतः स्वताला नष्ट करतात. त्याना कोणीही वाचवू शकत नाही. त्या उलट देव जे पुण्यप्रभावी राहिले त्यांनी नम्रपणा जपला. सृष्टीच्या क्रिया प्रतिक्रीया ह्या नियमानुसार चांगले केले की, चांगले प्रतिक्रीया म्हणून मिळते त्या प्रमाणे देवांना त्यांच्या मर्यादाशील वागण्यामुळें तसेंच परिणाम मिळत गेले. त्यांचा उद्धार झाला. त्यांच्या क्षमाशिलतेच्या बदल्यात त्यांना क्षमा मिळत गेली जेव्हां ते चुका करत. निसर्ग त्याच्या नियमानुसार वागतो व म्हणून पुण्य कर्माला पुण्यप्रभाव मिळतो व पाप कर्माला पापप्रभाव मिळत असतो तसे होत गेले आहे. देवांनी यज्ञ केले व देवतांना प्रसन्न केले त्यामुळें त्यांना त्यांच्या नंतरच्या जीवनात (मृत्यू पश्चात असलेले जीवन) लाभ होत गेला व पाप करणारे फक्त ह्या वास्तविक जीवनात कांही भोग भोगून राहीले परंतु, त्यांचे नंतरचे जीवन किती हाल अपेष्टांचे होते ते कोणाला दिसत नाही म्हणून तुझ्यासारखे जे भावनांच्या भोवर्यात अडकलेले असतात ते फसतात जसा तू फसला आहेस. वरकरणी दिसणारे अंतिम समजणे हे अज्ञानाचे लक्षण आहे, युधिष्ठीरा. पाप करणारा त्या जीवनात

कदाचित सुखी झाल्यासारखा भासत असला तरी त्याच्या मनांत काय विवंचना उत्पन्न होत असतात ते त्याच्या नशापाण्यावरून समजते. पुण्यवंत जो त्याच्या श्रद्धांवर ठाम आहे तो कधीही व्यसनात अडकत नाही. असें पापमय जीवन जगणारे कधी सांगत नाहीत कीं, ते किती व कशाची चिंता करत आहेत. हे लक्षात घेऊन अरे, पांडवा तू आता तीर्थयात्रा करण्यास निघाला आहेस तर त्याचा विचार कर.

जसें राजा नृग, शिवी, औषिनर, भगिरथ, वसुमनस, गया, पुरू, पुरूरव, तीर्थयात्रा करून पुण्यवान झाले व त्या पुण्याच्या बळावर यशस्वी झाले तसा तू सुद्धा होशिल. जसें इक्ष्वाकू आणि त्या मुलगे, मित्र तसेंच राजा मुचुकंद व मंधात्री राजा मरुत्त असें सगळे देवत्वाला पोहोचले ते अशा तीर्थयात्रा केल्यामुळें हे तू लक्षात घे. त्या तीर्थातील पाण्याच्या स्पर्शानें व सत्वशिल वृत्ती जोपासल्यामुळें सृष्टीतील देवता ज्या हे जग चालवत आहेत त्या तुला मान्यता देतील व जेव्हां त्या तसे तुला मानतील, तुझे अनेक प्रश्न सोपे होतील. अरे, कौंतेया, माणसाला त्याच्या गतकर्मांचे हिशोब ह्या जन्मात चुकते करावे लागतात त्याप्रमाणे, गोष्टी आपल्या जीवनात होत असतात, त्यांचा विचार तू करत नाहीस. वैराग्य वृत्ती हे मोठे बळ आहे. त्या बळावर ऋषी मोठे झाले. त्यामुळें ते प्रसिद्ध झाले. त्या उलट धृतराष्ट्राची मुलं पापकर्मात गुंतलेली आहेत. पापकर्म करणारा ह्या विश्वाच्या व्यवस्थेबद्दल अनभिज्ञ असतो. ज्याला ते समजते तो पापकर्मात कधीच रमणार नाही. कारण अरे राजा, पापकर्माची व्यवस्था माणसाला फसवण्यासाठी आयोजली आहे. जो त्यात फसला तो ह्या खेळात हरला असेंच समज. युधिष्ठीरा, तुला केवळ हे राज्य परत मिळवावयाचे एवढेच नाही तर मोक्ष जिंकावयाचा आहे. जे सर्वात जास्त महत्वाचे असते. तुझे चुलत भाऊ जे जिंकल्याचा भास तुला होत आहे ते दैत्यांप्रमाणे बरबाद झालेले तू पहाशिल.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पंधरावा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग सोळावा

पुढे वैशंपायन सांगत असतात, ते तीर्थयात्री एक जथ्याने मार्गक्रमण करत होते. ते नैमिषात पोहोचतात. ते त्यानी गाठलेले पहिले तीर्थक्षेत्र असते. तेथे ते गोमती नदीत रितसरपणे स्नान करतात. त्यानंतर अर्घ्य देऊन साधनेला बसतात. तेथे कांहीं दान केली. पितराना अर्घ्य वाहिले नंतर देवांना वाहिले. ते **कन्या** व **अस्व** ह्या दोन तीर्थक्षेत्री वस्ती करतात. कालकोटी मध्ये विशप्रस्थ नांवाच्या डोंगरावर त्यानी वस्ती केली होती. त्यानंतर ते कौंतेय वहुद तीर्थक्षेत्री गेले व तेथेसुद्धा त्या सगळ्या विधी केल्या ज्या तेथे करावयाच्या असतात. ते उरकून ते पुढच्या तिर्थक्षेत्री प्रयाण करतात. त्यानंतर ते देवांच्या यज्ञभूमीत, प्रयाग क्षेत्री पोहोचतात. तेथे गंगा व यमुना ह्यांच्या संगमावर ते स्नान करतात. त्यानंतर ध्यानाला बसतात. त्यात तपोश्वरण सुरु होते. मोठे पुण्य जमा करत असतात. त्या तीर्थांत आंघोळी करून ते पांडव निष्पाप होतात. त्यानंतर तो जत्था पांडवांच्या यात्रेकरूंचा पुढे **वेदी** नांवाच्या तीर्थक्षेत्री जातो. तेथे धौम्य व लोमसांच्या मार्गदर्शनाखाली ते घोर तप करू लागतात. त्यात त्यांचा बराच समय ते घालवतात. तेथून ते **महीधारा** तीर्थक्षेत्री पोहोचतात. जे तीर्थक्षेत्र गया नांवाच्या राजर्षीने स्थापन केले होते. तेथे असलेल्या पर्वताला **गयासीर** म्हणतात. तेथून ते महानदी नांवाच्या नदीकडे जातात. तिच्या किनार्यावर बांबूंची बेटं वाढलेली होती. त्या तेथे असलेल्या एका दैवी डोंगरावर **ब्रह्मसर** नांवाचे क्षेत्र आहे. ते संन्याशांचे मोठे क्षेत्र आहे. ह्या तीर्थक्षेत्री यमदेव हजारो वर्षे तप करत होते. त्यावेळी ऋषी अगस्त्य त्याला भेटण्यासाठी गेले होते. असें समजतात कीं, ह्या सरोवरातून नद्यांचा उगम झाला आहे. त्या तिथेच महादेव त्रिशूळधारी उभे असतात. त्या क्षेत्री पांडव आले. तो पावसाचा काळ होता म्हणून ते तेथेच राहिले. तेथे त्यांचे तपोश्वरण होत होते. त्या सुमारास ते ऋषीयज्ञ करतात. तेथेच तो पुरातन वटवृक्ष उभा आहे. तेथे जी पुजा मनोभावे केली जाते त्याचे फळ नित्य मिळते असें सांगतात. तेथे पांडव उपोषण करू लागतात. त्यांच्या बरोबर असंख्य ब्राह्मण आले होते ते सगळे पावसाळ्याचे उपोषण करू लागतात. ऋषी मंडळींनी दिलेल्या मार्गदर्शनानुसार ते तेथे विधीपूर्वक साधना करत रहातात. त्या तीर्थक्षेत्री वेदांचे पूर्ण ज्ञान असलेला एक ब्राह्मण जो सामंथ, नांवाचा ब्रह्मचर्य आचरणारा त्या जमलेल्या लोकांना सांगतो, "गयाचा राजा जो अमृत्तारयचा मुलगा होता, जो त्या

काळातील सर्वश्रेष्ठ राजर्षी होता. त्याचे गुण मी तुम्हाला सांगतो, ऐक पांडवा, मी त्यांची महान कृत्ये तुम्हाला सांगतो. त्याने अनेक यज्ञ केले होते. त्यात त्यांने ब्राह्मणांना मोठ्या प्रमाणात जेवणं दानं केली होती. त्यासाठी शिजवलेल्या भाताचे डोंगर केले जात होते. साजूक तुपाचे तलाव झाले होते. दह्याच्या नद्या वहात होत्या. त्या बरोबर खाण्यासाठी आमट्या भरलेल्या कित्येक टाक्या होत्या. ते सगळे तयार व्हावयाला वेळ लागला होता. त्या नंतर त्याचे वितरण सुरु झाले. जो येईल त्याला ते दिले जात होते. ब्राह्मणांना चांगले स्वच्छ खाद्य वाटले जात होते. त्या ऋषीयज्ञाच्या अखेरीस ब्राह्मणांना भेटवस्तू दिल्या जात होत्या. वेदमंत्रांचे घोष होत होते. तो आवाज इतका मोठा होता कीं, स्वर्गात पोहोचला. त्या ध्वनीने सगळे आसमंत दणाणून जात होते इतक्या मोठ्याने वेदमंत्रांचा घोष होत होता. सगळे आलेले ब्राह्मण त्या वेदघोषात सामील होते. असें होणें हेंच केवढे मोठे नवल होते. त्या सगळ्यांना पिण्यासाठी पेये होती. हे सगळे राजा गयाने साध्य केले होते. असा कोणी राहिला नव्हता ज्याला खावयाला मिळाले नव्हते. सगळे तृप्त होते. तरीसुद्धा अजून अन्नाचे वीस ढीग राहिले होते. त्या यज्ञाने जे राजा गयाने मिळवले असें कोणाही राजाने आधी कधी मिळवले नव्हते. पुढे कधी कोणी तसा यज्ञ करू शकेल हे संभवत नाही. देवांना त्यांनी इतके खावयाला घातले कीं, त्या नंतर कोणी त्यांना बोलावले तरी ते तेथे जाऊ शकत नव्हते, पोटं भरलेली होती सगळ्यांची. जसे पृथ्वीवरील वाळूचे कण किती ते सांगता येणार नाही, आकाशातील तारे मोजता येणार नाहीत, पावसाच्या पाण्याचे थेंब किती ते सांगता येणार नाही असें राजा गयाने दिलेल्या भेटवस्तुंची मोजदाद करता येत नव्हती. अरें कौंतेया, त्या राजाने असें अनेक वेळा यज्ञ केले ज्याचीसुद्धा मोजदाद करता आलेली नाही. हे सगळे ऋषीयज्ञ ह्या ब्रह्मसराच्या तटावर झाले फार प्राचीन काळी. अशी आहे ह्या तिर्थाची कथा", असें तो सामंथ त्यांना सागतो व निघून जातो.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील सोळावा भाग संपला.

# तिर्थयात्रा पर्वाचा भाग सतरावा

वैशंपायन सांगतात, ते ऐकल्यानंतर तो कुंतीपुत्र अगस्त्य ऋषींच्या आश्रमाकडे गेला . तेथे दुर्जय नांवाच्या ठिकाणी त्यांनी वस्ती केली. तेथे तो ऋषींची विविध गोष्टींवर गप्पा मारत असतांना लोमसांना विचारतो, "अगस्त्य ऋषीनी दैत्य वाटपीचा वध कां केला? त्यानंतर काय झाले"? त्या दैत्याच्या करामती आम्हाला सांगा, असें युधिष्ठीर लोमसांना विनंती करतो. तो विचारतो, "अगस्त्य त्याच्यावर इतके कां रागांवले"? तो प्रश्न ऐकल्यावर लोमस ऋषी त्याला सांगू लागले, फार प्राचीन काळी एक मनीमती नांवांचे नगर होते. तेथे एक दैत्य ज्याचे नांव आहे, इल्वा त्याचा धाकटा भाऊ होता, त्याचे नांव होते वाटपी रहात होते. ते ब्रह्मदेवाच्या मुलीची, दितीची मुलं होती. एक दिवस तपस्या करणार्या वैराग्यपूर्ण अशा एका ब्राह्मणांला तो वाटपी बोलतो, "अहो ब्राह्मण आपल्या सामर्थ्याने आपण मला एक असा मुलगा द्या जो इंद्रासारखा श्रेष्ठ आहे". परंतु, तो ब्राह्मण त्याची ती इच्छा पूर्ण करत नाही. त्यामुळें तो असुर (दैत्य व दानव जेव्हां मानव जन्मात अवतरतात तेव्हां त्यांना असुर म्हणतात व जर त्याना मायावी विद्या आत्मसात असतात तेव्हां त्यांना राक्षस असें म्हणतात. दैत्य ही ब्रह्मदेवाच्या दिती नांवाच्या मुलीची मुलं आणि दानव हे ब्रह्मदेवाच्या दानु नावांच्या मुलीची मुलं आहेत) त्या ब्राह्मणांवर फार चिडतो. त्या दिवसांपासून त्याचा भाऊ इल्वा ब्राह्मणांना ठार मारावयाला लागतो. मायावी विद्या त्याने आत्मसात केली व त्यामुळें त्याचे राक्षसात रुपांतर झाले. त्यानंतर तो त्याच्या धाकट्या भावाला मेंढा करतो. तो वाटपी मेंढ्याचे रुप घेत असें व त्याला मारल्यावर त्या देहातून तो निघून पुनः नवीन मेंढ्याचे रुप घेत असें. मग त्या मेंढ्याचे मांस ते दोघे ब्रह्मणांना खाण्यास देत असत. असें मायावी मांस खाल्ल्याने ते ब्राह्मण मरून जाई. अशारितीने मेलेले ते ब्राह्मण इल्वाचे गण बनतात व जरी ते यमाच्या घरी गेले होते तरी त्याना तो राक्षस खेचून आपल्या सेवेसाठी लावत असें. अशारितीने आलेल्या त्या ब्राह्मणांच्या आत्म्यांना माणसाचे देह प्राप्त होत असतं. वाटपी त्या मायावी देह असलेल्या ब्राह्मणाच्या शरीराला नंतर फाडत असें व मोठ्या मोठ्यानो हसत असें. तो त्याचा खेळ झाला होता. अशारितीने तो दैत्य अनेक ब्राह्मण मारून खात होता. हे असें होत असतांना ऋषी अगस्त्य एका भुयारात पहातात कीं, त्यांचे पूर्वज उलटे टांगलेले आहेत. तो त्यांना विचारतो, "हे

काय होत आहे तुमच्यांशी"? ते पूर्वज त्याला सांगतात आम्ही असें टांगलेले आहोत कारण आमचा वंश नष्ट होत आहे. तू आमचा शेवटचा वंशज आहेस जर तू एका पुत्राला जन्म दिलास तर आमची सुटका होईल. तुलासुद्धा वंश चालू ठेवल्याचे भाग्य लाभेल. नाहीतर आम्ही व आमच्याबरोबर तू असें सगळे नरकात जाऊन पडणार आहोत. ते ऐकल्यावर अगस्त्य त्यांना आश्वासन देतात कीं, ते त्यांची इच्छा पूर्ण करतील व त्यांना नरकात जाण्यापासून वाचवतील. त्यानंतर तो महान ऋषी त्याचा वंश अजरामर करण्याबद्दल काय करावयाचे त्यावर विचार करू लागतो. बराच प्रयत्न करूनही त्याला अशी एकही स्त्री भेटली नाही किं, जिच्याशी ते लग्न करू शकतील आणि त्यांना पुत्र होईल. ते समजल्यावर अगस्त्य स्वतः एक स्त्री निर्माण करण्याचे ठरवतात. अतिसुंदर असे एक एक भाग जमा करत विश्वकर्मा प्रमाणे ते एक अप्रतिम स्त्री उत्पन्न करतात. अशी बनवलेली ती मुलगी तो तपस्वी अगस्त्य विदर्भाच्या राजास देतो. त्यावेळी तो राजा मोठे तप आचरत असतो कारण त्याला अपत्य पाहिजे होते. त्यानंतर ती कन्या त्या राजघराण्यात जन्म घेते. त्या मुलीला तो तपस्वी राजा ब्राह्मणांना दाखवतो व तिच्यात जीव घालण्याचे आवाहन करतो. त्याप्रमाणे त्या मुलीमध्ये प्राण घातला जातो. त्या रत्नासारख्या कन्येचे नांव लोपामुद्रा असें ठेवले जाते. अप्रतिम सौंदर्य व बुद्धीमत्ता अशी असलेली ती त्या राजघरात वाढू लागते. ती मोठी झाल्यावर तिच्या दिमतीस शेकडो सुंदर मुली तिच्या सख्या म्हणून रहात होत्या. त्या सगळ्यांत ती तिच्या देखणेपणामुळें उठून दिसत होती. जशी रोहीणी इतर तारकांत उठून दिसावी रात्रीच्या आकाशात. तिचे सौंदर्य व उत्कृष्ट चाल चलणूक पाहता तिचा हात मागण्यासाठी कोणी राजा पुढे येत नव्हता. त्याचे दुसरे कारण सगळे राजे विदर्भाच्या राजास भित होते. लोपामुद्रा स्वर्गीय अप्सरांपेक्षा किती तरी जास्त देखणी होती. तिच्या चांगल्या वागणूकीने ती तिच्या घरातील आवडती झाली होती. तिच्या कडे पाहून तो राजा विचार करत असें कीं, कोणाला ही कन्या मी द्यावी?

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील सतरावा भाग संपला.

# तिर्थयात्रा पर्वाचा भाग अठरावा

लोमस ऋषी पुढे सांगत रहातात, जेव्हां अगस्त्य समजतात कीं, ती कन्या पुत्र जन्म देण्यासाठी सुयोग्य अशी झाली आहे, तो महान ऋषी विदर्भाच्या राजाला जाऊन भेटतो. त्याला विनंती करतो, "अरे राजा, तुझी लोपामुद्रा मला बायको म्हणून दे". परंतु, तो राजा त्या विनंतीकडे दुर्लक्ष करतो जरी तो राजा ती सरळपणे धुडकावून लावत नाही. त्यानंतर तो आपल्या राणीला विचारतो कीं, हा मुनी आपल्या लोपामुद्राला मांगणी घालत आहे. तर आपण काय करावे. जर मी त्याची मागणी नाकारली तर तो क्रोधाने आपल्या सगळ्यांना भस्म करू शकतो, तर आपण काय करावे, असें तो विदर्भचा राजा त्याच्या बायकोस विचारतो. मी त्या मुनीला आपली मुलगी देऊन टाकतो, त्याला दुसरा पर्याय मला दिसत नाही असें तो राजा त्याच्या राणीला सांगतो. तो मुनी फार शक्तीमान आहे व त्याच्या अध्यात्मिक बळापुढे आपले कांहीं चालणार नाही. त्याच्या शापामुळें आपले राज्यसुद्धा धोक्यात येऊ शकते असें तो तिला समजावतो. ती राणी राजाला एका शब्दाने कांहीं बोलत नाही. आपल्या मातापित्यांची ही अवस्था पाहून लोपामुद्रा त्यांना सांगते, "अहो बाबा, तुम्ही असें दुःखी कष्टी माझ्यासाठी होणे मला योग्य वाटत नाही. मी त्या मुनीशी लग्न करण्यास तयार आहे. अहो नृप, माझ्या वरून एवढा त्रास करून घेऊ नका. मला त्या मुनीस पत्नी म्हणून देऊन टाका. त्यामुळें तुम्ही सुरक्षित होणार असाल तर ते मला मंजूर आहे. ते ऐकल्यावर छातीवर दगड ठेवल्या सारखा तो राजा आपली रुपवती कन्या त्या मुनीला म्हणजे अगस्त्य ऋषीला योग्य रितीरीवाजानुसार दान करतो. त्यांचे लग्न होते. त्यांचे लग्न झाल्यावर अगस्त्य तिला प्रथम सांगतात, "मुली तू तुझ्या अगावरील हे मौल्यवान कपडे व दागदागिने आता उतरवून टाक व माझ्या सारखे संन्याशाचे वस्त्र परिधार कर". ती आज्ञा मानून ती मुलगी तिच्या अंगावरील सगळे मौल्यवान दागने व कपडे काढून फाटकी वस्त्रं नेसते व त्यांच्या बरोबर जाण्यासाठी सज्ज होते. ते उभयता तसें गंगाद्वार नांवाच्या तीर्थक्षेत्री जातात. तेथे तो व त्याची भार्या तेथे त्याचे तपोश्चरण सुरु करतात. लोपामुद्रा आपल्या पतिशी फार प्रेमानें वागत असते आणि ऋषीसुद्धा तिच्याशी मोठ्या आदराने वागत होते. कांहीं काळानंतर अगस्त्य आपल्या पत्नीला आंघोळ करून येतांना पहातो, ती वयात आलेली व त्यावेळी ऋतुस्नात असलेली पाहून त्याच्या मनात

तिच्याबद्दल आकर्षण उत्पन्न होते. तिचे अनेक उत्तम गुण त्याच्या ध्यानात येत रहातात. त्यानंतर त्यांचा प्रथमच संबंध होणार असतो परंतु, ती राजकन्या तिच्या पतिला बोलते, "मला तुमच्याशी संबंध घ्यावयाला आवडेल पण अशा चिंध्यात मला तो आवडणार नाही. आपण एकाद्या राजासारखा तो केला पाहिजे म्हणजे उंची वस्त्रं, दागदागिने असे सगळे अंगावर असले पाहिजेत अशी माझी इच्छा आहे. अशा चिंध्यात संभोग घेण्यात मला रस नाही. तरी तुम्ही एवढे मोठे तपस्वी अहात तर त्या तपस्येच्या मदतीने तुम्ही ते सगळे सहज उभे करू शकाल. माझे पिता तुम्हाला घाबरत होते म्हणून मी तुमच्याशी लग्न केले पण आता तुम्हाला तुमच्या तपोसामर्थ्याची प्रचिती मला द्यावी लागेल नाहीतर मी म्हणेन, माझे सामर्थ्यवान पिता तुम्हाला जे घाबरत होते ते व्यर्थ होते". ते ऐकल्यावर अगस्त्य समजतात कीं, पत्नीच्या पुढे आपली हि ताकद उपयोगाची नाही कारण कांहीं वेळा पत्नीपुढे तपोसामर्थ्य निरुपयोगी ठरते, कारण पत्नी पतीचे अर्धांग असते त्याला दिलेला शाप पतीवर उलटू शकतो. तो तिला सांगतो, "तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी जर माझी ती ताकद अशा गोष्टींसाठी वापरली तर ते योग्य होणार नाही". लोपामुद्रा तिच्या मतावर ठाम रहाते व अगस्त्याना जवळ येऊ देत नाही. "जोवर तुम्ही माझ्यासाठी ते वैभव आणून देत नाही तोवर माझ्या जवळ तुम्ही येणे योग्य होणार नाही. मला तुम्ही चिंध्या नेसायला लावल्या मी कधी तक्रार केलीं कां? आता तुमची पाळी आहे तुमचे सामर्थ्य सिद्ध करण्याची". असें तिने त्या ऋषीला ठणकावले. अगस्त्याला समजते किं, येथे कांही चालणार नाही, पत्नीला शाप देता येत नाही जर तिची मागणी रास्त आहे. तेव्हां तो ऋषी तिला सांगतो, "असें तुझे मत आहे तर मी वास्तविक मार्गाने संपन्नता मिळवून मगच आपण जवळ येऊ". असे बोलून तो ऋषी संपन्नता मिळवण्यासाठी निघतो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील अठरावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग एकोणीसावा

ऋषी लोमस सांगत असतात, अगस्त्य तेथून जे निघाले ते थेट श्रृतर्वण नांवाच्या एका अति श्रीमंत माणसाकडे गेले. तो राजांपेक्षा जास्त धनवान होता. तेथे तो संपत्तीची भिक मांगतो. अगस्त्य ऋषी आल्याची वार्ता समजल्यावर तो राजा समान श्रीमंत त्यांचे स्वागत करण्यासाठी त्याच्या सीमेपर्यंत येतो व ऋषीचे स्वागत करतो. आपले येणे असें कसे झाले म्हणून तो अगस्त्यला विचारतो, "मी तुझ्याकडे संपत्ती मागत आहे ती तू मला कोणालाही इजा न करता ती द्यावी. अशी माझी इच्छा आहे". ते ऐकल्यावर त्या वैश्याच्या मनात त्याच्या हिशोबी स्वभावाप्रमाणें कांहीं शंका उत्पन्न झाल्या.

लोमस पुढे सांगतात, तो हुशार व्यापारी त्याला सांगतो, माझे जे आहे ते घ्या परंतु, असे किं. माझ्या खर्चाला त्यामुळें बाधा होणार नाही. ते ऐकल्यावर अगस्त्य समजतात कीं, तसे घेता येणार नाही मग तो ऋषी श्रृतर्णवाला सोडून वृधनस्वाकडे जातो. ऋषी आलेले पाहून तो सुद्धा त्यांचे स्वागत करण्यासाठी पुढे होतो. तेथे श्रृतर्णवा सारखे सगळे चांगले स्वागत होते. ते सगळे सोपस्कार झाल्यावर राजा विचारतो त्यांच्या येण्याचे कारण, तेथेसुद्धा अगस्त्य तेंच सागतात कीं, त्याला संपत्ती पाहिजे. तेथेसुद्धा तो सांगतो पहिल्या प्रमाणे कीं, दुसर्याची न काढलेली अशी संपत्ती मला दे.

लोमस सांगत असतात, तेथेसुद्धा तोंच प्रकार होतो किं, कोणाची तरी काढल्याशिवाय दुसर्याला संपत्ती देता येत नाही. म्हणजे जर ऋषीला एवढी संपत्ती दिली तर बर्याच जणांचे नुकसान केल्याचे पाप लागणार. म्हणजे तशी संपत्ती देता येणार नाही हे स्पष्ट झाले. अगस्त्य ते समजले किं, संपत्ती मिळवण्यासाठी पाप करणे क्रमप्राप्त आहे. तुमची गरज (योगक्षेम) पुरवण्यासाठी संपत्ती लागत नाही म्हणून ते मिळवणे निष्पाप कर्म असू शकते परंतु, श्रीमंत होण्यासाठी कोणावर तरी अन्याय करावा लागतो हा अर्थशास्त्राचा मुलभूत नियम त्याला प्रथमच समजला. हे लक्षात आल्यावर आता श्रृतर्णवा आणि वृधनस्व अगस्त्या बरोबर पुरोकुत्साच्या मुला कडे त्रसदस्यु कडे जातात. तोसुद्धा खूप श्रीमंत असतो. तो इक्ष्वाकू घराण्याचा होता. तेथे सुद्धा त्यांचे चांगले स्वागत होते. तेथेसुद्धा तोंच प्रश्न विचारला जातो. "अरे राजा आम्ही तुझ्याकडे संपत्ती मागण्यासाठी आलो आहोत. दुसर्या कोणाचेही नुकसान न करता मला तू संपत्ती दे".

लोमस सांगत असतात, तेथे तेंच दिसते कीं, अशारितीने संपत्ती देता येत नाही. ते पाहून ते सगळे श्रीमंत एकमेकाकडे पहात रहातात. थोड्या विचारानंतर ते श्रीमंत लोक अगस्त्याला सांगतात कीं, आता जाण्यासारखा किं, ज्याच्याकडे संपत्ती मागता येईल असा एक दानव आहे त्याचे नांव आहे इल्वा, तो अतिशय श्रीमंत आहे त्याच्याकडे जाऊ. त्याच्या कडे श्रीमंतीचे दान मागावे असे ते अगस्त्याला सुचवतात.

लोमस सांगतात पुढे, त्या श्रीमंताना इल्वा योग्य वाटतो म्हणून ते अगस्त्यला तेथे जाण्याचा सल्ला देतात. त्याप्रमाणे ते सगळे, दानव इल्वाकडे जातात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकोणीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग विसावा

लोमस पुढे सांगतात, इल्वाला समजते कीं, ब्राह्मण अगस्त्य त्याच्या बरोबर कोणी श्रीमंत घेऊन त्याच्याकडे येत आहे तेव्हां त्यांच्या स्वागताची तयारी केली जाते. इल्वा त्याच्या क्षेत्रातून बाहेर येतो व त्यांचे स्वागत करतो. त्यांना उत्तमरित्या शिजवलेले मेंढ्याचे मांस खास पक्वान्न म्हणून सादर केले जाते. त्यात जे मेंढ्याचे मांस असते ते नेहमीप्रमाणे मायावी मेंढ्याचे असते ज्यात त्याचा भाऊ वाटपी लपलेला होता. अशाप्रकारे त्या दोघा राक्षसांनी अनेक बेसावध ब्राह्मणांचे वध केले होते. आता अगस्त्यची पाळी आली होती. परंतु, अगस्त्य इतर ब्राह्मणांप्रमाणे बेसावध रहाणार्यांपैकी नव्हते. त्याना त्यातील कपट समजते. अगस्त्य ते समजल्यावर कष्टी होतात. अगस्त्यांचा तेथे येण्या मागील उद्देश ते विसरतात. अगस्त्य त्यांच्या बरोबर आलेल्या श्रीमंत दोस्तांना सांगतात, आपण हे खाऊ नका कारण मला हे सगळे खावेसे वाटते. त्याप्रमाणे प्रथम अगस्त्य त्या निष्पाप मित्रांना बाजूला होण्यास सांगतात व ते मेंढ्याचे मांस स्वतः खाण्यासाठी घेतात. इल्वा त्यांना ते रुचकर शिजवलेले मेंढ्याच्या मांसाची सागुती वाढतात. अगस्त्य ते सगळे मांस म्हणजे प्रत्यक्षात त्या वाटपीला खाऊन टाकतात. ते झाल्यावर इल्वा त्याच्या भावाला हांका मारून बोलावू लागतो जसें तो नेहमी ब्राह्मणाला मेंढा खायला घातल्यानंतर करत असें, परंतु, ह्यावेळी वाटपी त्या ब्राह्मणाचे पोट फाडून बाहेर येत नाही त्या ऐवजी अगस्त्य केवळ मोठ्याने ढेकर देऊ लागतात. जसे कांहीं ढगांचा गडगडाट होत आहे. पण त्याचा भाऊ मात्र त्या पोटातून बाहेर येऊ शकत नाही. तेथे इल्वा पुनः पुन्हा त्याच्या भावाला हांका मारत होता पण त्याचा भाऊ कोठेच दिसत नव्हता, त्या ऐवजी अगस्त्य फक्त प्रत्येक वेळी हांक मारली कीं, एक मोठा ढेकर देत होते. असें बराच वेळ होत होते. कांहीं वेळ ते नाटक चालले शेवटी अगस्त्य त्या हाका ऐकून मोठ्याने हसूं लागले. त्यांना हसू आवरत नव्हते. ते इल्वाला बोलतात, "अरे इल्वा, तो तुझा भाऊ आता येणार नाही. मी त्याला पचवले आहे, हे बघ मी कसें मोठ्याने ढेकर देत आहे". इल्वाला समजते कीं, त्याच्या भावाला ह्या ब्राह्मणांने हजम केले आहे. त्याला परिस्थितीचा अंदाज येतो. तो व त्याचे कारभारी ऋषीपुढे हात जोडून उभे रहातात. इल्वा त्यांना विचारतो, "महोदयानो, सांगा आपले येणे कोणत्या प्रयोजनाने झाले". अगस्त्य त्याला बोलतात, "तू फार श्रीमंत आहेस असें मला

समजले म्हणून मी तुझ्याकडे आलो आहे. मला संपत्ती पाहिजे एकाद्या राजासारखी, मला ती तू दे. परंतु, कोणाचाही हक्क न छिनता ती तुला द्यावा लागेल. मी प्रथम ह्या माझ्याबरोबर आलेल्या श्रीमंतांकडे संपत्तीचे दान मागण्यासाठी गेलो होतो परंतु, माझ्या अटी प्रमाणे ते संपत्ती मला देऊ शकत नव्हते. म्हणून मग आम्ही तुझ्याकडे आलो आहोत. तर तू माझ्या अटीत बसेल अशाप्रकारे संपत्ती दान करू शकत असशिल तर ते दे". ते ऐकल्यावर इल्वाने त्या अटीनुसार दान देण्याची त्याची क्षमता असल्याचे सांगितले व त्यांना किती पाहिजे म्हणून विचारले. अगस्त्य बोलतात, "ह्या प्रत्येकाला दहा हजार गाई आणि तेवढेंच सोने तुला द्यावे लागेल व मला त्याच्या दुप्पट द्यावे लागेल. त्याशिवाय एक सोन्याचा रथ व त्याच्या योग्यतेचे उत्तम घोडे द्यावे लागतील. इल्वा विचार करतो कीं त्याच्याकडे सोन्याचा रथ आहे कां? म्हणून तो थोडा साशंक होतो ते पाहून स्मित करत अगस्त्य त्याला सांगतात, अरें इल्वा जरा जाऊन विचार कीं, तुझ्याकडे सोन्याची रथ आहे कां. त्यावर तो पहातो कीं, खरोखरच त्याच्या कडे एक सोन्याचा रथ आहे. इल्वा समजतो कीं, ऋषी त्यांच्या योग सामर्थ्याने ते सगळे घडवत आहेत. तो दैत्य आपल्या भावाच्या मृत्यूमुळें कष्टी असतांनाही ती सगळी संपत्ती त्या पाहुण्यांना देऊन टाकतो.
ती अफाट संपत्ती घेऊन अगस्त्य आपल्या आश्रमात त्या सोन्याच्या रथातून ज्याला ते दोन घोडे ज्यांची नांवे होती, विरव आणि सुरव, जोडले होते, येतात. अगस्त्यांना त्यांच्या घरी पोहोचल्यावर ते तीन श्रीमंत आपल्याला फुकट मिळालेल्या संपत्तीमुळें खूष झालेले, एकमेकाकडे डोळे मिचकावत गमतीने तेथून निघून जातात.
आपल्या पतिने आपली इच्छा पूर्ण केली ह्या विचारांने आनंदीत झालेली लोपामुद्रा अगस्त्याबरोबर संबंध करण्याची तयारी दाखवते. अगस्त्य लोपामुद्राला विचारतो "तुला किती मुल पाहिजेत ते बोल. लोपामुद्रा सांगते हजार नालायक मुलांपेक्षा एक तेजस्वी मुल मला जास्त योग्य वाटतो". त्यावर अगस्त्य तिला सांगतात, "तुझे म्हणणे जरी रास्त वाटत असले तरी वंश चालवण्यासाठी बर्याच वेळा ते नालायक हजार जास्त उपयोगांचे असतात. मी तुझ्याशी लग्न केले ते वंश वाढवण्यासाठी हे तुला माहीत नाही". असें बोलून मग तो ऋषी तिला ते सगळे सांगतो जेव्हां त्याला त्याचे पूर्वज भेटले होते. ते सगळे ऐकल्यावर लोपामुद्रा त्यावर बोलते कीं, "त्या गुणी एकाला योग्य संस्कार केले तर तोसुद्धा

त्याच्यासारखा गुणी वंशज देऊन तो वंश चालू ठेवू शकतो. केवळ वंश चालवणे हे महत्वाचे आहे कां गुणीजन निपजणे"? त्यांच्या संबंधातून जो शक्तिशाली पुत्र जन्मणार असतो त्याची कल्पना अगस्त्यांना आधीच आलेली असते. अगस्त्य आपल्या पत्नीवर पुष्कळ खूष झालेले असतात कारण आता त्यांच्या कुळाचा वंश पुढे चालवणारा येत आहे. अगस्त्य त्यांच्या पूर्वजांना दिलेला शब्द पुरा केलेला असतो. त्याचे त्याला समाधान वाटत असते.

त्यानंतर अगस्त्य आपली तपस्या करण्यासाठी पुनः अरण्यात जातात. त्यांनंतर तो गर्भ लोपामुद्राच्या पोटात सात वर्षे वाढत होता. सात वर्षे पूर्ण झाल्यानंतर तो अगस्त्य घराण्याचा कुलदीपक जन्मला. जो जन्मताच ज्ञानी होता. त्याचे नांव होते धृदस्यु. तो जन्मताच बैरागी होता. त्याच्या अंगातून तेज बाहेर पडत होते जे कोणालाही सहन करण्यासारखे नव्हते. तो गर्भातून बाहेर येत असतांनाच तोंडात वेद पुटपुटत होता. त्याशिवाय उपनिषद व अंगांचेसुद्धा त्यात दर्शन होते. एवढासा असून तो प्रचंड तेजस्वी दिसत होता. त्याच्या आईचे देखणेपण सुद्धा त्यात आले होते. जसा मोठा झाला त्याच्या शरीरात खूप ताकद असल्याचे दिसत होते. यज्ञासाठी सरपणाचे मोठे भारे तो अतिशय सहजपणे उचलून आणत असें. म्हणून त्याचे नांव लाडाने इध्वंवाह (सरपण वाहून आणणारा) असें पडले होते. आपल्या पुत्राचे एकेक गुण पाहून ऋषी समाधानी झाले होते. त्या इध्वंवाहाच्या जन्माने अगस्त्याचे पूर्वज मुक्त झाले होते. ते सगळे येथे घडले म्हणून ह्या स्थानाला अगस्त्याचा आश्रम असें म्हणतात. त्याने प्रह्लादाच्या कुळातील वाटपीला खाऊन टाकले होते. पवित्र भागिरथी बाजूने वहात आहे. तिच्या काठावर देव आणि गंधर्व नेहमी येत असतात. ती गंगा वार्याच्या जोराने तिचे पाणी तुषाराने सर्वत्र उडवत होती. तिची नागमोडी चाल त्या पहाडाच्या कड्या कपार्यांतून जात होती. जसें महादेवाच्या जटांतून ती वाहत आहे. त्यातून धबधबे तयार होत होते. त्यानंतर ती तेथील अनेकांचे पोषण करत असते. अखेरीस समुद्राला मिळत असते. ते दृष्य अरे युधिष्ठीरा, मोठे विलोभनीय आहे. लोमस ऋषी असें सगळे सांगत होते. पुढे ते सांगतात, भृगूचे तीर्थ जे त्र्यैलोक्यात प्रसिद्ध आहे, येथे मोठे मोठे राजे राजर्षी स्नान करून गेले आहेत. जमदग्नीच्या रामांने येथेच तपस्या केली होती. जेव्हां त्याची शक्ति दशरथाच्या रामाने (प्रभूराम) त्याचा

अहंकार जास्त झाला म्हणून काढून घेतली होती. ते सगळे येथे तीर्थयात्रा करून गेले आहेत. तुझ्या भावंडांच्या व त्या कृष्णाच्या मदतीने, दुर्योधनाच्या कारवायांमुळें तुझे गेलेले राज्य तुला परत मिळणार आहे. जसें परशुरामाचे सामर्थ्य प्रभूरामाने लढाईत काढून घेतले होते.

वैशंपायन सांगतात, हे जसे ऋषी लोमस बोलतात त्याप्रमाणे युधिष्ठीर तेथे स्नान करतो व त्याची सगळी माणसें तेथे स्नान करतात. अर्घ्य देतात. पितर व देवांच्या पुजा करतात. तेथे आंघोळ केल्यानंतर युधिष्ठीर त्याच्या शत्रूंना दिसेनासा होतो. त्या नंतर तो पंडुचा मुलगा लोमसांना विचारतो, "अहो ब्राह्मण, मला सांगा, परशुरामाची शक्ती प्रभूरामांनी कां काढून घेतली होती"? "मला त्याबद्दल सगळे सांगा".

लोमस सांगू लागतात, "ऐक युधिष्ठीरा, तुला त्यासाठी दशरथाच्या रामाची व भृगु वंशातील जमदाग्नच्या रामाची गोष्ट मला सांगावी लागेल". रावणाच्या वधासाठी विष्णू माणसात जन्म घेतो दशरथाचा ज्येष्ठ पुत्र म्हणून. ते समजल्यावर भृगु वंशातील रेणुकाला झालेला रुचिकाचा पुत्र अयोध्येला जातो दशरथाच्या रामाला पहाण्यासाठी. तेथे जातांना तो त्याचे भयंकर धनुष्य घेऊन जातो ज्याने त्या रामांने असंख्य भ्रष्ट क्षत्रियांचा वध केला होता". पुढे लोमस सांगत असतात, त्याला त्या दशरथाच्या मुलाची हिम्मत अजमावयाची असते. दशरथाला जसें समजते कीं, परशुराम भेटण्यासाठी येत आहे तो स्वतः व त्याचा मुलगा, राम असें दोघे त्याचे स्वागत करण्यासाठी सीमेवर जातात. परशुराम जेव्हां प्रभूरामाला त्याच्या धनुष्यासह पुढे उभा पहातो तेव्हां त्याला हसू येते. तो त्या रामाला बोलतो, "अहो राजे, तुझ्यात धमक असेल तर माझ्या धनुष्याला दोर लावून दाखव. हे धनुष्य क्षत्रियांचा नाश करण्यासाठी आहे". ते ऐकल्यावर प्रभूराम त्याला दटावतो किं, "अशारितीने अपमानास्पद पद्धतीने बोलू नकोस. तू ज्या क्षत्रियांना मारलेस त्या प्रकारचा मी नाही. आम्ही इक्ष्वाकू घराण्याचे क्षत्रिय फुकटचा रुबाब करत नाही, अथवा घमेंडखोरी सुद्धा करत नाही". ते ऐकल्यावर परशुराम त्या बोलण्याला आव्हान समजतो कारण त्याचा अहंकार वाढलेला असतो. परशुराम त्याला उलट उत्तर देतो, "मला सगळ्या कपटी तर्हा तुमच्या क्षत्रियांच्या चांगल्याच माहीत आहेत. ते ऐकल्यावर संतापाने प्रभूराम परशुरामाच्या हातातील धनुष्य त्याच्या हातातून खेचून घेतो. ज्या भयंकर धनुष्याने अनेक क्षत्रिय मारले

गेले होते. त्यानंतर अगदी सहजपणे हसत हसत, तो त्याचा दोर लावून त्याचा टणत्कार काढून दाखवतो. त्या आवाजाने तो आसमंत दणाणून निघतो. त्या नंतर प्रभूराम परशुरामाला सांगतो, "हे पहा, मी तुझ्या तिरकमट्याला दोर लावला व आवाजही काढला, आता काय पाहिजे तुला, अरे ब्राह्मणा"? ते झाल्यावर परशुराम त्याला त्याचा एक बाण देतो व सांगतो, "आता हा बाण त्यावर लाव व खांद्यापर्यंत ताणून दाखव". ते ऐकल्यावर प्रभूराम संतापतात व आवाज चढवून बोलतात, अरे ब्राह्मणा, तुझा अहंकार जास्त बिघडलेला आहे. मी तुला माफ करणार होतो पण अरे भृगुच्या वंशातील ब्राह्मणा, तुला वाटते जे तू करत आहेस ते तुझे कर्तृत्व आहे पण प्रत्यक्षात ते ब्रह्मदेवाच्या रचनेचा भाग होते किं, तू ते भ्रष्ट क्षत्रिय मारावेस. ते यश तुझ्या डोक्यात गेले आहे म्हणून तू माझ्याशी अशारितीने वागत आहेस. अरे अज्ञानी ब्राह्मणा, आता माझे खरे रुप पहा. परशुराम पहातो तो त्याला ते विश्वरुप दिसू लागते. त्यात त्याला सगळे आदित्य, वसु, रुद्र, साध्य, मरुत, हुताशनी, पितर, आकाशातील नक्षत्र, ग्रह, गंधर्व, राक्षस, यक्ष, नद्यांतील तीर्थांच्या देवता, ते नित्य ऋषी, ब्रह्मदेवाचे नित्य ऋषी जसें, वालखिल्य, समुद्राच्या देवता, वेदाची देवता, उपनिषदाच्या देवता, यज्ञदेवता, वशत, सामन, अनेक प्राणीमात्रांच्या देवता, विज्ञानाची देवता, अस्त्र, शस्त्रांच्या देवता, आकाशातील ढगांची देवता, बिजली असें सर्व त्याला एकाच ठिकाणी त्याला दिसत असतात. ते दर्शन दिल्यानंतर तो त्यानी दिलेला बाण लावतो व मारतो. त्याच्या आवाजाने सगळी पृथ्वी दणाणून निघते. त्या बाणाच्या धक्याने आकाशातील अशनि, जमिनीवर कोसळून पडू लागतात. आकाशातून धूळ, पाऊस, पडू लागतात. सारी धरणी कंप पावू लागते. ते सगळे त्या एका बाणामुळें होते. त्यानंतर तो बाण पुन्हा प्रभूरामाच्या हाती येतो. ते पाहिल्यामुळें तो भार्गव दिग्मुढ झालेला होता, त्याला काय होत आहे ते समजेनासे झाले. सगळ्या प्रकाराने त्याची सर्व शक्ती संपल्यासारखे झाले होते. विष्णूची शक्ती त्याला समजते. त्यानंतर प्रभूरामचंद्राच्या सांगण्यावरून तो जमदाग्नीचा राम, भार्गव पुढे महेंद्र पर्वतावर जाऊन तपस्या करू लागतो. परशुरामाचा अहंकार प्रभूनी पूर्णपणे नष्ट केला होता. पितर त्याची अवस्था पाहून दुःखी होतात. एक वर्ष भार्गवाची तपस्या झाल्यावर ते भार्गवाला बोलतात, तुझे विष्णूशी वागणे बरोबर नव्हते. विष्णूशी कसे वागावयाचे ते तुला समजत

नाही त्याची किंमत तुला समजली नाही, तुझ्या अहंकाराची किंमत तुला भोगावी लागत आहे. त्याची पुजा करण्यानेच तुझी परिस्थिती सुधारेल, हे तुला लक्षात घेतले पाहिजे. त्यासाठी तू ह्या **वधुसरा** नदीत स्नान करून स्वताला शुद्ध करून घे. त्या नदीच्या विविध तटांवर जाऊन स्नान करत जा. म्हणजे थोडा उतार पडेल परिस्थितीत. त्याशिवाय तपोश्चरण करत जा. असं केल्याने तुझी गेलेली ताकद तुला पुन्हा प्राप्त होईल. त्या नदीवर एक तीर्थक्षेत्र आहे, त्याचे नांव **दिपोदा** आहे. त्या तीर्थक्षेत्री तुझ्या मुळ पूर्वजांनी, भृगूनी साधना केली होती. पितरांच्या त्या सांगण्याने परशुरामाला थोडा धीर आला. तो त्या तीर्थावर जाऊन साधना करू लागतो. अशारितीने त्या परशुरामाचा अहंकार विष्णूनी नष्ट करून त्याला सावरले.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील विसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग एकविसावा

ते विवेचन ऐकल्यावर युधिष्ठीर विचारतात, "अहो ज्ञानी ब्राह्मणा, मला अगस्त्य ऋषींची सगळी माहीती समजून घ्यावयाची आहे. त्या महान प्रतिभाशाली प्रज्ञावंत सिद्धाबद्दल माझ्या मनात प्रचंड कुतूहल आहे तरी ते सांगावे".

लोमस ऋषी ते ऐकल्यावर बोलले, "मी तुला अगस्त्यांच्या विलक्षण कर्तृत्वाच्या कथा सांगतो". असें बोलून ते सांगू लागतात, कृतयुगात कांहीं भयंकर स्वभाव असलेल्या दानवांच्या टोळ्या वावरत होत्या. त्याना कालकेय म्हणून ओळखले जात होते. त्याच्या भिववणार्या कारवायांनी ते सगळ्या जगाला भारी गेले होते. ते वृत्र नावाच्या त्यांच्या म्होरक्याच्या मार्गदर्शना खाली काम करत होते. स्वर्गात ते इंद्राच्या मागे लागले होते. त्यांच्याकडे अजब प्रकारची आयुधं होती त्यामुळें त्यांना हरवणे देवांनासुद्धा भारी जात होते. त्यामुळे अखेरीस सगळे देव ठरवतात किं, वृत्राचा नाश केला तरच हे सगळे नष्टचर्य संपेल. देव इंद्राबरोबर ब्रह्माला भेटतात. त्या सगळ्यांना तसे मलूल चेहर्याने त्यांच्या पुढे हात जोडून उभे राहिलेले पाहून ब्रह्मदेव त्यांना सांगतात, "मला माहित आहे, तुम्ही कां माझ्याकडे आला अहात. मी तुम्हाला सांगतो त्या वृत्राचा नाश कसा करता येईल", त्या बद्दल. पुढे ब्रह्म बोलतात, "तेथे एक महान तपस्वी ऋषी ध्यानात बसलेले आहेत, त्यांचे नांव आहे दधीची. तेथे जाऊन त्याच्या कडून एक वर मांगा. जर तो ऋषी तुमच्यावर संतुष्ट झाला तर तो तुम्हाला वर देईल. तुम्हाला वृत्राचा नाश करण्यात य़श हवे असेल तर त्या ऋषीला सांगा किं, ह्या सृष्टीचे सदैव भले व्हावे असें वाटत असेल तर आम्हाला तुमची हाडं द्या. त्यासाठी तुम्हाला तुमचे हे जीवन संपुष्टात आणावे लागेल. जर त्यांने तुम्हाला त्याची हाडं दिली तर त्याची हाडं वापरून एक भयंकर शस्त्र तुम्हाला बनवावे लागेल त्याचे नांव असेल वज्र. त्याला सहा बाजू असतील. त्याच्या गर्जनेने सगळी पृथ्वी दणाणून निघेल. त्या वज्रापुढे कोणतेही आयुध टिकणार नाही. परंतु, हे सगळे लवकरात लवकर उरकले पाहिजे". असे ब्रह्मदेव त्यांना सांगतात. त्यानंतर ते सगळे देव नारायणाच्या नेतेपणात दधीचींच्या आश्रमा कडे जातात. तो आश्रम सरस्वती नदीच्या पैलतीरी असतो. त्या आश्रमा भोवती विविध प्रकारची वनस्पती वाढलेली असते. तेथे असलेल्या मधाच्या पोळ्यांमुळें तेथे मधमाशांच्या घोंगावण्याचा आवाज घुमत होता. जसें काहीं त्या साम गात

आहेत असे भासावे. त्याशिवाय तेथे कोकिळ व चकोर पक्षाच्या झुंडी घिरट्या घालत होत्या. तेथे दाट जंगलात असतात तसें रेडे, अस्वलं, डुक्करं, हरणं, सांबरं, निलगाई असें पशु वावरत होते. त्यांना वाघांची भिती वाटत नसावी असें वाटत होते. हत्ती माजावर आलेले होते व त्यांच्या माथ्यातून तो मादक रस वहात होता. त्या पशुचे तेथे साम्राज्य होते. त्या सगळ्या हिंस्त्र श्वापदांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या डरकाळ्या, आरोळ्या सर्वदूर ऐकू येत होत्या. प्रसंगी ते हिंस्त्र श्वापदं तेथे असलेल्या गुहातून व मोकळ्या पठारावर आराम करताना दिसत होते. तेथे नजर फिरवतांना त्या आलेल्या देवांना दधीची एकाद्या सूर्यासारखे तळपत असलेले दिसले. दुसरे ब्रह्मदेव असावेत असें वाटत होते त्याना पाहिल्यावर. सगळे देव व नारायण त्यांचे पाय धरतात. ते सगळे देव त्या ऋषीकडे वर मांगू लागतात. त्या देवांचे प्रथम तो महामुनी स्वागत करतो व बोलतो, "अहो स्वर्गातील देवतांनो, माझ्याकडे काय काम काढलेत? जर तुम्हाला पाहिजे असेल तर माझा हा देहसुद्धा मी तुमच्यासाठी देण्यास तयार आहे". असें बोलून तो ऋषी अचानकपणे त्याचा देह टाकून देतो. दधीचींचा मृत्यू झालेला असतो. त्यानंतर ते देव स्वर्गातील त्वशतृला (मृत शरीरावर काम करणारा, मांग) बोलावतात. तो त्याच्या देहातील हाडं काढू लागतो. त्या देहातील फासळ्यांपासून एक वज्र तयार केले जाते. त्यांत मंत्राने सामर्थ्य घातले जाते. ते झाल्यावर तो त्वशतृ आनंदाने सर्वांना बोलतो, "तुमचे वृत्राला मारणारे आयुध आता तयार आहे". त्यावर इंद्र बोलतो, "चला, ह्या सर्व शक्तिमान आयुधाने आमच्या शत्रूचा नाश करू". ते सगळे देव पुष्कळ खूष झालेले असतात. वृत्राचा नाश केल्यावर आपण पुन्हा एकदा शांतपणे तिन्ही लोकांवर राज्य करू. असें ते समजत असतात. त्वशतृ कडून तो देवांचा राजा ते वज्र ताब्यात घेतो. मोठ्या आदराने तो त्या अस्त्राला वंदन करतो.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील एकविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग बाविसावा

लोमस ऋषी पुढे सांगतात, वज्र घेऊन व सर्व देवांचा पाठिंबा असलेला तो इंद्र वृत्राकडे जातो. त्यावेळी वृत्राचा ताबा सगळ्या तिनही लोकावर होता. त्या असुराच्या चहोबाजूंना प्रचंड आकाराचे राक्षस कलकेय जातीचे, त्याचे रक्षक म्हणून उभे होते. त्यांच्या हातात त्यांची भितीदायक शस्त्रे, आयुधे होती. ते सगळे दृष्य मोठे भयावह होते.

त्यांच्यात लढाई झाली पण ती फार काळ चालली नाही. जरी ती फार भयंकर होती. ते युद्ध तिनही जगासाठी होत होते. तेथे तलवारी, समशेरी, भाले बरच्या अशा सगळ्या शस्त्रां बरोबर मोठी आयुधसुद्धा वापरली जात होती. राक्षसांच्या मुंड्या धडापासून दूर फेकल्या जात होत्या. त्यांचा पाऊस जणूकाय आकाशातून पडत होता. कालकेय राक्षस त्याची लोखंडी गदे सारखी आयुध घेऊन देवांवर तुटून पडले. देवांचीसुद्धा मोठी हानि होत होती. पुरंदर त्याच्या सहस्त्र नेत्रांनी ते पहात होता किं, देव कालकेयांपुढे टिकाव धरू शकत नाहीत. जसें देव पिछाडीला जाऊ लागले, वृत्राला मोठा जोम आला व त्वेशाने तो देवांवर हल्ला करून गेला. अशी वेळ आली किं, इंद्र स्वतः त्या कालकेयांच्या हल्ल्याने घाबरला होता. जास्त वेळ न दवडता तो नारायणाच्या आश्रयाला गेला. इंद्राला अशा अवस्थेत पाहून त्याने स्वताची ताकद इंद्राला देण्यास सुरुवात केली. जेव्हां देवांनी पाहिले किं शक्राला नारायणाचा आधार आहे, त्यांचा जोर वाढत गेला. ते पाहून ते युद्ध पहात असलेले ब्रह्मर्षीसुद्धा त्याची ताकद देवांना देऊ लागले. वृत्राला ते समजले कीं, देवांना नारायणाची व ब्रह्मर्षींची अशी पुष्कळ ताकद मिळत आहे, तो मोठ्याने डरकाळी फोडून प्रतिहल्ला करतो. त्यामुळें सगळे आकाश व पृथ्वी थरकापू लागली. त्यावेळी इंद्र ते प्रभावी आयुध, जे दधीचीच्या हाडांपासून बनवलेले होते, ज्याचे नांव होते वज्र तो वृत्रावर फेकतो. त्याच्या आघाताने तो दागदागिन्याने सजलेला राक्षसांचा राजा डोक्यावर कोसळतो. जसे काय पर्वत मंदार कोसळत आहे. जरी दैत्यांचा राजा मेला होता, इंद्र तरीसुद्धा तेथून भितीपोटी पळून जातो. त्याला समजत नाही कीं, त्याने वज्र फेकले कीं नाही व वृत्र मेला हेसुद्धा त्याला समजत नाही. परंतु, ते पहाणार्यांने समजले किं, वृत्र वज्राच्या आघाताने मेला आहे. त्यांना अत्यानंद झाला. ते इंद्राचे कौतुक करू लागले. वृत्र मेल्याचे समजल्यावर देवांना चेव येतो व ते मोठ्या जोमांने असुरांवर हल्ला करतात. दानव मोठ्या

संख्येने मरत असतात. मार खाल्लेले दानव समुद्राकडे पळतात. ते त्या तळ नसलेल्या सागरात शिरतात. कारण वज्राच्या उष्णतेने त्यांच्या अंगाची लाही लाही होत होती. त्यानंतर ते पाण्यातील मांसे, सुसरी, कासव अशा प्राण्यांबरोबर राहू लागतात. त्या समुद्रात बसून ते प्रतिहल्ल्याची योजना आखू लागतात. ज्यांच्याकडे विवेक होता ते त्या प्रमाणे योजना आखू लागतात. ती दितीची मुलं एक भयंकर कारस्थान करतात. ते ठरवतात किं, ते प्रथम सगळी चांगली माणसें व पवित्र माणसें मारून टाकतील. ते ठरवतात किं, लोकांचा तपस्येवर, अध्यात्मिक जीवनावर विश्वास आहे तोंच तोडावयाचा. नैतिकता नष्ट करावयाची म्हणजे देवांचे महत्व संपेल. तसें झाले किं, आपोआपच सगळे देव जे त्या पुण्यप्रभावावर वाढत आहेत ते निराधार होतील व आपली ताकद वाढेल. लोकांचा पापावर भरवसा वाढवला पाहिजे, त्यासाठी युक्तीने पाप पुण्यापेक्षा कसे जास्त चांगले असते ते दाखवावयाचे, त्यासाठी खोट्या नाट्या कथांचा प्रचार करावयाचा. पुण्ण्यामुळें कसे माणसाचे नुकसान होते ते दाखवावयाचे असें सगळं ठरवल्यावर ते दानव त्यांच्या त्या योजनेवर स्वतःच खूप खूष होतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील बाविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग तेविसावा

लोमसा पुढे सांगतात, कालकेय त्या पाण्यात राहू लागल्यानंतर जे वरुणाचे क्षेत्र आहे, त्यांच्या कारवाया तेथून चालू करतात. रात्र झाली कां ते पाण्यातून बाहेर येऊन ते ध्यानात बसलेल्या मुनींना खाऊ लागले व दिवसा ते पाण्यात बसून रात्र होण्याची वाट पहात असतं. ते वसिष्ठ ऋषीच्या आश्रमातील तपस्वी ब्राह्मणांना जे एकशेआठ होते, एकदा खाऊन टाकतात. त्याशिवाय इतर नऊ संन्याशी ते खातात ते वेगळे. त्यानंतर ते ऋषी च्यवनांच्या आश्रमाकडे निघतात. त्या आश्रमात पुष्कळ ब्रह्मचारी रहात होते. ते सगळे केवळ फळं व कंदमुळं खाऊन गुजराण करत होते. त्यांनी मांसाहार सुरु केला नव्हता कारण त्यांना अजून सिद्धी मिळवायची नव्हती. त्यातील शंभर ब्रह्मचारी ते खाऊन टाकतात. असें ते फक्त रात्री करत होते त्यामुळें हे सगळे तपस्वी कोठे गडप होतात ते कोणाला समजत नव्हते. दिवसा ते असुर खोल समुद्रात जाऊन लपत होते. रात्र झाली कीं ते वर येत व ब्राह्मणांना खाण्याचा उपक्रम पुनः चालू करत. भारद्वाजांच्या आश्रमातील त्यानंतर केवळ हवेवर रहाणारे ब्रह्मचारी त्यांनी खाण्यास सुरुवात केली. अशाप्रकारे ते दानव कालकेय ब्राह्मणाना खाऊन माजले व त्यांनी इतर ऋषींच्या आश्रमांवर रात्री हल्ले करावयास सुरुवात केली. असें होत असतांना हे लोक असें कसे अचानक गायब होतात ते कोणालाही समज नव्हते. ते कालकेय राक्षस ब्राह्मणांना खाऊन त्याची हाडं तेथेच टाकून देत असत. त्यामुळे त्यांची हाडं दिसत असल्यामुळें त्या ब्राह्मणांना व ब्रह्मचार्यांना कोणी खात असावेत असें समजले. परंतु, हे कोण करते ते समजत नव्हते. कांहींची शरीरं अर्धवट खाल्लेली असतं. कांहींचे हात मिळत तर कांहींचे पाय मिळत. कांहींच्या पोटातील आतडी बाहेर काढलेली व इतस्तः फेकलेली असें दारुण दृष्य दिसत असें. कांहींची डोकी फोडलेली व त्यातला मेंदू खाल्लेला असें आढळत होते. त्याशिवाय यज्ञाचे सामान व इतर जिन्नस इतस्ततः विखूरलेले असें आढळत होते. यज्ञासाठी साठवलेले इतर सामानसुद्धा काढून खराब केलेले असें. जेणेकरून यज्ञ करणे अशक्य व्हावे. त्या त्यांच्या कृत्यामुळें सगळे वैदिक परंपरा सांभाळणारे लोक अस्वस्थ झाले. एक प्रकारचे भयाचे वातावरण उत्पन्न झाले होते. हे थांबत नाही असें पाहिल्यावर जे बचावले होते ते आश्रम सोडून दूर कोठेतरी जाऊन राहिले. कांहीं केवळ त्या भितीने मरून गेले. त्यातील कांहीं धनुर्धारी होते

ते घाबरले नाहीत. ते दानवांना शोधण्याची मोहीम सुरु करतात परंतु, कारण कीं, दानव दिवसा खोल पाण्यात आश्रय घेत असत त्या वीरांना ते शोधू शकत नव्हते. त्याचा परिणाम असा झाला कीं, यज्ञ व्हावयाचे थांबले. देवांना अर्घ्य कोणी देईना. कोणी प्रार्थना करेनात. त्याचा परिणाम देवांच्या शक्तिवर सुद्धा होऊ लागला. देवांनी नारायणाकडे धांव घेतली. देव नारायणाला बोलले, "आपण जगाचे निर्माते, कर्ते, त्राते आणि खाणारे अहात असें असतांना हे कसे होते त्याकडे लक्ष द्यावे. आपण विविध अवतार घेऊन जगाला पापा पासून वाचवत असता. आपण अर्धनारी तर कधी अर्धकेसरी अशी रुप घेऊन पाप निवारण्याचे काम करत असता. आपण अनेक दैत्यांचा वध करून सत्याचा विजय केला आहे. आपण हिरण्यकश्यपूचा वध केला आहे. त्याशिवाय इतर महाबली असुरांचे निर्दालन केले आहे. वली सारख्या रुप बदलणार्या असुराचा आपण वध केला आहे. तुम्ही जंभवाचा वध केला जो यज्ञ करण्यात नेहमी अडथळें आणत असें. अशी अनेक कामे आपण केली आहेत. अहो मधूचा वध करणार्या केशवा, आम्ही फार घाबरलो आहोत. आम्ही तुला त्याबद्दल सांगण्यासाठी आलो आहोत. सगळ्या देवांना व त्याच्या राजाला, इंद्रालासुद्धा ह्या असुरां पासून वाचव".

आशारितीने तीर्थयात्रा पर्वातील तेविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग चोविसावा

असें सांगत ते सगळे स्वर्गातील देव नारायणाची आणखीन स्तुती करत असतात. ते पुढे स्तवन करतात, "तुझ्यामुळें ते सगळे पांच प्रकारचे चराचर जीव (सुक्ष्मांग, वनस्पती, मांसे, पशु, पक्षी) सुखांनें पृथ्वीवर रहात आहेत. ते त्यांच्या जीवन काळात देवांची व पितरांची सेवा पुजा करून करत असतात. असें ते सगळे एकमेकांना सांभाळून रहात आहेत. त्यांची वाढ होते आहे. परंतु आता एक संकट उत्पन्न झाले आहे. कोण त्या तपस्या करणार्या योग्यांना खात आहे किंवा मारत आहे. जर ब्राह्मण मारले गेले तर सगळी पृथ्वी नष्ट होईल. स्वर्गसुद्धा जास्त काळ टीकणार नाही. कृपया तेवढ्यासाठी आपण पृथ्वीला ह्या असुरांपासून वाचवा. ते दिवसा समुद्रात रहातात जेथे आम्ही जाऊ शकत नाही व रात्री बाहेर येतात व याज्ञिकांना मारत आहेत".

ते ऐकल्यावर विष्णू त्यांना बोलतात, "अहो देवांनो, मला माहित आहे कोण ते करत आहेत. ते फार भयंकर शत्रू आहेत सत्याचे (चांगुलपणाचे, पुण्याचे). ते हे सगळे करत आहेत. त्यांचे नांव आहे कालकेय. ती राश्रसांची एक प्रजाती आहे. जी दीतीने उत्पन्न केली आहे. त्याकरतां त्याबद्दल मी नंतर तुमच्याशी बोलेन. त्यासाठी तुमची मन शांत ठेवा. मी मारलेल्या वृत्राचे ते लष्कर आहे. त्यांच्या राजाच्या मृत्यूचा ते सूड उगवत आहेत. त्यांचा राजा वृत्र, जेव्हां इंद्राने वज्राच्या मदतीने मारला तेव्हापासून ते चिडले आहेत व जगातून सगळा चांगुलपणा, सात्त्विकता, पावित्र्य, शांतता त्यांना संपवून त्या ऐवजी वाईटपणाचे, तामसीपणाचे, अपवित्रतेचे आणि अशांततेचे राज्य आणावयाचे असा त्यांचा प्रयत्न आहे. ते दिवसा समुद्रात जाऊन रहातात त्यामुळें ते सापडणे सोपे नाही. समुद्र वरुणाचे क्षेत्र आहे. ब्राह्मणांना मारण्या पाठचा त्यांचा उद्देश वेदांचे ज्ञान, जे माणसाला देवाच्या योग्यतेला नेण्याचे काम करते ते नष्ट करणे असा आहे. एकदा वेदाचे ज्ञान संपले अथवा विसरले गेले किं राक्षसांना कोणीही आवरू शकणार नाही. असा त्यांचा प्रयत्न आहे. हे मला माहित आहे. सागरात मोठे लहान मासे, सुसरी, मगरी, असे हिंस्त्र श्वापद असतात. त्याला दुसरा मार्ग नाही. त्यांना समुद्रातून बाहेर काढणे दुरापास्त आहे. त्यासाठी तो समुद्र सुकवावा लागेल. म्हणजे, त्याचे सगळे पाणी नाहीसे झाले की त्या कालकेयांना लपण्यासाठी जागाच रहाणार नाही. पण ते कोण करणार"? नारायण म्हणतो

ते काम वाटते तितके साधारण नाही. पुढे ईश्वर देवांना सांगतात, हे काम फक्त एकच करू शकतो व तो आहे वरुणाचा मुलगा, अगस्त्य ऋषी. फक्त तोंच ते करू शकतो. असें बोलून ईश्वर थांबतात. ते नारायणाचे निवेदन ऐकल्यावर ते सगळे देव ब्रह्माकडे जातात. त्याची परवानगी घेऊन ते अगस्त्य ऋषींच्या पर्णकुटीकडे जातात. तेथे त्यांची म्हणजे वरुणदेवाच्या मुलाची वाट पहात रहातात. तेथे इतर संत मंडळी त्यांची वाट पहात बसली होती. तेथे त्याना मित्रा आणि वरुण ह्यांचा मुलगा, अगस्त्य भेटला. ते सगळे अखेरीस अगस्त्यना आपले गर्हाणे सांगतात. कालकेयांना उघड पाडले तरच त्यांचा नाश करता येईल परंतु ते सध्या सागरात लपून रहात असल्याने ते शक्य होत नाही. त्यासाठी सागराचे सगळे पाणी कसे काढावे त्यावर खल करण्यासाठी आम्ही आलो आहोत असें ते त्या भेटीत सांगता. अगस्त्य त्यांच्या उदात्त. शांत, तेजस्वी, रुबाबदार, प्रतिष्ठीत अशा भव्य व्यक्तिमत्वाचे, ते सगळे शांतपणे ऐकून घेतात. शेवटी ते देव सांगतात किं जर जगाला व त्यातील वेदांना वाचवावयाचे असेल तर ह्या कालकेयांचा पुरता बिमोड करण्याशिवाय गत्यंतर नाही व त्यासाठी आपल्या सामर्थ्याची सगळ्या तिनही लोकांना आज गरज आहे. अगस्त्यानी त्या आधी कशाप्रकारे देवांना मदत केली आहे त्याची ते तेथे आठवण सांगून अगस्त्याची स्तुती करतात. ते सांगतात, जेव्हां नहुषाने देवांना हैराण केले होते तेव्हां आपणच देवांना मदत केली होती. नहुष हा असुर सगळ्या दैवतांना भारी झाला होता. त्याला स्वर्गातील त्याच्या आसनावरून आपणच खाली नरकात फेकले होते. जेव्हां विंध्य अचानकपणे आपला आकार व उंची सूर्याशी चढाओढ करण्याच्या उपद्व्यापात वाढवत होता, तेव्हां तुमच्या मुळेंच ते त्याला थांबवावे लागले होते, जेव्हां सगळ्या जगात अंधार झाला होता तेव्हां सगळी चराचर मरण्याच्या पंथाला लागली होती. त्याना तुम्हीच वाचवले होते. जेव्हां जेव्हां देवता संकटात असतात तेव्हां तेव्हां तुम्ही मदतीला येता हा नियम आहे. म्हणून ह्या वेळी आम्ही पुन्हा एकदा आपली मदत मागण्यासाठी आलो आहोत. आम्हाला एक वर देऊन ह्या कालकेयांच्या संकटापासून वाचवावे अशी विनंती ते अगस्त्यांकडे करतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चोविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग पंचविसावा

युधिष्ठीर विचारतो, "अहो ब्राह्मण, मला सांगा, तो विंध्य का सूर्याशी चढाओढ करण्याचा प्रयत्न कां करतो. कारण, माझे त्याबद्दलचे कुतुहल वाढले आहे. असें काय झाले कीं त्याला एवढा राग आला"? कां विंध्य स्वताचा आकार व उंची वाढवू लागला"?

ऋषी लोमस बोलतात, सूर्य उगवतो व मावळतो त्या दरम्यान तो ह्या नगाधिराज पर्वत मेरूला एक प्रदक्षिणा घालतो. ते समजल्यावर तो पर्वतांचा राजा सूर्याला बोलतो, "अरे सूर्या तू मेरू पर्वताला दररोज प्रदक्षिणा घालतोस तशी मलासुद्धा घालावी असें मला वाटते". ते ऐकून सूर्य त्याला बोलतो, "मी ते स्वताच्या मर्जीने करत नाही. ज्याने हे जग उत्पन्न केले त्याने ते तसे ठरवले आहे म्हणून ते तसें होत आहे". ते ऐकल्यावर विंध्य त्याच्या नाराजीच्या भरात अचानकपणे फुगू लागतो. त्याची उंची, त्याच्या बाजू असें सगळे चौफेर फुगू लागते. तो इतका वाढतो कीं त्यामुळें सूर्य व चंद्राच्या आड येऊ लागतो. ते पाहिल्यावर सगळे देव विंध्य राजाच्या जवळ जातात व सांगतात, त्याने असें फुगू नये म्हणून विनंती करतात पण ते तो ऐकत नाही. त्यानंतर ते देव पर्णकुटीत रहाणार्या ऋषींना भेटतात व त्यांना कांहीं करण्यासाठी सांगतात. त्यात ऋषी अगस्त्य सुद्धा होते. ते त्यांच्या बैराग्य व तपस्येसाठी ख्यातनाम होते. देव अगस्त्यना सांगतात, "अहो ब्राह्मण, हा नगराज विंध्य अयोग्य प्रकारे वाढत आहे त्यामुळें सृष्टीचे कार्य विचलित होत आहे, तरी आपण कांही करावे". ते ऐकल्यावर अगस्त्य मुनी विंध्याकडे आपल्या पत्नीसह जातात. तेथे गेल्यावर तो मुनी विंध्याला बोलतो, "अहो महान नगाधिराज, मला तुमच्यातून जाण्यासाठी एक वाट द्या. मला कांहीं कामासाठी दक्षिणेकडे जावयाचे आहे. मी परत येई पर्यंत तू ती वाट तशीच ठेवावी अशी मी तुला आज्ञा करतो. मी परत आल्यानंतर तू पुनः तुला पाहिजे तसा व तितका मोठा हो". असा समझौता अगस्त्य विंध्याशी करतात. लोमस सांगतात, अजून अगस्त्य मुनी दक्षिणेकडून परत आलेले नसल्यामुळें विंध्य तसांच न वाढता आज उभा आहे. अशाप्रकारे वरुणाचा मुलगा, ऋषी अगस्त्य युक्तीने विध्याला वाढण्यापासून अडवतात.

*महाभारताच्या इतर प्रतीत कथा थोडी वेगळी आहे त्यात अगस्त्य विंध्याला भेटतात तेव्हां तो पर्वत आदराने खाली वाकून अगस्त्यला वंदन करतो. जोवर अगस्त्य त्याला वंदन*

*थांबवण्याचा आदेश देत नाहीत तोवर तो तसांच वाकलेला रहाणार असतो. अगस्त्य त्याला वंदन थांबवण्यास सांगत नाहीत. म्हणून तो पर्वत तसांच वाकलेला रहातो तो कायम आजवर तसांच आहे.*

लोमस पुढे सांगतात, आता सांगतो युधिष्ठीरा, तुला कालकेयांना अगस्त्य मुनीनी कसे मारले. देवांची ती प्रार्थना ऐकल्यावर मित्रा व वरुणांचा मुलगा त्यांना विचारतो, "आपण कशासाठी माझ्याकडून वर मांगत अहात"? ते ऐकल्यावर देवता त्यांना सांगू लागतात, "आपण सगळा समुद्र पिऊन टाकावा असा तो वर आहे, त्यामुळें त्यात लपलेले कालकेया प्रजातीचे दानव आम्ही पकडून मारू शकू. ते वृत्राचे हस्तक आहेत व वृत्र मारला गेल्यामुळें ते बिथरलेले आहेत, ते सगळ्या तपस्या करणार्या ब्राह्मणांना, ब्रह्मचर्य आचरणार्या स्नातकांनां खात आहेत. त्यांचा नाश अनिवार्य झाला आहे". ती विनंती देवांची ऐकल्यावर मुनी अगस्त्य त्यांना आश्वासन देतात कीं, तुमची मागणी रास्त वाटते म्हणून मी ती पूर्ण करण्यास तयार आहे. असें बोलून अगस्त्य मुनी सागराकडे जातात. त्याच्या बरोबर त्यांचे शिष्यगण होते. देवतासुद्धा त्यांच्या सोबत असतात. त्यांच्या बरोबर माणसें, सर्प, स्वर्गातील गायक, गंधर्व, राक्षस, यक्ष असें सगळे गेले होते, तो अद्भूत प्रकार पहाण्यासाठी. सागराचे गुरगुरणे ते ऐकत असतात. त्याच्या लाटांचे तांडव ते पहात असतात. त्यावर वाहणार्या वार्याचे भीषण रुप ते पहात असतात. त्यातील मांसें पाण्यातून उंच उड्या मारत पुन्हा पाण्यात पडत असलेले ते पहातात. सगळा प्रकार भव्य व घाबरवणारा होता. अशा सागराला तो मित्रा आणि वरुणाचा मुलगा पिणार होता. ते सगळे आता सागराच्या किनार्यावर उभे होते.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पंचविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग सव्वीसावा

ऋषी लोमसा पुढे सांगतात, तो थोर संत वरुणदेवाचा मुलगा समुद्राजवळ गेला आणि तेथे जमलेल्या सगळ्यांना बोलतो, आता मी हा माझ्या पित्याचा हिस्सा पिणार आहे परंतु, त्यानंतरच्या उत्पन्न होणार्या परिस्थितीसाठी आपण सगळे तयार असले पाहिजेत. असें सांगितल्या नंतर तो मित्रा व वरुणदेवांचा मुलगा समुद्र पिण्यास सुरुवात करतो. बाकीचे तेथे जमलेले ते नवल दृष्य पहात असतात. देव आणि त्यांचा राजा ते पाहून आश्चर्यचकीत होतात. ते सगळे आगस्त्याची स्तुती करू लागतात. "अहो महान ऋषी, तुम्ही आमचे संरक्षणकर्या अहात. तू आमच्यासाठी साक्षात विधाता झाला आहेस. तुझ्या कृपेने सगळे चांगले जग दुष्टांपासून सुरक्षित होवो. अहो दयाघना, तुझे किती कौतुक आम्ही करावे". ते गात होते तेव्हां आकाशातून संगीताची मधूर धून स्वर्गीय देवता, अप्सरा, गंधर्व वाजवू लागले होते. देवता अगस्त्यावर स्वर्गीय फुलांचा वर्षाव करू लागतात. ते सर्व पहात असतात किं, तो समुद्र रिकामा होत आहे. ते पाहून बहुतेक देव अतिशय आनंदी झाले होते. देव आता कालकेयांचा विध्वंस करण्याच्या तयारीस लागतात. कारण एकदा का ते राक्षस मारून टाकले कीं, अगस्त्य पुनः ते सागराचे पाणी त्यात सोडणार होते. म्हणजे ते कालकेयांना मारण्याचे कार्य त्वरित करावे लागणार होते. इतर जलजीवांचा विचार त्यांना करावा वागत होता जे निरपराध व निष्पाप होते. त्यांचे हक्क अबाधित राखणे हे देवांचे काम होते. कालकेय दिसू लागले तेव्हां ते देव व इंद्र मोठ्या त्वेषाने त्यांच्यावर हल्ला करतात. मोठे तुंबळ युद्ध होते. दोनही बाजूनी हलकल्लोळ होतो. कित्येक कालकेय राक्षस व कित्येक देव कामी येतात. यमाला त्यांची मोजदाद करण्यात नाकीनव येते. बरेच कालकेय ऋषींच्या क्रोधाला बळी पडतात व जळून जातात. तसे जळून मरण्यापेक्षा देवांकडून मारले जाणे जास्त श्रेयस्कर त्यांना वाटते. कारण साधूंच्या शापाने मरण्याने ते खोल नरकात फेकले जाणार व तेथून पुनः बाहेर येण्याची शक्यता कमी, त्यापेक्षा देवांच्या हत्याराने मारले गेले तर पुनः जीवंत होता येईल असा ते पोक्त विचार करतात. देवांनी मारलेले त्यांच्या रत्नजडीत दागिन्यासह तेथे रणभूमीत पडलेले, सगळीकडे विखुरलेल्या स्थितीत दिसत होते. त्या स्थितीतसुद्धा ते रमणीय वाटत होते. जणू पलश झाड पूर्ण फुलांनी डवरलेले असावे असं ते दिसत होते. त्यातील कांहीं जे वाचले होते ते भूमीदेवीला

शरण जातात व तिच्या उदरात आश्रय मागतात. ती त्यांची केविलवाणी अवस्था पाहून त्यांना आश्रय देते. ते कालकेय आता खोल भूगर्भात जाऊन बसतात. राक्षसांची माता दानु त्यासाठी भूदेवीला आग्रह करते किं माझ्या साध्या भोळ्या लेकरांना ते नीच देव व त्याचा हलकट राया शक्र मारत आहेत तरी तू त्यांना आश्रय दे व त्याप्रमाणे भूदेवी दानुची मैत्रीण असल्याने कालकेयांचा भूगर्भात जागा मिळते व ते युद्ध थाबते. येथे युद्धा जिंकल्याने आनंदीत झालेले देव व ऋषी अगस्त्यांचे कौतुक करत असतात. तुमच्या मदतीमुळें त्याना आम्ही मारू शकलो एरवी ते केवळ अशक्य होते अशा शब्दात ते सगळे स्वर्गीय देव अगस्त्यांची वहावा करत रहातात. त्यानंतर ते देव अगस्त्यना सांगतात कीं, आता आपण ते समद्राचे पाणी पुनः सोडावे. परंतु, अगस्त्य त्यांना सांगतात कीं. ते पाणी मी पचवले आहे. ते ऐकल्यावर सगळे देव आणि ऋषी चिंताक्रांत होतात कारण, त्या पाण्याशिवाय सृष्टीचा क्रम चालणे दुरापास्त आहे ते, ते जाणत असतात. सगळे दुःखीसुद्धा होतात. पुढे लोमस सांगतात, अरे राजा, पुढे काय झाले ते ऐक, ते सगळे देव व इंद्रसुद्धा अगस्त्यांचे आभार मानून आपापल्या घरी निघून जातात. तेथे विष्णू व ब्रह्म समुद्र पुनः कसा भरावयाचा त्या विवंचनेत असतात. ते एकमेकांचे विचार विनिमय करत असतात.
अशारिताने तीर्थयात्रा पर्वातील सव्वीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग सत्ताविसावा

लोमस ऋषी सांगतात, ब्रह्म, प्रजापती देवांना सांगतात, "तुम्ही आता तुमच्या गमजा करण्याचे बंद करा व कामाला लागा. कारण हा समुद्र पुन्हा भरण्यासाठी बराच अवधी लागणार आहे. त्यासाठी तुम्हाला खूप काम करावे लागणार आहे". ब्रह्मदेव सांगतात, "भगिरथाला बोलावणे धाडा त्याच्या मदतीनेच हे काम होऊ शकेल".

युधिष्ठीर विचारतो, "ते कोणते कार्य होते व भगिरथ ते कसे करणार ते अहो मुनी, मला सांगा. त्याच्या प्रयत्नाने तो सागर पुन्हा कसा भरला ते सांगा". अहो संतश्रेष्ठ, तुमची सगळी संपत्ती आहे तुमचे अध्यात्मिक सामर्थ्य, आपण पुरोहित वर्गाचे अग्रणी अहात, मला सविस्तरपणे सांगा, त्या भगिरथाची गोष्ट ज्याच्या कर्तृत्वाचा एवढा बोलाबाला होतो आहे. मला त्याचे कौतुक ऐकावयाचे आहे.

*महाभारताच्या दुसर्या एका प्रतीत थोडा वेगळा भाग दिला आहे. त्याप्रमाणे अगस्त्य ऋषी पुनः ते सगळे पाणी लघवी करून भरून काढतात. त्यात सांगितले आहे किं, अगस्त्य ते सगळे पाणी लघवीच्या रुपाने बाहेर सोडतात म्हणून समुद्राचे पाणी खारट झाले आहे.*

*दुसर्या एका प्रतीत असें दिले आहे किं, बरेच कालकेय राक्षस सुक्ष्म रुप घेऊन अगस्त्याच्या पोटात समुद्राच्या पाण्याबरोबर शिरतात व नंतर लघवी वाटे पुन्हा बाहेर येतात व समुद्रात पोहोचतात. त्यामुळें देवांना व ऋषींना सगळे राक्षस मारता येत नाहीत.*

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील सत्ताविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग अठ्ठाविसावा

वैशंपायन सांगू लागतात, अशारितीने विनंती झाल्यानंतर तो ऋषी लोमस, प्रसिद्ध राजा सागरची कथा सांगू लागतो ती अशी आहे,

लोमस ऋषी सांगतात, फार प्राचीन काळी इक्ष्वाकू घराण्यात एक राजा होऊन गेला होता. त्याचे नांव होते सागर. तो अतिशय देखणा व राजबिंडा असा होता. त्याची ताकद खूप होती परंतु, त्याला अपत्य नव्हते. तो भीषण लढाया करत असे. त्यांने हैहय आणि तलजंघ जमातींना जिंकून ताब्यात घेतले होते. त्या दोनही जमाती लढवय्या म्हणून ख्यातनाम होत्या त्या काळात. त्या सागर राजाच्या दोन बायका होत्या. दोघीही फार सुंदर होत्या. एक होती विदर्भ देशाची राजकन्या दुसरी सिवी घराण्याची (सिंध देश) राजकन्या होती. एकदा तो राजा कैलास पर्वतावर जातो. त्याच्या बरोबर त्याच्या दोनही बायका असतात. तेथे तो त्याला मुलं व्हावी म्हणून प्रार्थना करणार असतो. तेथे ते तिघे घोर तपस्या करण्यात गुंतून जातात. तो योग शास्त्रात दिलेल्या नियमानुसार व्रतस्थ राहून तपोश्चरण करू लागतो, त्याचा दोनही पत्नींसह. यथावकाश त्याला दयाघन महादेवाचे दर्शन होते. त्याला तीन नेत्र होते. त्यांने नुकताच त्रिपुरा नांवाच्या राक्षसास मारलेले असते. सागराला जेव्हां ते दर्शन होते तेव्हां त्या त्रिपुरारीच्या हातात पिनाक नांवाचे धनुष्य होते. दुसर्या हातात त्याचे त्रिशूळ होते अशा स्वरुपात ते दर्शन झाले होते. त्याच्या भोवती विविध इतर योनीचे गण व भूत पिशाच्च, असें विलक्षण दिसणारे अनेक प्रजाती होत्या. तो उमापति, त्याचे दर्शन झाल्यावर सागराने वर मागितला कीं, त्याला अपत्य पाहिजे. त्यात त्याच्या दोनही भार्या त्याच्या बरोबर उभ्या होत्या. त्यांच्या भक्तीने प्रसन्न झालेले शीव त्याला बोलतात, "अरे लोकांच्या राजा, ज्योतिषाच्या तर्कानुसार ज्या क्षणी तुम्ही माझ्याकडे वर मागितला आहे, त्याप्रमाणे, तुला साठ हजार एक पुत्र होतील. ते सगळे शक्तीमान, नितीमान, स्वाभिमानी असेंच ते असतील. ते तुझा वंश पुढे चालवतील. असें बोलून तो रुद्र अंतर्धान पावतात. तो राजा आपली तपस्या फळल्याने परत आपल्या राज्यात दोनही बायकांना घेऊन येतो. त्याला फार संतोष झालेला असतो. त्या दोघींना एक विदर्भाची व दुसरी सिवीची, ह्यांना मुलं होतात. त्यातील एक विदर्भाची असते तिला भोपळा होतो परंतु, सिवीला एक पुत्र होतो. तो पुत्र अति सुंदर असतो. तो माणसांचा राजा

त्या भोपळ्याला पाहून ठरवतो किं, तो भोपळा फेकून दिला पाहिजे. तेव्हां त्याला आकाशवाणी ऐकू येते त्यात सांगितलेले असते, तो आवाज फार गंभीर आणि हुकमी होता, ती आकाशवाणी सांगते, "अरे माणसांच्या राजा, तू असे करू नकोस. त्या तुझ्या मुलांचा त्याग करून तू मोठी अक्षम्य चूक करणार आहेस. त्या भोपळ्यातील बिया काढ व त्या साजुक तुपाच्या भांड्यात उबवत ठेव. त्यातून तुझे भरत वंशाचे राजपुत्र जन्म घेतील. ते साठ हजार असतील. शीवाच्या आज्ञेने ते अशाप्रकारे उपजणार आहेत. म्हणून जे सांगितले आहे तसे कर.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील अठ्ठाविसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग एकोणतीसावा

लोमस सांगतात, आकाशवाणी ऐकल्यावर आपण चूक करत होतो ते त्याला समजते व तो त्या भोपळ्यातील बिया वेगवेगळ्या कलशांमधून तुपात उबदार रहातील अशा ठेवतो. त्यावर नजर ठेवण्यासाठी एक सेविका नेमली जाते जी त्या बियांच्या वाढीवर लक्ष देऊन असेल. बर्याच काळानंतर त्या कलशांतून एक एक करून त्याचे पुत्र पूर्ण बनून बाहेर येऊ लागतात. ते सगळे साठ हजार असतात. ते सगळे फार शक्तिमान असतात. ते सगळे त्या तपस्या करणार्या राजर्षीचे रुद्राच्या कृपेने उत्पन्न झालेले पुत्र असतात. ते वागण्यात क्रूर असतात. दिसायला ते भयंकर असतात. त्यांच्यात कांहीं अजब किमया होत्या कारण ते हवेत उडू शकत होते. त्यांच्या उर्मटपणामुळें ते एकमेकांशी भांडत, त्याच प्रमाणे ते देवांना सुद्धा आव्हान देत असतं. ते कोणालाच मानत नव्हते. ते एक खेळ म्हणून देवांचा पाठलाग करत व त्यांना त्रास देत एवढेच नाही तर ते गंधर्व आणि राक्षसांना सुद्धा भित नसत. त्यांच्या उनाडक्या वाढत होत्या. त्याना हाणामारीचे जणू व्यसन लागले होते. त्याच्यात बुद्धीची चमक नव्हती त्यामुळें त्यांना कोणी कांही समजावण्याचा प्रयत्न करू लागला तर त्याचीच ते परवड करत असतं. अखेरीस सगळे ठरवतात कीं, ह्या त्रासापासून मुक्ती हवी असेल तर ब्रह्माकडे जाण्याशिवाय दुसरा उपाय नाही. ते देव आणि माणसे असे सगळे मिळून ब्रह्माकडे जातात. ब्रह्मदेव त्यांना सागतात, कांहीं काळजी करू नका, तुम्ही तुमच्या पद्धतीने तुमची कामं करत रहा, कारण लवकरच सागराच्या मुलांचा नाश भयंकर रित्या होणार आहे. त्यामागील कारण त्यांचीच दुष्कृत्य असतील. असे आश्वासन मिळाल्यावर ते सगळे ब्रह्माचा निरोप घेऊन निघतात व आपापल्या निवासी जातात. त्यानंतर बरीच वर्षे तशीच जातात. त्यानंतर राजा सागर एक अश्वमेध यज्ञ आयोजित करण्याचे ठरवतो. त्या प्रमाणें त्याचे घोडे सर्वदूर फिरत असतात. त्याची उनाड मुलं त्या घोड्यांना संरक्षण देत असतात. ते घोडे धावत समुद्राकडे जातात पण ते घोडे घाबरतात. त्या घोड्यांचे संरक्षण ते करत होते परंतु, ते घोडे समुद्र किनारी आले कीं, अदृष्य होत होते. त्या मुर्ख मुलांना वाटले कीं, त्या समुद्राने त्यांचे घोडे पळवले आहेत. काय करावे ते न समजल्यामुळें ते त्यांच्या बापाकडे जातात. राजा सागर त्यांना हुकूम करतो जा, आणि सगळ्या मोक्याच्या जागा तपासून पहा. घोडे सापडले पाहिजेत नाहीतर यज्ञ पूर्ण होणार नाही. ते सगळे

राजपुत्र घोड्यांना सगळ्या पृथ्वीभर फिरून शोधतात. परंतु, त्याना ते मिळत नाहीत. कोणी त्या घोड्यांना चोरले तो चोरसुद्धा त्यांना मिळत नाही. ते परत येतात व राजापुढे हात जोडून उभे रहातात. सांगतात कीं, सगळी पृथ्वी त्यांनी शोधली पण कोठेही ते गुप्त झालेले घोडे सांपडले नाहीत. सर्व दर्या खोरी, नद्या, तलाव, कडेकपारी, वन, वाळवंट, गुहा, डोंगर, मनुष्य वस्ती, देवांची वस्ती असे सगळे त्यांनी तपासले पण ते घोडे मिळाले नाहीत. घोडे आणि चोर ह्यांपैकीं कोणीही न मिळाल्यामुळें राजा सागर चिडतो. त्या सगळ्या मुलांना सांगतो जे तुमच्या दैवात आहे तेंच होणार, तो आज्ञा करतो कीं, "तुम्ही सगळे नालायक अहात, मला तुमचे तोंडसुद्धा दाखवू नका. आणि परत येऊ नका हींच तुमची शिक्षा आहे. जर घोडे व चोर मिळाले तरच त्यांना घेऊन परत या, नाहीतर परत येऊ नका". बापाची ती आज्ञा प्रमाण मानून ते सगळे सागर पुत्र पुनः शोध कार्य सुरु करतात. शोधता शोधता त्यांना जमिनीत एक मोठी भेग दिसते. ते त्या भेगेत खोदायला सुरुवात करतात. ते वरुणदेवाचे क्षेत्र असते. त्यात ते सगळे एकत्रपणे खोदायला सुरुवात करतात. त्या त्यांच्या खोदकामामुळें समुद्राची परिस्थिती अवघड होते. त्या फटीत, चिरात रहाणारे राक्षस, साप, इतर प्राणीसुद्धा वैफल्यग्रस्त होतात. सागराच्या त्या सगळ्या मुलांच्या त्या खोदकामामुळें कित्येक मारले जातात. त्या मेलेल्या प्राण्याचे शरीराचे भाग इतस्ततः विखूरलेले दिसत असतात. अशारितीने ते सतत खोदत रहातात, वरुणदेवाच्या क्षेत्रात. बरेच दिवस ते खोदत असतात पण त्यांना ते हरवलेले घोडे किंवा त्यांना चोरणारा चोर मिळत नाही. ते अगदी ईशान्य दिशेकडील समुद्र खोदत पाताळापर्यंत जातात. परंतु घोडे मिळत नाहीत. त्या दरम्यान भटकत असतांना त्यांना ऋषी कपिल दिसतात. ते एका तेजस्वी घोड्यासारखे दिसत होते. त्या सागराच्या मुलांना वाटते किं, तो त्यांचा घोडा आहे व ते त्यांच्या मागे लागतात. त्यांना लक्षात येत नाही कीं, ते एक ऋषी आहेत घोड्याच्या रुपात. ते त्या कपिलाला पकडण्याचा प्रयत्न करतात. जसे कपिल ऋषींना लक्षात येते कीं, हे सागराचे पुत्र त्याला पकडण्याचा प्रयत्न करत आहेत, तो त्याच्या अंगातून ज्वाळा सोडतो त्या मुलांच्यावर. कपिल खरेतर एक शांत प्रवृत्तीचे संत ज्यांना इतर माणसे वासुदेव ह्या नांवाने सुद्धा सांगतात, त्यांच्या त्या ज्वाळांमुळें त्या सागरपुत्रांपैकीं कांहीं जळून मरतात. तपोश्चरणात गुंतलेले नारदमुनी ते पहातात व नंतर

येऊन सागर राजाला ते सांगतात. राजा सागर ते नारदाच्या तोंडून ऐकल्यावर बराच काळ स्थब्ध होतो. त्याला त्याचे दुःख होते. त्याला महादेवाचे शब्द आठवतात. नंतर तो अंशुमानला बोलावणे धाडतो. जो सागरला सिवीपासून झालेला एकुलता एक मुलगा, त्या असमंजासचा मुलगा असतो. सागरचा नातु असतो. सागर राजा बोलतो, माझे साठ हजार शक्तिमान पुत्र कपिलमुनींच्या क्रोधाचे बळी झाले आहेत. त्यांच्या अशा मृत्यूला मी जबाबदार आहे. मी जर त्यांना घोडे शोधण्यास पाठवले नसते तर ते झाले नसते. त्याला सागर बोलतो अरें तुझ्या बापाचा मृत्यू माझ्यामुळें झाला आहे. तो त्याचे कर्तव्य करतांना मारला गेला आहे. तो माझ्या प्रजेच्या हितासाठी काम करत होता.

ते ऐकल्यावर युधिष्ठीर विचारतो, "अहो संत  वैशंपायन, मला सांगा, सागर राजा त्याच्या पोटच्या पोरांना असे वार्यावर कां सोडतो. ज्यांचे शौर्य अतुलनीय होते. लोमस सांगतात, सागराचा मुलगा असमंजस ज्याला सिवीच्या राजकन्येने जन्म दिलेला आहे. तो नगरवासीयांच्या अशक्त मुलांना गळा आवळून पकडत असें, व ती रडत असतांना नदीत फेकून देत असें, ते पाहून नगरातील सगळे लोक राजाकडे हात जोडून जात म्हणतात, "अहो राजा, आपण आमचे संरक्षक अहात आजपर्यंत भयंकर शत्रूंपासून तुम्ही आमचे संरक्षण केले आहे, म्हणून आता आमचे संरक्षण तुमच्या मुलाकडून, असमंजस पासून होणार्या त्रासापासून आपण तितक्याच ताकदीने करावे". राजा सागर ती भयंकर वार्ता ऐकून खूप दुःखी होतो. राजा थोडावेळ विचार करून सांगतो, माझ्या मुलाची ताबडतोब नगरातून हकालपट्टी करावी असा आदेश देतो. माझ्या आज्ञेचे त्वरित पालन झाले पाहिजे. त्याचे मंत्री त्या आज्ञेचे ताबडतोब पालन करतात व असमंजसची त्या नगरातून हकालपट्टी होते. लोकांच्या भल्यासाठी राजा स्वतःच्या मुलांची गय करत नाही. अशाप्रकारे सागर आपले एक राजा म्हणून जे कर्तव्य असते ते, एक बाप म्हणूनच्या कर्तव्यापेक्षा मोठे समजून वागून एक आदर्श उभा करतो. आता तुम्हाला सांगतो अंशुमानला त्याचा आजोबा सागर काय सांगतो. सागर त्याला बोलतो, "अरे माझ्या मुला, तुझ्या बापाला मी हकलवले त्याचे मला फार दुःख होत आहे परंतु, एक राजा म्हणून माझे जे कर्तव्य आहे ते एक बाप म्हणूनच्या कर्तव्यापेक्षा श्रेष्ठ असते कोणत्याही राजासाठी, कारण त्याची प्रजासुद्धा त्याची असंख्य लेकरंच असतात. माझ्या इतर मुलांचा मृत्यू कपिल मुनींच्या रागामुळें झाला व

घोडे न मिळाल्यामुळें अश्वमेध यज्ञसुद्धा बारगळला, अशा सगळ्या गोष्टी घडत गेल्यामुळें आपल्या घराण्याचे कर्तव्य पूर्ण होत नाही. त्यासाठी आता तूंच एक आहेस जो जाऊन ते हरवलेले घोडे आणशिल. तसे केलेस तरच माझी नरकापासून सुटका होईल, तरी ते तूं करावेस अशी मी तुला आज्ञा देतो. तशी आज्ञा ऐकल्यावर तो धनुर्धारी अंशुमन त्या ठिकाणी जातो जेथे त्याच्या काकांनी खोदकाम केले होते. त्या वाटेने तो थेट समुद्रात पोहोचतो. तेथे ऋषीवर कपिल व त्यांचा घोडा तो पहातो. त्यांचे दर्शन झाल्याने तो वाकून वंदन करतो. त्यानंतर त्या सतत प्रकाशमय असलेल्या प्राचीन संताला त्याच्या येण्याचा उद्देश सांगतो. अंशुमनच्या त्या चांगल्या वागण्याने तो प्राचीन ऋषी कपिल प्रसन्न होतो. कपिल त्याला बोलतात, "बोल मुलां तुला काय पाहिजे"? ते ऐकल्यावर अंशुमन प्रथम त्या हरवलेल्या घोड्याबद्दल बोलतो व तो कोठे गेला ते शोधण्याचे सांगतो. कपिल त्याला आश्वासन देतात किं, ते त्याला त्यांचे घोडे शोधण्यात मदत करतील. कपिल पुढे त्याला बोलतात, "तुझ्या दैवात ते असतील तर ते तुला मिळतील. तुझ्यात दूरदृष्टी, सत्त्यवादीपणा, चांगुलपणा, असें कांहीं उत्तम गुण मला दिसतात म्हणून तुला मी मदत करण्यास तयार आहे. त्यामुळें तू तुझ्या पित्याच्या सगळ्या कामना पूर्ण करशिल. तुझ्या उत्तम गुणामुळें ते सगळे सागराचे पुत्र स्वर्गात जातील कारण त्यांना मी मारले आहे. सागराच्या मुलांची मुलं महादेवाच्या कृपेने संपन्न होतील. त्यासाठी मोठे व्रतस्थ, संयमित, सत्त्वशिल, मर्यादाशिल असें जीवन त्यांना जगावे लागेल. त्याप्रमाणें ते स्वर्गातून गंगा नदी जी तीन वेगवेगळ्या धारांनी वहात आहे, पृथ्वीवर आणतील. तुला तुझ्या दैवाची चांगली साथ मिळो असें ते शेवटी बोलतात. त्यानंतर कपिलमुनी त्याला त्याचा यज्ञाचा घोडा घेऊन जाण्यास परवानगी देतात. अंशुमन तो घोडा घेतो. त्याला घेऊन अंशुमन यज्ञवेदी ज्या ठिकाणी होती तेथे येतो. त्यानंतर त्या महान तपस्वी पितामहाच्या पुढे लोटांगण घालून नमन करतो. सागर मोठ्या प्रेमांनी त्याचे भाल प्रदेशाचे चुंबन घेतो. त्याला अंशुमन जे घडले ते सगळे सांगतो. त्यात कपिन मुनीने कसे त्याच्या चुलत्यांना मारले व त्यांचे स्वर्गात जाण्याचे बद्दल जे कपिलमुनी सांगतात असे सगळे तो त्याच्या आजोबाला सविस्तरपणे सांगतो. तो सांगतो किं, तो बळीचा घोडासुद्धा मिळाला असून तो यज्ञवेदीच्या ठिकाणी बांधून ठेवला आहे. ते सगळे ऐकून राजा सागर फार संतुष्ट होतो. तो

राजा त्यानंतर यज्ञ पूर्ण करतो. त्यामुळें देव सागरावर संतुष्ट होतात. त्यानंतर तो राजा वरुणाच्या रहाण्याच्या जागेला आपला मुलगा मानू लागतो. त्यानंतर शीवाच्या कृपेने तो राजा बराच काळ सुखाने राज्य करतो. त्यानंतर स्वर्गात जातो. मरण्या आधी सागर त्याच्या नातवाला अंशुमानला गादीवर बसवतो. त्यानंतर राजा अंशुमान सुद्धा समुद्राच्या किनार्यापर्यंतच्या अशा सर्व प्रदेशांवर राज्य करतो. अंशुमानचा मुलगा दिलीप नंतर गादीवर येतो. जो त्याच्या उत्तम गुणांसाठी सर्वत्र वाखाणला गेला. अंशुमान गेला जग सोडून त्यावेळी तो दिलीपला त्याच्या पूर्वजांची ती दुःखदायक हृदयाला पिळून काढणारी कहाणी सांगतो. ते ऐकून तो कष्टी होतो. त्यांनां परत त्यांच्या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी गंगा पृथ्वीवर आणावी लागेल ते तो समजतो परंतु ते त्याला जमत नाही. त्याच विवंचनेत असलेल्या राजा दिलीपला एक पुत्र होतो. त्याचे नांव ठेवले गेले भगिरथ. तो दिसायला देखणा व गुणांनीसुद्धा श्रेष्ठ असा होता. त्याचे गुण सत्त्वशिलता, निर्भयता, सत्यवादीपणा, श्रद्धाळूपणा आणि निष्पाप प्रवृत्ती असें होते. दिलीप त्याला त्याचा उत्तराधिकारी म्हणून नेमतो. परंतु, भगिरथ वानप्रस्थाश्रम स्वीकारतो. अरे भारत वंशातील तो महान राजा दिलीप, बरीच वर्षे राज्य केल्यानंतर त्याचा समय संपल्यानंतर तो स्वर्गात निघून जातो.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकोणतिसावा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग तिसावा

लोमस पुढे सांगतात, भगिरथ राजा त्याच्या गुणामुळें व सात्त्विक तेजामुळें सर्वांना आवडता झाला होता. त्याला सगळे फार मान देत होते. परंतु जेव्हां त्याला त्याच्या पूर्वजांचा नाश कपिल मुनीनी कां व कसा केला हे कळले तेव्हां त्याला फार दुःख होते. आपल्या पूर्वजांना गती मिळावी म्हणून तो तपस्या करण्याचा निर्णय घेतो. आपल्या विश्वासू कारभार्यांना बोलावून सांगतो किं, तो पूर्वजांना मुक्त करण्यासाठी गंगा नदी पृथ्वीवर आणण्यासाठी तपोश्चरण करण्यासाठी हिमालयात जात आहे. तो जोवर तेथे तपस्या करत आहे तोवर त्या मंत्र्यानी राज्याचा कारभार सांभाळावा, ते प्रामाणिक कारभारी त्याला आश्वासन देतात कीं, ते त्याची वाट पहात रहातील व त्याच्या प्रमाणेच कारभार करतील. त्यानंतर तो राजा भगिरथ हिमालयात निघून जातो. तो त्या भव्य हिमालयाचे दर्शन घेतो. त्याची उंच उंच आकाशाला भिडणारी शिखरं तो पहातो. त्यात विविध खनिज भरलेली आहेत हे तो जाणतो. त्या शिखरांवर जणूकाय टेकली आहेत अशी ढगे अधून मधून पाण्याचा शिडकावा करत होती त्यामुळे प्रसन्न वाटत होते. मंद थंड वारा वहात होता. सुंदर नद्या वहात होत्या. त्यांच्या कडेने विविध प्रकारच्या झाडे झुडपांची दाटीवाटीने वाढ झालेली होती. मधूनच एकादा उंच कडा उभा दिसत होता. ते सगळे भव्य व दिव्य असें त्याला वाटत होते. ते उंच कडे नगरातील उंच गगनचुंबी इमारती सारखे त्याला वाटले. परंतु, त्याला त्या उंच कड्यावर वाघ व सिंह आणि इतर श्वापदं वावरतांना दिसत होती. त्या शिवाय कितीतरी सुंदर पक्षी तेथे झाडावरून बागडत होते, त्यांचे विविध चिवचिवाट मनाला आल्हाद देत होते. हे सगळे पहात राजा भगिरथ हिमालयाच्या प्रदेशात मार्गक्रमणा करत होता. तेथे मोर, भृंगराज, गंदर, दत्युह, पाणकोंबड्या, जीवंजिका, कावळे, चकोर असें कितीतरी तेथे तो पहात होता. ते वातावरण आल्हाददायक होते, जणू स्वर्गच असावा. तेथे पापाचा लवलेश नव्हता. फक्त आनंद होता. तेथे असलेल्या लहान मोठ्या तलावांत, टाक्यांत विविध रंगाची कमळं फुललेली होती. त्यांचा सुगंध सर्वत्र पसरत होता. लांब माना असलेले करकोचे त्याच्या विशिष्ट ओरडण्याने आसमंत भरून निघत होते. त्याठिकाणी तो पहातो किं, स्वर्गीय किन्नर, अप्सरा, पर्या, आनंदाने त्या ठिकाणी असलेल्या नद्यात डुबक्या मारत होते. तेथे अवाढव्य आकाराचे गज राज डुलत होते. अधून मधून ते

झाडांच्या साली ओरबडून काढत व खात होते. एकंदर काय तर तो सगळा परिसर फक्त आनंदमय होता. माणसाचा अजिबात मागमूस नव्हता. त्यामुळें पाप होण्याचे कारण नव्हते कारण पाप फक्त माणूसच करत असतो. विद्याधर प्रकारचे उपदेव तेथील पहाडाच्या कपार्यात वावरत होते. तेथे मौल्यवान रत्न, व इतर प्रकारचे खडे विखुरलेले दिसत होते. त्या भागात सर्प, नागांचा सुळसुळाट होता. म्हणजे कोणी तेथे भटकूसुद्धा नये. नाग आपली लांबलचक जीभ काढून जणू आव्हान देत होते किं, कोणी त्या मौल्यवान रत्ना करता जाण्याची हिम्मत करेल. त्या अवाढव्य परिसरात सोने व चांदीचे खडक पडलेले होते. कांहीं ठिकाणी नीलमण्याचे पत्थर होते, त्यांना तासून त्वश्तु रत्न बनवतात. ते सगळे निसर्गाचे वैभव पहात पहात राजा भगिरथ एका हिमाच्छादित डोंगरावर पोहोचला. ती जागा चांगली आहे असें त्याने ठरवले व तो तेथे त्याच्या तपस्येसाठी बसला. एका अति प्रखर आणि अवघड अशा व्रतस्थतेत तो तेथे रहातो. तेथे तो राजा भगिरथ एक हजार वर्षे फक्त फळं, कंदमुळं व पाण्यावर गुजराण करत तपस्या करत असतो. देवांची हजार वर्षे पूर्ण झाल्यावर गंगा नदी माणसाच्या रुपात भगिरथाला दर्शन देते. बोलते, "मी गंगा देवी तुला भेटण्यास आली आहे. मी ह्या हिमालयाची कन्या आहे. तुला काय पाहिजे म्हणून तू असें खडतर तप करत आहेस ते सांग". ते ऐकल्यावर भगिरथ तिला सांगतो, "अहो माता गंगा, मी राजा सागराचा नातु आहे. माझे नांव भगिरथ आहे. माझ्या खापर पणजोबांनी राजा सागरांनी एक अश्वमेध यज्ञ आरंभला होता. त्याचा घोडा एकदम अदृष्य झाला तो शोधण्यासाठी माझ्या साठ हजार पणजोबांनी तो यज्ञाचा घोडा शोधतांना ऋषी कपिलांना त्रास दिला होता. त्यांनी त्या माझ्या सगळ्या पणजोबांना त्यांच्या शक्तीने जाळून टाकले ते एका गुहेत पडलेले आहेत. अशारितीने ते मारले गेल्यामुळें त्यांना पुढची गती मिळत नाही. त्याकरतां कपिल मुनींनी माझ्या आजोबांना सांगितले होते कीं, जर गंगा त्या शिवारातून वाहत गेली तर त्यांचे शुद्धीकरण होईल व त्यांना पुढची गती प्राप्त होईल असें माझ्या आजोबाना कपिलमुनींनी सांगितले, त्याप्रमाणे मी तुम्हाला प्रसन्न करून घेऊ इच्छितो ज्यामुळें तू स्वर्गातून पृथ्वीवर येशिल व माझ्या पणजोबांच्या कलेवरांवरून वाहत राहशिल, ज्यामुळें त्यांना पुढची गती मिळेल. म्हणून तसा वर मी तुझ्याकडे मांगत आहे. कीं, अहो गंगामाता, पृथ्वीवर येऊन माझ्या पणजोबांच्या अंगावरून वहात रहावे". लोमस

पुढे सांगतात, गंगामाता जिला सगळे जग पुजते, ते भागिरथाचे बोलणे ऐकते, त्यानंतर ती त्याला सांगते, "अरे भगिरथा, मी तुझ्यावर प्रसन्न झाली आहे म्हणून मी तुझ्यासाठी तसे करण्यास तयार आहे. परंतु, त्यात एक व्यावहारिक अडचण मला दिसते, ती अशी कीं, जेव्हां मी पृथ्वीवर उतरेन तेव्हा माझा जोर फार मोठा असेल तो पृथ्वीला पेलणारा नाही, तसे मला पेलण्याची क्षमता केवळ महादेवांत आहे. त्यासाठी तुला महादेवाची मनधरणी करावी लागेल". पुढे गंगामाता भगिरथाला सांगते, अशीच घोर तपस्या तू करशिल तर त्याने महादेव तुझ्यावर प्रसन्न होतील व तुला मदत करतील. म्हणजे मग मी पृथ्वीवर उतरू शकेन व तुझ्या पूर्वजांना मुक्ती मिळेल. ते ऐकल्यावर तो महान राजा भगिरथ कैलासावर गेला व तेथे त्याची घोर तपस्या तेथे सुरु झाली. कांहीं काळानंतर त्याला शंकराने दर्शन दिले जे त्याच्या खापर पणजोबाला, राजा सागरला झाले होते. महादेव भगिरथाला शब्द देतात कीं, तो गंगा शिरावर घेण्यास तयार आहे, परंतु त्याला स्वर्गस्थांचे काय म्हणणे आहे ते सुद्धा पहावे लागेल.

अशारितीने तीर्तयात्रा पर्वातील तिसावा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग एकतिसावा

ऋषी लोमस पुढे सांगतात, जसें महादेव भगिरथाचे बोलणे ऐकतात, व स्वर्गातील मंडळींचा विचार लक्षात घेऊन राजाला बोलतात, "तथास्तु, केवळ तुझ्यासाठी मी ही देवांची नदी पृथ्वीवर आणण्यात मदत करणार आहे कारण तुझ्या घराण्याचा माझा संबंध फार प्राचीन आहे". असे बोलल्यावर तो विश्वनाथ त्याच्या सगळ्या गणगोतांबरोबर हिमालयाच्या शिखराकडे येतो. ते गणगोत अतिशय भयंकर दिसत होते. तेथे आल्यावर तो शंकर भगिरथाला बोलतो, "अरे राजा, आता मी स्वर्गातील अतिपवित्र गंगा माझ्या शिरावर तुझ्यासाठी झेलणार आहे". ते ऐकून महादेवाचे उद्‌गार ऐकून तो सज्जन सामर्थ्यवान राजा गंगेची पुनः प्रार्थना करू लागतो. त्यानंतर ती पवित्र नदी पहाते किं, खाली पृथ्वीवर साक्षात परमेश्वर तिला डोक्यावर घेण्यासाठी उभे आहेत. त्यानंतर मात्र ती नदी एका मोठ्या प्रवाहाच्या रुपांने जोरांने खाली फेकल्यासारखी उतरते. ते दृष्य पहाण्यासाठी सगळे स्वर्गस्थ गंधर्व, नाग, यक्ष एकत्र जमून आले होते. ते दृष्य मोठे विलोभनीय होते. शंकराच्या डोक्यावर एक पाऊल टाकून मग ती तिचा जोर कमी झाल्यानंतर हिमालयाच्या कडी कपार्यात घुसते तिच्या बरोबर तिचे मांसे, घेऊन ती आलेली असते. तिचा प्रवास आता समुद्राच्या सखल भागाकडे जात असतो. त्यामुळें आता त्या रिकाम्या समुद्राच्या खड्ड्यात पाणी भरू लागते. त्यासाठी तिच्या प्रवाहाचे तीन भाग झालेले दिसतात. तिचा प्रवाह फेसाळ झाला होता. ती अशी पाहत होती कीं, जणूकाय एक नारी मद्यप्राशन करून त्या धुंदकीत धावत आहे. तिच्यावरील फेस असा होता किं, जणूकाय हंसपक्षी त्या पाण्यावर नाचत आहेत. तिच्या जोरदार प्रवाहामुळें ते पाणी गर्जत आहे असें वाटत होते. जणू ते पृथ्वीवरील पापाला आव्हान देत आहे. पृथ्वीवर आल्यावर गंगा राजाला विचारते, "अरे माणसांच्या राजा आता मला सांग, तुझे पूर्वज कोठे पडलेले आहेत. म्हणजे मी तसे वळण घेऊन पुढे जाईन. मी तुझ्यासाठी पृथ्वीवर आले आहे". ते ऐकल्यावर तो राजा तिला जेथे त्याचे पूर्वज पडलेले होते तेथे नेतो. ती गंगा त्या मरून पडलेल्या सागराच्या मुलांवरून वाहू लागते. गंगा व्यवस्थित उतरल्यावर महादेव पुनः आपल्या कैलासाला जातात. अशारितीने गंगा यथावकाश वरुणाच्या क्षेत्रात, समुद्राकडे जाते. त्या पाण्यामुळें तो रिकामा झालेला समुद्र भरून निघतो. भगिरथ गंगेला त्याची मुलगी समजू लागतो. जेथे

त्याचे पूर्वज निजलेले होते तेथे अर्घ्य तो देतो. ते सगळे पुर्वज उठून उभे रहातात व स्वर्गात जातात. भगिरथाला त्याने त्याच्या पूर्वजांचे ऋण फेडले ह्याचे समाधान मिळते. जो समुद्र अगस्त्यानी पिऊन टाकला होता तो पुन्हा भगिरथामुळें भरला होता. वाटपीला मारून व समुद्र पिऊन अगस्त्यानी राक्षसांचा नाश करण्यात देवांना कशी मदत केली ते मी तुला सांगितले. असें लोमस युधिष्ठीराला बोलतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील एकतिसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग बत्तिसावा

वैशंपायन सांगतात, तीर्थयात्रा करणारे पांडव आता सावकाशपणे नंदा व अपरानंदा ह्या नद्यांच्या तटावर जातात. त्याची ख्याती असते किं मोठ्यातले मोठे पाप तेथे स्नान केल्याने धुतले जाते. त्यानंतर ते तीर्थयात्री हेमकुट डोंगराकडे जातात. तेथील निसर्ग विलक्षण वाटला. तेथील दृष्य पहाण्यासारखी होती. तेथे हळू जरी बोलले तरी आकाशात ढगं जमत होती. आणि दरडी कोसळू लागत होत्या. त्यामुळें यात्री कष्टी झाले, त्यांना तो डोंगर चढता येईना. तेथे पाऊस पडत असें व वेदाचे उच्चारण होत आहे असा भास होत होता. परंतु तेथे कोणीही नव्हते. तेथे सकाळी व संध्याकाळी सूर्य असा दिसत असें किं, कोणी देवांना आरती करत आहे. तेथे ज्या मोठ्या माशा घोंघावत होत्या त्यांचा त्रास यात्रींना फार होत होता. त्या माशंच्या दंशमुळें कित्येक आजारी झाले. त्यांना शांतपणे बसून जपसुद्धा करता येत नव्हता.

युधिष्ठीर लोमसांना विचारतो, "अशा तीर्थक्षेत्री असे कां होत आहे व अशा माशा कां त्रास देत आहेत"?

लोमस त्याला बोलतात, ह्याबद्दल मला जी माहीती समजली आहे ती सांगतो, असें बोलून ते त्याबद्दलची कथा सांगू लागतात. आता मी तुला सांगतो ते नीट लक्ष देऊन ऐकून घे. ह्या रीशव नांवाच्या शिखरावर त्याच नांवाचा एक संत रहात होता. त्याचे आयुष्य शेकडो वर्षे झाले होते. त्याचा सर्व काळ तपस्या करण्यात जात असें, तसेंच त्याला राग आवरत नसें. त्याच्या रागीटपणामुळें जर कोणी त्याला कांहीं बोलले तर त्याने त्या डोंगराला आज्ञा केली आहे किं, कोणीही कांहीं बोलले तर त्याच्यावर दगड फेक आणि म्हणून तो डोंगर जरा आवाज झाला कीं, ताबडतोब दगड फेकू लागतो. ढग आकाशात भरतात व प्रसंगी पाऊससुद्धा पडतो. ही त्या रीशव ऋषीची किमया आहे. त्याच्या रागामुळें इतर कांहीं गोष्टीसुद्धा होत नाहीत. अशा कथा आहेत कीं, एकदा देव नंदा नदीवर आले होते. त्यांना पहाण्यासाठी बरीच माणसें तेथे जमा झाली. परंतु, त्या देवांना त्या माणसांना दर्शन द्यावयाचे नव्हते. म्हणून त्यांनी ही जागा कोणालाही येता येणार नाही अशी केली. त्यासाठी ह्या माशा येथे घोंघावत असतात. त्यांचा त्रास नको म्हणून कोणीही सामान्य माणूस येथे येत नाही. यात्रींना ती एक परीक्षा ठरते. जे त्या परीक्षेत योग्य ठरतात त्यांना

नंदा आणि अपरानंदा नद्यांवर तीर्थयात्रा करता येते. त्याशिवाय अधून मधून सुळके उभे झाले हे सगळे नको त्या लोकांना मज्जाव करण्यासाठी आहे. यात्रीना त्या परीक्षा असतात. त्यातून त्यांनी गेल्याने त्यांची यात्री म्हणून योग्यता मंजूर होते. लोमस पुढे बोलतात, "म्हणून, अरे युधिष्ठीरा, ह्या सगळ्या गोष्टी हा यात्रेचा भाग समजून स्वीकारावयाच्या असतात. पांडवानो, ह्या हिमालयातील यात्रा देवांनी मुद्दाम अवघड केल्या आहेत म्हणजे फक्त जो योग्य आहे तोंच तेथे जाईल. अशी ती व्यवस्था आहे म्हणून त्या बद्दल तक्रार करू नका. ज्यानी व्रतस्थ जीवन पाळलेले नाही त्याला ह्यांचे दर्शन होऊ नये अशी रचना आहे. म्हणून आता तुम्ही सगळे मौन पाळाल व गुपचुप पुढचा प्रवास परमेश्वराचे चिंतन करत करत कराल. येथे प्रत्यक्ष देव उतरतात व त्यांचे यज्ञ करत असतात. ते दिसत नाहीत कारण ते अदृष्य सृष्टीत वावरतात. (दृष्य व अदृष्य अशा दोन सृष्टी एकाच वेळी एकाच ठिकाणी कार्यरत असतात असें गृहीत धरलेले आहे, देव, दानव, राक्षस, यक्ष, अप्सरा, गंधर्व, पिशाच्च वगैरे प्रजाती अदृष्य सृष्टीतील आहेत व मनुष्य, वनस्पती, इतर जीवजूवीणू, मासें, पक्षी, लहान मोठी जनावरे दृष्य सृष्टीत असतात.) तेथे असलेल्या निरनिराळ्या खुणांचा अर्थ लोमस सांगत असतात, ते सांगतात, कांही खुणा कुस गवताच्या आहेत कांहीं खुणा यज्ञकुंडाच्या आहेत तर कांहीं खुणा यज्ञवेधीच्या आहेत असें ते दाखवतात. कांहीं झाडांना बळीचे प्राणी बांधलेले असतं असे ते दाखवतात. तो पुढे सांगतो, देव व ऋषी येथे येऊन आजही त्यांचे यज्ञ करत असतात. म्हणून ही जागा अतिशय पवित्र आहे. येथे स्नान करणार्याची सगळी पापं पार धुतली जातात. लोमस युधिष्ठीराला सांगतात, "अरें तू भरतवंशातील श्रेष्ठ आहेस म्हणून तुम्ही पांडव येथे आपले पुजाविधी करावेत व लाभ उठवावा". येथून उरकल्यावर आपण कौसिकी नदीकडे जावयाचे आहे. त्या तीर्थक्षेत्री विश्वामित्राने त्याचे घोर तप केले होते. त्यामुळें तो इंद्रापेक्षा मोठा झाला. त्याप्रमाणे, ते सगळे कौसिकी नदीकडे जातात. तो परिसर अप्रतिम प्रसन्नता देणारा होता. तेथील पाणी थंड व रुचकर होते. ते पित रहावे असें वाटत होते. तेथे लोमस त्यांना सांगतात, ही पवित्र कौसिकी नदी आहे. आणि हा पहा विश्वामित्राचा आश्रम. त्याच्या पासून कांहीं अंतरावर आणखीन एक आश्रम दिसतो तो ऋषी काश्यपांचा असतो. त्या काश्यपमुनीचा एक मुलगा असतो त्याचे नांव असते ऋष्यशिंग. तो मोठा तपस्वी

असतो. तो त्याच्या संयमी जीवनाबद्दल ख्यातनाम असतो. त्यांने त्याच्या तपस्येच्या बळावर एकदा इंद्राला पाऊस पाडण्यास भाग पाडले होते. त्यामुळें तो देवांचा राजा जो वृत्राला मारतो, वलीचा वध करतो तो ह्या ऋष्यशिंगाला मात्र घाबरत होता. इतका तो काश्यपाचा मुलगा उच्च दर्जाचा योगी होता. काश्यप मुनींना तो एका हरीणीपासून झाला होता. त्याच्या शिरावर एक शिंग होते म्हणून त्याचे नांव ऋष्यशिंग होते. त्याने लोमपादाच्या राज्यात अनेक चमत्कार केले होते. त्यांने इंद्रावर दबाव आणून त्याच्या राज्यात, जो पाऊस पडत नव्हता, तो पाडायला लावले. त्या चमत्कारामुळें लोमपाद ऋष्यशिंगावर प्रसन्न झाला व त्याने त्याची कन्या शांता त्याला पत्नी म्हणून दिली. जशी सूर्याने सवितृ दिली होती.

युधिष्ठीर विचारतो, "मला सांगा ऋषीवर्य, काश्यपाला हरणीपासून पुत्र कसा काय होतो? तो अशारिताने भिन्न प्रजातीच्या संभोगाने जन्मला असतांना एवढा पवित्र कसा झाला? त्याला वृत्र आणि वलींना मारणारा शक्र त्याला इतका घाबरत होता, कीं, त्याने दुष्काळाच्या समयी पाऊस पाडला? त्याची पत्नी किती सुंदर व सत्वशिल होती"? युधिष्ठीर आणखीन प्रश्न विचारतो, "ऋष्यशिग हरण असतांना लोमपादाची मुलगी शांता त्याच्या प्रेमांत कशी पडली? लोमपाद एक ख्यातनाम पुण्यप्रभावी राजा व राजर्षी असतांना त्याच्या राज्यात दुष्काळ कसा पडला? पाक राक्षसाला मारणारा इंद्र त्या भागात कां पाऊस पाडण्यास तयार नव्हता"? अहो लोमस मुनी मला ते सगळे नीट जसे घडले तसे सांगा. माझी उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. मला ऋष्यशिंगाबद्दल विशेष कुतूहल आहे".

ते ऐकल्यावर लोमस त्याला सांगू लागतात, विभंदक नांवाच्या एका महान संत होऊन गेला तो ब्राह्मण जातीचा होता. त्याची तपस्या मोठी होती. त्याचे वीर्य कधीच पडले नाही. त्याचे अध्यात्मिक तेज वाखाणण्यासारखे होते. त्याचे पितासुद्धा मोठे नावाजलेले होते. तो लहान असतांना सुद्धा वयाने मोठे असलेलेसुद्धा त्याला फार मान देत असत. विभंदक काश्यपाचा मुलगा होता. एकदा तो एका तलावाकडे ध्यानसाधना करण्यासाठी गेला असतां, बरेच दिवस तो तेथे राहून आपली साधना करत होता. एकदा तो त्या तलावावर तोंड धुण्यासाठी पाण्यात उतरला होता. त्याला तेथे अप्सरा उर्वशी पाण्यात खेळतांना

दिसते. तिच्या अप्रतिम लावण्याचे दर्शन झाल्यावर त्याच्या नकळत त्याचे वीर्य पाण्यात पडते. त्याच वेळी एक हरीणी तेथे पाणी पिण्यासाठी आली होती. विभंदकाचे घट्ट वीर्य पाण्यावर तरंगत त्या हरीणीच्या कडे सरकत जाते. ती ते वीर्य पाण्याबरोबर पिऊन टाकते. त्यामुळे तिला गर्भ रहातो. वस्तुस्थिती अशी होती किं, ती हरीणी एका देवाची कन्या होती तिला तिच्या कांहीं चुकीची शिक्षा म्हणून ती हरीणीच्या रुपांने पृथ्वीवर जन्मली होती व ब्रह्माने तिला उःशाप दिला होता कीं, ती एका संताला जन्म देईल व त्यानंतर ती त्यातून मुक्त होईल. असें त्या हरीणीचे भाग्यात होते. त्या ब्रह्माच्या आदेशानुसार तिच्या पोटी विभंदकाचा पुत्र जन्म घेतो. म्हणून त्याचे नांव ऋष्यशिग ठेवले जाते. ऋष्यशिंगाने त्याच्या पित्या व्यतिरीक्त इतर कोणाही पुरुषास पाहिलेले नसते. त्याचे सगळे जीवन त्याच्या पित्याप्रमाणे तपस्या करण्यात जात होते. त्याकाळी वंग देशात लोमपाद नांवाचा राजा राज्य करत होता. तो दशरथ राजाचा मित्र होता. लोमपाद सुख प्राप्तीसाठी असें कांहीं करतो ज्यामुळें तो ब्रह्माला दुखवतो. त्याच्यावर त्या जमान्यातील पुरोहित वर्ग त्याच्यावर नाखूष होते. त्यामुळें त्याचे यज्ञ व इतर कर्मकांड विधी होत नव्हते. त्या सगळ्याचा परिणाम स्वरुप इंद्राने त्याच्या राज्यात पाऊस पाडणे बंद केले. त्यामुळें त्या राजाच्या प्रजेचे हाल होऊ लागले. लोमपाद राजांने बाहेरून ब्राह्मण आणून त्यांना विचारले किं, पाऊस कसा पडेल. ते ज्ञानी असूनही त्यास कांहीं सांगू शकले नाहीत. लोमपाद त्या ब्राह्मणांना सांगतो पावसासाठी कांहीं उपाय शोधून काढा. त्यावर एक ज्ञानी त्याला सांगतो अरे राजा तुझ्या राज्यातील ब्राह्मण तुझ्यावर नाराज आहेत, त्यांना मनवण्याचा प्रयत्न करावास. ते ऐकल्यावर राजा ऋष्यशिगाला आमंत्रण देतो. तो विभंदकाचा एकुलता एक मुलगा असतो. जो फक्त त्या राज्यातील जंगलात रहात असतो. त्याने कधी बाई पाहिलेली नसते. तो खूप साधा रहाणारा पूर्णतया निष्पाप असा ब्राह्मण आहे. असें त्याच्याबद्दल बोलले जात होते. जर असा ब्राह्मण तुझ्या निवासी प्रदेशांत आणला गेला तर त्याच्या प्रभावामुळें तुझे हे नष्टचर्य संपेल. राजाला ते  समजल्या बरोबर लोमपाद त्याला आमंत्रण देतो. परंतु त्याला आणणे तितके सोपे नव्हते. राजाला त्याच्या चुकांबद्दल प्रायश्चित्त करावे लागेल असें सांगितले गेले. त्यानंतर त्याच्या राज्यातील ब्राह्मणांची नाराजी संपली व सगळे राजाला मान देऊ लागले. त्यानंतर तो राजा त्याच्या कारभार्यांची बैठक घेतो व

त्यात ठरते ऋष्यशिंगाला कसे आणावयाचे. त्या बैठकीला आलेले कारभारी मोठे अनुभवी व जाणकार होते. ते ठरवतात कीं, राज्यातील सुंदर मुली त्याच्याकडे पाठवावयाच्या व त्या बायकां त्या बैरागी व कधीही स्त्री न पाहिलेल्या ऋषीला मोहात पाडून येथे आणतील. त्यासाठी पुष्कळ सुंदर बायकांना जंगलात पाठवण्याचे ठरते. त्या बायकांना राजा सांगतो किं, काय वाटेल ते करा पण त्या ब्राह्मणाला माझ्या राज्यात आणा, जी आणेल तिला बक्षिस देण्याचे ठरते. त्या बायका तयार होतात पण त्या घाबरतात सुद्धा कारण जर तो ऋष्यशिंग रागावला व त्यांने शाप दिला तर काय करावयाचे अशी त्या बायकांना भिती वाटत होती. त्यामुळें त्या अखेरीस सांगतात कीं, त्यांना ते काम झेपणार नाही. परंतु त्यात एक कुंटणी म्हातारी बाई होती ती ते आव्हान स्वीकारते . ती राजाला सांगते त्यासाठी तिला कांही गोष्टी लागतील त्या राजाने उपलब्ध केल्या पाहिजेत. ते ऐकल्यावर राजा आज्ञा देतो किं, त्या म्हातारीला जे पाहिजे ते सगळे आणून द्या. त्याशिवाय तो तिला खूप धनसंपत्ती देतो. ती म्हातारी बाई तिच्या कुंटणखान्यातील कांहीं देखण्या बायांना घेऊन जंगलात ताबडतोब निघते.

अशारीतीने तीर्थयात्रा पर्वातील बत्तिसावा भाग संपला.

## तीर्थयात्रा पर्वाचा भाग तेहतिसावा

लोमस सांगतात, राजाचा उद्देश ओळखून ती म्हातारी एक तरंगता तराफा तयार करून घेते. त्यावर विविध प्रकारची झाडं, वेली अशी निवडून घेते किं, त्यावर सुंदर फुलं आहेत. नंतर तो तराफा ती त्या जंगलात जेथे काश्यपाचा आश्रम होता त्याच्या जवळ नेते. तेथे गेल्यावर तिच्या मुली त्या परिसराची पहाणी करतात. कोण कोठे आहे व कसे तेथे फिरतात ते त्या तपासून घेतात. ती कुंटणी योग्य संधीची वाट पहात तेथे दबा धरून बसते. जसे शिकारी सावज पकडण्यासाठी बसतो. केव्हा ऋष्यशिंग आश्रमाच्या बाहेर पडते, कोठे जातो, काय करतो ते त्या न्याहात बसतात. त्या तराफाच्या झाडीत बसून त्या ते पहात असतात व तो निष्पाप ऋषीपुत्र त्याच्या बाबतीत अंजान असतो. एक दिवस तो त्या मुलींतील एका सुंदर मुलीला पहातो, जी त्या कुंटणीने मुद्दाम त्याच्या आश्रमाच्या जवळ येरझार्या मारत ठेवलेली असते. त्याला आश्रमाच्या बाहेर आलेले पाहून ती त्याला गोड आवाजात विचारते, "अहो संत, आपण साधना करता कां? आपल्याकडे खूप फळं कंदमुळं असतील नाहीं कां? तुम्हाला आश्रमात रहावयाला खूप आवडते कां"? मी आपल्याला भेटावयाला आले आहे. असें बोलत ती कन्या त्याच्या जवळ जाते. तिचे उन्नत उरोज त्याला दिसावे म्हणून वरील वस्त्र तिने घातलेले नव्हते. म्हणजे ती उघडीच होती. पुढे ती ऋष्यशिंगास बोलते, "आजकाल तरुणांत तपस्या करण्याची भारी आवड उत्पन्न झालेली आहे नाहीं कां? तुमच्या पित्यांचे आपल्यावर लक्ष असेल नाहीं? आपण ऋष्यशिंग अहात नां?आपण ब्राह्मण जातीचे अहात नां? आपले अध्ययन चांगलेच होत असेल नाहीं कां"? ऋष्यशिग तिचे मोठे स्तन एक कुतूहल म्हणून अचंबित होऊन पहात असतो कारण त्याने कधी बाई पाहिलेली नसते. त्याचा ते निरागसपणा पाहून ती मुलगी आणखीन उत्तेजित होते. तिच्या प्रश्नांचा सपाटा चालूच होता. ते ऐकल्यावर ऋष्यशिंग तिला बोलतो, "आपण खूप तेजस्वी दिसता. एकादा दिवा लावला आहे असें तुम्हाला पाहीले कीं वाटते. आपल्याला मान दिला पाहिजे. मी आपल्याला पाय धुण्यासाठी पाणी देतो असें तो भोळा भाबडा तरुण ऋषी तिला सांगतो. आपल्याला जर फळं व कंदमुळं आवडत असतील तर मी ती तुम्हाला देईन. अतिथीचे स्वागत करावे असें मला शिकवले आहे. आपण ह्या कुसाच्या गाद्यांवर बसू शकता. त्यावर काळ्या हरणाच्या कमावलेल्या

चामड्यांनी बसण्यासाठी चांगले केले आहेत. तो पुढे तिला विचारतो भाबडेपणाने, आपला आश्रम कोठे आहे. त्यावर ती मुलगी त्याच्याशी दोस्ती करणे सोपे आहे हे समजते व तिचे धैर्य वाढले. ती त्याला बोलते, "तुम्ही देवासारखे सुंदर व तेजस्वी दिसता". असें ती त्याला बोलते. तो विचारतो, "तुमचा धर्म कोणता? त्यात काय प्रार्थना असतात"? त्यावर ती कलावंतीण त्याला बोलते, "अहो काश्यपाच्या मुला, आमचा आश्रम त्या पहाडाच्या पलिकडील दुसर्या उतारावर आहे. तो तीन योजने इतके लांब आहे. आमचा आश्रम फार प्रसन्न आहे. आमच्या धर्मात लवून नमस्कार करण्याचा प्रघात नाही. आम्ही पाय धुण्यासाठी पाणी देत नाही. आम्ही तू नमस्कार करावा इतकी मोठी व लायक नाही. ती त्याला सांगते. उलट मी तुला नमस्कार करावयाला आली आहे, अहो ब्राह्मण". तुला नमस्कार करणे, तुझे पाय धुणे असें आमच्या धर्मात सांगितले आहे म्हणून मी तुला भेटण्यासाठी आले आहे". असें म्हणून ती सांगते कीं, "तू मला मिठी मारण्याची इच्छा आहे". ते ऐकल्यावर ऋष्यशिंग बोलतो, "त्या ऐवजी मी तुला कांहीं तीन प्रकारच्या फळं खाण्यासाठी देतो. त्याशिवाय काहीं खजूरसुद्धा आहेत. तो पुढे बोलतो, तुला ते खायला आवडतील असें मला वाटते".

लोमस सांगतात, त्यांने दिलेली फळं ती फेकून देते. नंतर ती तिच्याकडील खाण्याचे पदार्थ त्याला खाण्यासाठी देते. ते पदार्थ त्याने कधीच खाल्लेले नव्हते. ते खाल्ल्यावर त्याला ते आवडतात. नंतर ती त्याला सुगंधी हार घालते जे त्याला माहित नव्हते. असें सुगंधी पदार्थ त्याला माहित नव्हते. त्यानंतर ती त्याला झुळझुळीत वस्त्र नेसावयाला देते. त्या सगळ्या गोष्टी त्याला इतक्या नवीन होत्या किं, त्यात तो रमू लागला. त्याची त्या नवीन धर्माबद्दल पुष्कळ उत्सुकता वाढू लागते. सुवासिक रुचकर पेये त्याला ती पिण्यास देते. तेसुद्धा त्याला खूप आवडते. त्या सगळ्या गोष्टींमुळें त्यांची दोस्ती होते. ती त्याला एक चेंडु दाखवते व तो फेकणे व झेलणे अशा खेळ ते खेळू लागतात. त्यात ती मुद्दाम त्याच्या अंगावर पडते व त्याला घट्ट धरते. त्यानंतर ती तिचे मादक चाळे सुरु करते. त्याच्याकडे प्रेमळ नजरेने पहाणे, गोड हसणे, डोळे मिचकावणे, असें सगळे चाळे त्याला त्यात अडकवण्यासाठी सुरु होतात. ती कलावंतीण त्याला त्याच्या हातात तिचे भरलेले स्तन धरावयाला लावते. त्या स्पर्शाने कांहीं परिणाम त्यावर होतो कां, ते ती अजमावत

असते. हे सगळे होत असतांना तिची मालकिण कुंटीणी लांबून पहात असते त्या तराफातील झाडांच्या आड लपून. एकदा ती कलावंतीण त्याचे लिंग हातात पकडते. हळू हळू चोळू लागते, त्याचा काय परिणाम त्यावर होतो ते तिला अजमावयाचे असते. ऋष्यशिगाला ते सगळे नवीन होते. तो तिला विचारतो हो ती काय करते? ती उत्तर देते कीं, "हा एक प्रकारचा यज्ञ आहे". तो भाबडेपणे तिला विचारतो, "त्या यज्ञाचे नांव काय"? ती सांगते, "ह्याला भोग यज्ञ असें म्हणतात. असा यज्ञ आम्हाला नियमितपणे करावा लागतो. तू असें यज्ञ नाही करत कां"? तो आश्चर्य चकीत होऊन सांगतो, "नाही, असा यज्ञ असतो त्याचे मला माझ्या पित्याने कधीच सांगितले नाही". अशारितीने त्यांच्या गप्पा होत असतात. एवढे झाल्यावर ती कुंटीण ठरवते कीं , आजच्या पुरते इतके पुरे, म्हणून ती एका विशिष्ट प्रकारे पक्षाच्या आवाजाची नक्कल करते, तो आवाज ऐकल्यावर ती ऋष्यशिंगाशी खेळणारी कसबी कलावंतीण समजते किं, आता परत निघावयाचे, म्हणून ती ऋष्यशिंगाचा निरोप घेते व सांगते, ती पुनः त्याला भेटावयाला येईल तेव्हां तिच्या भोगयोगशास्त्राची आणखीन माहिती त्याला शिकवेल. ऋष्यशिंगाला तो गृहपाठ फारच आवडलेला होता. तो तिला सांगतो कीं, तो तिची वाट पहात राहील, जातांना ती धूर्त कलावंतीण त्याच्या अधरांवर आपले अधर दाबून गट्ट चुंबन घेते. त्याला तो भोगयोग सगळा शिकावयाचा आहे. असें सांगून तो तिला बोलतो कीं, त्याला आश्चर्य वाटते किं, आजपर्यंत त्याच्या पित्याने अशा प्रकारचे योगशास्त्र असते त्याबद्दल कधी एक अवाक्षर सुद्धा काढलेले नव्हते. जाता जाता ती त्याला सांगते आमच्या शास्त्राप्रमाणे तू सुद्धा माझ्या ओठांवर तुझे ओठ चांगले जोराने दाबून चुंबन घ्यावयास पाहिजे असें बोलल्यावर तो एकाद्या आज्ञाधारक शिष्याप्रमाणे ती जसे सांगते तसे करून एक जोरदार चुंबन तिला देतो. त्यानंतर ती निघून जाते. ऋष्यशिगाला तो अनुभव विलक्षण वाटत होता. असे कांहीं असते तेंच त्याला माहीत नव्हते. माझ्या पित्याने हा महत्वाचा योग मला कां नाही सांगितला व ते करणारे ही माणसे कोण आहेत? त्यांचे शरीर माझ्यापेक्षा कां वेगळे आहे? माझे शरीर राकट व कडक आहे तर त्या माणसाचे कोमल व नाजूक आहे असें कसे? माझे स्तन सपाट आहेत व त्यांचे असे अंगाबाहेर आलेले असे कसे? अशा अनेक प्रश्नाने त्याची बुद्धी अस्वस्थ झाली होती. त्याच्या अंगात वेगळ्या कंपाचा त्याला अनुभव येत

होता व त्याचा अर्थ त्याला समजत नव्हता. तो त्या मुलीला विसरू शकत नव्हता. त्याच्या मनात कधी नाही असें विलक्षण अशा विचारांचे काहूर माजले होते. तो कांहीसा गोंधळलेला होता. ती गेल्यानंतर तो असा त्याचाच विचारात गुंतलेला असतांना त्याचे पिता विभंदक, काश्यपाचे पुत्र तेथे येतात. त्यांचे डोळे सिंहासारखे घारे होते, त्याच्या अगावर केस होते व त्याच्या जटा पाया पर्यंत लांब वाढलेल्या होत्या. त्याचे ध्यान त्याच्या कुळाला साजेसे असें होते. त्याचे जीवन अति शुद्ध प्रवृत्तीने बंदिस्त असें होते. त्याचा सगळा काळ ध्यान साधनेत जात होता. असे विभंदक आपल्या मुलाकडे जातात. त्याला आज तो वेगळ्या मनस्थितीत असल्याचे समजते. तो नेहमी सारखा त्यांचे स्वागत करत नाही. तो कोठल्यातरी विचारात मग्न असल्यासारखा दिसतो. थोडा दुःखी, अस्वस्थ असा तो त्याला वाटतो. कोठेतरी आकाशात ध्यान केल्यासारखा तो वर बघत बसलेला होता. ते पाहून त्याचा पिता विभंदक त्याला विचारतो, "माझ्या बाळा, आज तू असा बेचैन कां दिसतोस? तू आज यज्ञासाठी काटक्या नाही गोळा करावयाला गेलांस? मला खात्री वाटते तू आजची अग्नीपुजा व्यवस्थितपणे केली आहेस. मला खात्री आहे तू, नेहमीप्रमाणे, सगळी यज्ञाची भांडी स्वच्छ केली आहेत व वासराला दुध पाजून नंतर गाईचे उरलेले दुध आपल्या यज्ञाच्या तयारीत ठेवले आहेस". त्यानंतर तो ऋषी पिता कांहीं शंका आल्यागत बोलतो, "अरे ऋष्य, तू तुझ्या नेहमीच्या आनंदी मनस्थितीत दिसत नाहीस? काय कारण झाले किं, तुझी अशी अवस्था झाली आहे? मला सांग, कारण मला सगळे समजले पाहिजे. मला सांग आज येथे कोणी परका माणूस येऊन गेला कां? त्यांने तुला कांहीं त्रास दिला कां"? बापाचे प्रश्न येत होते पण मुलाचे तेथे लक्ष नसावे अशी स्थिती दिसत होती.

अशारितीने तिर्थयात्रा पर्वातील तेहतीसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग चौतिसावा

ते एवढे बापाचे प्रश्न ऐकल्यावर ऋष्यशिंग सांगतो, "बाबा, आज येथे कोणी वेगळ्या धर्माचे शिष्य आले होते. त्यांच्या माथ्यावर भरपूर केशभार होता. ते माझ्या इतकेच आकाराने होते. त्या माणसाचे अंग सोनेरी रंगाचे चमकदार व तेजस्वी होते. त्याचे डोळे मोठे व चमकदार परंतु, आनंद देणारे होते. ते देवासारखे मला वाटले. त्या माणसाचे सौदर्य देवांसारखे होते. त्यांची कांती गोरी होती व डोळें काळेभोर होते. त्यांच्या बोलण्यात एक वेगळीच गोडी मला जाणवली. असा माणूस, बाबा, मी कधीच पाहिलेला नाही". त्याने त्याचे केश आपल्यासारखे सुटे सोडलेले नव्हते, ते व्यवस्थितपणे विणल्यासारखे चांगले बांधलेले होते त्यामुळें तो माणूस मला खूप चांगला वाटला. त्याच्या सर्वांगाला एक प्रकारचा सुगंध येत होता. त्याच्या केसाला आणखीन वेगळा सुगंध येत होता. सगळेच मला रमणीय वाटले. त्याच्या अंगावर कांहीं चमकणारे दागिने असावेत असें मला वाटते. त्याची छाती आपल्यासारखी नव्हती. ती एकाद्या कलशासारखी बाहेर आलेली अशी वाटत होती. जणूकाय दोन मोठे कलश त्या ठिकाणी आहेत. ते गोल भरलेले कलश गमतीशीर प्रकारे हलत होते जेव्हां तो माणूस माझ्याशी बोलताना डुलत होता. मला ते पाहून खूप मजा वाटली. त्या माणसाचा आवाज खूपच गोड व बारीक होता. जसा घंटानाद व्हावा. आपल्यासारखे त्याच्या अंगावर केस नव्हते. त्यामुळें तो जास्त सुंदर दिसत होता. जरी डोक्यावर खूप केस होते. त्याचा कंबर फार निमुळती होती व ढुंगण चांगलेच रुंद होते आपल्याप्रमाणे लहान नव्हते. त्याच्या हातात कडं होती कोठल्यातरी धातुची असावीत कारण त्यांचा आवाज येत होता जेव्हां तो हात हलवत असें. त्याचे पोट पातळ होते. त्याच्या अंगावरील वस्त्र तलम होते व कांहीं प्रमाणात पारदर्शक होते त्यातून त्याच्या मांड्या दिसत होत्या त्या भरलेल्या होत्या. त्याच्या पायात सुद्धा कंकण होती. त्यांचा छानसा किंकिणा आवाज होत होता, जेव्हां तो चालत असें. त्याची उभी रहाण्याची व चालण्याची पद्धत विलक्षण आकर्षक होती. त्यात जे डुलणे होते तसे मी कधी पाहिलेल नाही. त्याच्या अंगावर आणखीन कांहीं कदाचित असतील पण ते दागिने असावेत. त्यात चमक होती. त्याचे हसणे गोड होते. मी त्याला पाय धुण्यासाठी पाणी दिले तर तो म्हणतो त्यांच्या धर्मात असें पाय धुण्याची पद्धत नाही. मी पिण्यासाठी पाणी दिले तेव्हां त्याने

त्याच्याकडील कांहीं पिण्यासाठी होते ते त्याच्या कडील पिशवीतून काढले व उलट मला पिण्यासाठी दिले. तो म्हणाला त्यांच्या धर्मात असेंच करतात, जेव्हा कोणी परका माणूस भेटतो. त्याने मला ते पिण्यासाठी दिले ते फारच रुचकर होते. त्याच्या अंगावरील कपडे फारच सुंदर व तलम होते. माझे कातड्याचे वस्त्र त्या पुढे फारच हलक्या प्रकारचे होते. मला त्यामुळें शरम वाटली. तो बोलत असतांना मला त्याचे बोलणे ऐकत बसावे असें वाटू लागले. त्या माणसाबरोबर होतो तेव्हां मला एक प्रकारचा अध्यात्मिक अनुभव आला जसा मला आधी कधी आला नव्हता. त्यानंतर त्याने मला मिठी मारली व म्हणाला किं. त्याच्या धर्माप्रमाणे भेटलेल्याला पाणी देत नाहीत तर मिठी मारतात. अगदी घट्ट मिठी त्याने मला मारली व किती गोड तो हसत होता. त्यावेळी त्यांने त्याचे डोळे मिचकवले ते मला खूप आवडले. त्याच्या सगळ्याच गोष्टी मला फार आवडू लागल्या आहेत. मला वाटते तो ज्या धर्माचा आहे तो धर्म आपल्या धर्मापेक्षा सरस आहे. मी त्याला आपण खातो ती फळं खाण्यासाठी दिली ती त्यानी घेतली नाहीत. त्या ऐवजी त्यांनी त्याच्या कडचे खाद्य पदार्थ पिशवीतून काढले व मला खाण्यासाठी दिलें. अहो बाबा, त्यांची रुची इतकी छान होती किं मला माझी लाज वाटली की मी त्याला आपली फळं दिली. त्या माणसाचे सगळेच आपल्यापेक्षा सर्वप्रकारे जास्त चांगले होते तरी तो मला म्हणाला किं, मी त्याच्या पेक्षा उच्च आहे व तो तसे बोलत मला सारखा मिठी मारत होता कारण मिठी मारणे हे त्यांच्या शिष्टाचारात महत्वाचे असते असें त्यांनी मला सांगितले. त्यानंतर त्याने कमाल केली बाबा. तो माझ्या पाया पडला. हे सगळें मला समजेनासे झाले आहे. तो गेल्यावर मला कांहीं सुचत नाही असें झाले आहे. मला बाबा, त्या माणसाची सारखी आठवण येते. त्याचे सगळेच आपल्यापेक्षा सरस असूनही तो मला म्हणाला मी उच्च आहे व तो माझ्या पाया पडला हे सगळे माझ्या आकलना पलिकडले आहे. मला त्याने त्याची गोल घट्ट अशी छाती हातात धरावयाला सांगितले. मी तसें केले तेव्हां तो माझ्याकडे हसत हसत पहात राहिला. त्यानंतर त्याने मला गालाला व नंतर ओठांवर चुंबन घेतले. त्यानंतर त्यांने माझा हात त्याच्या लिंगाच्या ठिकाणी नेला, मला आश्चर्य वाटले कारण त्या माणसाला तेथे लिंग नव्हते मी हाताने पुनः पुन्हा तपासले परंतु, त्या जागी एक भोक असल्याचे मला जाणवले मी त्याला विचारले तो हसत हसत बोलला आमचे लिंग आत असते म्हणून ते भोक तुला

लागले. मी ते ऐकून अजब झालो, मला कांहीं समजेना. तो बोलला त्यांच्या भोगयोगात असें असते कीं, माझे लिंग त्याच्या उलट्या लिंगात म्हणजे आत घालावे लागते. त्यामुळें योग्यांना परमानंद मिळतो. हे माझ्यासाठी नवीन होते. त्याने त्यामुळें मला कांहीं वाटते कां असें कांहींतरी तो विचारत होता. मला कांहीं खास वाटले नाही पण त्याच्या नरम व गुबगुबीत अंगाच्या स्पर्शामुळे मला बरे वाटत होते एवढेच मी त्याला सांगितले. त्याचे डोळे माश्याच्या आकाराचे होते. त्याच्या एका हातात एक गोल चेंडू होता व तो चेंडू तो सारखा जमिनीवर आपटत होता व त्यामुळें तो पुन्हा उसळी मारून वर येत होता. मला बोलला तो माझा नवा मित्र, आपण चेंडू खेळू. मी त्याच्या बरोबर चेंडू खेळलो. खूप मजा आली. ऋष्यशिंग फार खुषीत दिसत होता पण तो त्याचा मित्र गेल्यावर त्याला कांहीं सुचेना. त्याच्या दृष्टीने तो आलेला पाहुणा जास्त उच्च वाटत असतांना तो मात्र ऋष्यशिगाला उच्च बोलून त्याच्या पाया पडला त्याचे त्याला नवल वाटत होते. त्या प्रसंगामुळें ऋष्यशिंगाचा पार गोंधळ उडाला होता. तो ध्यान करू शकत नव्हता. त्याला सारखी त्या पाहुण्याची आठवण येत होती. मी त्याला विचारले त्याचा आश्रम कोठे आहे? तो बोलला त्याचा आश्रम ह्या पहाडाच्या पलिकडील उतारावर आहे व ते मला बोलला किं, एक दिवस ते मला त्याच्या आश्रमात नेणार आहे जर मला यावयाचे असेल तर. मी त्याला सांगितले किं, मला त्यांचे सगळे यज्ञ प्रकार शिकावयाचे आहेत व त्यासाठी मी माझ्या बाबाच्या परवानगीने त्याच्या आश्रमात जाऊ इच्छितो. ते ऐकून तो फार आनंदीत झाला. मी त्याला विचारले किं, त्याच्या यज्ञाचे नांव काय? तो सांगत होता त्याच्या यज्ञाचे नांव भोगयज्ञ असें आहे व तो सांगत होता कीं. त्याच्या यज्ञात आपल्या यज्ञा सारखे असे यज्ञ कुंड नसते. त्याच्या यज्ञात म्हणे आपल्या शरीराचा अग्नीच चेतवण्यावर भर असतो. हे कांहीं वेगळेच मला वाटले म्हणून मला तो भोगयज्ञ विधी शिकण्याची इच्छा आहे. त्यानंतर तो माणूस निघून गेला पण तो पुन्हा मला भेटण्यासाठी येथे येणार आहे असें आश्वासन देऊन गेला आहे.

पुढे ऋष्यशिंग त्याच्या पित्याला विचारतो किं त्यांना हे असे यज्ञ विधी माहीत आहेत कां? मला ते सगळे शिकावयाचे आहे जे तुम्हालासुद्धा माहीत नाही. त्याचे लिंग उलटे कसे व मी माझे लिंग त्याच्या उलट्या लिंगात कसे घालावयाचे, त्यामुळें परमानंद मिळतो असें तो

म्हणाला. त्याचे प्रश्न वाढत होते. हे त्या भाबड्या निष्पाप ऋष्यशिंगाचे ते भाबडे बोलणे ऐकल्यावर त्याचा पिता विभंदक विचारात पडला.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील चौतिसावा भाग संपला.

# तीर्थयात्रा पर्वाचा भाग पस्तिसावा

विभंदक त्याला सांगू लागतात, "अरें माझ्या निष्पाप बाळा तुला जे भेटले तो राक्षस होता. ते अशाच देखण्या रुपात फिरत असतात. ते फार सुंदर दिसतात व त्यांच्यात मायावी शक्ती असते. त्यांचे काम असते आपल्या सारख्या तपस्व्यांची तपस्या मोडणे. त्यासाठी तुझ्या नासमजपणाचा फायदा तो घेण्यासाठी आला होता. तरी बरे, मी वेळीच आलो. ते विविध गोष्टी करतात व आपल्या सारख्या योग्यांना भुरळ पाडून मग आपली तपस्या भंग करतात. तो जो भोगयज्ञ सागत होता ते दुसरे तिसरे कांहीं नाही तर तुझ्या तपस्येचा भंग करण्याची व्यवस्था आहे. अरे माझ्या मुलां जर असा कांही यज्ञ असतां तर तो मी सांगितला नसता कां? त्याच्या त्या गोंडस मायावी रुपावर तू भाळलास कारण, तुला त्या गोष्टींची कल्पना नव्हती". ते राक्षस तुझ्या सारख्या अननुभवी संतांना कोठेतरी घेऊन जातात व मग खाऊन टाकतात. अशा गोष्टींपासून तू जरा सावध हो. नाहीतर माझ्या गैरहजेरीत तो पुन्हा येईल व तुला कोठेतरी घेऊन जाईल, पत्तासुद्धा लागणार नाही. म्हणून अशां आकर्षक गोष्टीं पासून सावध रहा. त्याच्या गोड बोलण्यावर भुलू नकोस". त्याने जी फळं दिली व जे पेय दिले ते तुझी तपश्चर्या मोडण्यासाठी होते. अशी फळं व पेये पापी लोक खातात आणि पितात. ती सुरुवातीला चागली वाटली तरी कालांतरानी ती सर्व नाश करणारी असतात. जर अशी फळं व पेये तुला योग्य असती तर मी ती तुला दिली असती हे तुझ्या लक्षात आले नाही ते दुर्दैव जनक आहे. त्यांना ते सुगंध तुला हुंगायला दिले ते माणसाची तपस्या मोडण्यासाठी असतात. म्हणून तू पहा आता तुझ्या नेहमीच्या कार्यापासून दूर गेला आहेस. एवढ्याने एका भेटीत इतका बिघाड तुझ्यात त्याने केला, जर तो राक्षस पुन्हा पुनः येत गेला तर तुझा नाश होईल. जर तो पुन्हा आला तर त्याला हाकलून लाव. तुझ्या नासमजपणाचा त्याला फायदा उठवावयाचा होता. असें, विभंदक त्याला समजावतो. ऋष्यशिगास अशारितीने सावध करून तो ऋषी विभंदक त्या मुलीच्या शोधात निघतो. त्याला तिचा छडा लावून ती पुन्हा तेथे येणार नाही असा बंदोबस्त करावयाचा असतो. परंतु, त्याला ती बाई मिळत नाही. तो पुन्हा परत आपल्या पर्णकुटीत येतो.

त्या दरम्यान जेव्हां काश्यपाचा मुलगा फळं आणण्यासाठी गेला होता, ती कलावंतीण पुन्हा तेथे येते. ऋष्यशिंगाला पुन्हा भुलवण्यासाठी ती आलेली असते. बापाने सांगितलेला सावधगिरीचा इशारा ऋष्यशिंग विसरतो व तिला पहाताच त्याच्या कुटीतून बाहेर येतो व तिला सांगतो, "चल माझे बाबा फळं आणण्यासाठी गेले आहेत त्यांच्या येण्या आधी आपण तुमच्या आश्रमाकडे जाऊ. ती त्याला ताबडतोब तिच्या तरफ्यावर घेते व ते तेथून निघतात. बराच प्रवास भटकत ते राजाच्या वाड्या कडे येतात. त्या दरम्यान ती त्याची बरीच करमणूक करते परंतु, त्याचे पावित्र्य ढळणार नाही ह्याची दक्षता त्यांना बाळगावयाची असते. जसें ऋष्यशिंग त्याच्या राज्यात प्रवेश करतो त्याच्या आकाशात ढगं जमू लागतात. आणि पाऊस पडू लागतो. ते पाहून राजाचा आनंद गगनात मावत नाही. राज्यात पावसाने थैमान माजवले. सगळीकडे पूर आले व सगळी तळी, टाक्या, विहीरी भरून वाहू लागल्या.

राजा इतका प्रसन्न झाला किं, तो त्याची कन्या शांता ऋष्यशिगाला देतो. त्या आधी ऋष्यशिंगाच्या पित्याचा राग शांत करण्यासाठी विभंदकाच्या येण्याच्या मार्गावर शेते नांगरून ठेवली व असंख्य गाई चरतांना दिसतील असें केले. तेथे त्याचे सैनिक गुराख्याच्या वेषात ठेवले व त्यांना सांगून आज्ञा केली किं, जर ऋषी विभंदकांनी त्याच्या मुलाची चोकशी केली तर त्यांना हात जोडून तुम्ही सांगावयाचे किं, ही शेत व ह्या गाई ऋष्यशिंगाच्याच आहेत व आम्ही त्याचे सेवक त्यांची देखभाल करत आहोत. त्यानंतर त्या महान ऋषीला सन्मानपूर्वकपणे राजवाड्यात आणावे.

विभंदक फळं गोळा करून त्याच्या पर्णकुटीत येतो. तो त्याच्या मुलाला शोधू लागतो. त्याला ऋष्य कोठेच दिसत नाही तेव्हां त्याचा राग अनावर होतो. त्याला संशय येतो किं, हे त्या राजाचेच कारस्थान आहे. कारण त्याला माहित होते कीं, त्या राज्यात पाऊस पडत नाही व त्या करता त्याला एका निष्पाप ब्राह्मणाची गरज होती. ते लक्षात आल्यावर तो थेट राजाच्या राजधानीकडे चंपाकडे निघतो. त्याने रागाला व त्याच्या नगराला जाळून टाकण्याचा निश्चय केला होता. त्या फणकार्यात तो ऋषी लगबगीने राजधानीकडे जाऊ लागतो. वाटेत तो थकतो, त्याला विश्रांती साठी जागा पहात असतो. त्याला तेथे गुराखी त्यांची गुरं सांभाळत असलेली दिसतात. तेथे तो आल्याचे पहाताच ते गुराखी त्याचे

स्वागत करतात. त्याची व्यवस्था करतात. विभंदक विचारतो, "ही गुरं कोणाची"? तो प्रश्न ऐकल्यावर ते सगळे गुराखी सांगतात, "अहो ब्राह्मण हे सगळे तुमच्या मुलाचे आहे. कारण राजांने त्याला त्याचा उत्तराधिकारी केले आहे. हि नांगरलेली शेत व ह्या सगळ्या गाई तुमच्याच आहेत. आपण आज्ञा करावी, तसे होईल". त्या नंतर ते सैनिक विभंदकाला राजवाड्यात नेतात. तेथे तो पहातो कीं त्याचा मुलगा राजाचा जामात झाला आहे. ते पाहून त्याला काय करावे समजत नाही. त्यानंतर त्याची पुजा राजा त्याच्या पायाशी बसून करतो व त्याची डोके टेकून क्षमा मागतो व त्याला हे सगळे कशासाठी करावे लागले ते समजावून सांगतो. त्यात दरबारी ब्राह्मणसुद्धा त्याची समजूत काढतात व त्यात कोणताही वाईट उद्देश नव्हता, ऋष्यशिंगाची तपस्या भंग करण्याचा उद्देश नव्हता. ते त्याला समजावतात. त्यानंतर विभंदकाचे समाधान होते. तो शांत होतो. त्यानंतर तो महान ऋषी आपल्या मुलाला उद्देशून बोलतो किं, "माझ्या मुला, तू राजाला वारस मिळवून दिल्यानंतर आपल्या तपस्याच्या कार्यात पुनः परत आले पाहिजेस कारण हे जग आपले नाही. त्यात तू रमलास तर तुझी पुढची प्रगती होणार नाही. असें बोलून विभंदक पुन्हा आपल्या पर्णकुटीकडे निघतो.

त्याचा तितकाच श्रेष्ठ दर्जाचा मुलगा, भोगयज्ञाचे ज्ञान संपादन करून व त्यातील त्रुटी समजल्यानंतर आपले वैराग्यपूर्ण जीवनच कसे ते श्रेष्ठ आहे हे समजल्यावर तो परत तपश्चरण करण्यासाठी वनात काश्यपाच्या आश्रमात येतो. त्याची पत्नी शांता तिला एक पुत्र झाल्यावर पतिव्रता जीवन जगू लागते जशी रोहीणी चंद्रासाठी जगते, अरुंधती वशिष्ठासाठी, लोपामुद्रा अगस्त्यासाठी, दमयंती नळासाठी, साची इंद्रासाठी, इंद्रसेना मुग्दलासाठी, तशी शांता ऋष्यशिंगासाठी तपस्या करत जगत आहे.

पुढे लोमस युधिष्ठीराला सांगतात, हांच तो आश्रम जेथे हे सगळे घडले. तेथे जो तलाव आहे त्यात स्नान करावे, म्हणून मग ते सगळे पांडव व त्यांच्या सह आलेले यात्री तेथे त्याचे विधी उरकतात. येथे जी तुम्ही इच्छा कराल ती पूर्ण होते असा ह्या तीर्थाचा लौकीक आहे असे लोमस ऋषी सांगतात.

त्यानंतर ते सगळे पुढच्या यात्रेला निघतात.

अशारितीने तीर्थयात्रा पर्वातील पस्तिसावा भाग संपला.

## महाभारत खंड अकरावा संपला.

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे २५ खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.
१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्या जाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने

शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा

जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव

लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,
ashokkothare@yahoo.co.in

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मागवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद